श्री.

सर्वसंग्रहमासिकपुस्तकापैकीं

सुभाषित-संग्रह.

भाग १ ला.

हें पुस्तक

रावजी श्रीधर गोंधळेकर

यांनीं

वे० शा० सं० अनंताचार्य अष्टपुत्रे

यांच्या साह्यानें तयार करून

पुणें.

पेठ शनिवार, मेहुणपुरा येथें

आपल्या 'जगद्धितेच्छु' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

आवृत्ति २ री.

किंमत १ रु०, टा. वंगी. ०२.

तारीख १ माहे मार्च सन १८८९.

श्री.

सुभाषित प्रशंसा.

सुभाषित संग्रह हा विषय अति उत्तम असून त्यांत अनेक प्रकारचे व सर्व विषयांवर दृष्टांत देण्यास योग्य असे अनेक छंदांचे श्लोक मोठमोठ्या कवींनीं अनुभव घेऊन करून ठेविले आहेत. परंतु ते निरनिराळ्या ग्रंथांत आहेत, आणि सर्व लोकांस त्या ग्रंथांचें अवलोकन नसल्यामुळें ज्या ज्या प्रसंगीं ज्या ज्या विषयांचा ऊहापोह (तर्करूप ज्ञान) होतो त्या त्या स्थलीं सुभाषित संग्रह एकत्र निवडक केलेला नसल्या कारणानें समयोचित भाषण करण्यास फार अडचण पडते; ती दूर व्हावी आणि सर्व प्रकारच्या विषयांची माहिती व्हावी आणि प्रसंगवशात् नाना प्रकारच्या दृष्टांत-दार्ष्टांतिक भाषणांनीं आपणास आनंद होऊन इतर जनांसही आनंद व्हावा; व नवीन ग्रंथ लिहिणारे, सभेंत व्याख्यान देणारे, कीर्तन करणारे, पुराण सांगणारे, व चार मंडळींत बसून मनोरंजक भाषण करणारे इत्यादि सर्व लोकांस या ग्रंथापासून बहुत उपयोग व्हावा. या ग्रंथाची केवढी थोरवी आहे हें समजण्याकरितां खालीं लिहिलेले चार श्लोक दिले आहेत

सुभषितेन गीतेन युवतीनां च लीलया ॥ यस्य न द्रवते चित्तं स वै मुक्तोऽथवा पशुः ॥ १ ॥

अर्थ.–सुभाषित, गायन व तरुण स्त्रियांची लीला या तीन गोष्टींनीं ज्याचे चित्ताला विकार होत नाहीं त्याची मुक्तांत किंवा पशूंत गणना करावी.

पृथिव्यां त्रीणि रत्नानि जलमन्नं सुभाषितं ॥ मूढैः पाषाणखंडेषु रत्नसंज्ञा विधीयते ॥ २ ॥

अर्थ.–या पृथ्वींत जल, अन्न व सुभाषित हीं तीन रत्नें मुख्य असून मूर्खजन हिरे, पाच इत्यादि पाषाणांचे तुकड्यांस रत्न असें ह्मणतात. परंतु त्यांचें ह्मणणें अयोग्य होय.

संसारकटुवृक्षस्य द्वे फले ह्यमृतोपमे ॥ सुभाषितरसा-

स्वादुः संगतिः सुजने जने ॥ ३ ॥

अर्थ.–संसाररूप वृक्ष कटु (कडु) असून त्यास अमृतासारखीं मधुर दोन फळें आहेत तीं हीं कीं, सुभाषित रसाचें श्रवणादि द्वारा सेवन व सुजनांची संगति हींच.

धर्मो यशो नयो दाक्षं मनोहारि सुभाषितं ॥ इत्यादि-
गुणरत्नानां संग्रही नावसीदति ॥ ४ ॥

अर्थ–तसाच धर्म, यश, नीति, सर्वकार्यांविषयीं दक्षता, व मनास हरण करणारें सुभाषित इत्यादि गुणरूप रत्नांचा संग्रह-कर्ता दुःख पावत नाहीं.

याप्रमाणें सुभाषित संग्रहापासून बहुत प्रकारचे उपयोगांविषयीं अनेक ग्रंथकारांचे लेख आहेत तितके घेतल्यानें विनाकारण विस्तार होईल, याकरितां सदरीं लिहिल्यावरून सुभाषिताचा उपयोग उत्तम आहे हें सहज लक्षांत येईल. आणि हे श्लोक पदच्छेद स्थलीं किंचित् अंतर टाकून त्यांतील पदांवर अर्थ-क्रमानुसार अन्वयाचे आंकडे टाकून सार्थ लिहिले आहेत.

रावजी श्रीधर गोंधळेकर.

अनुक्रमणिका.

श्लोकांक.	मूळचरण.
	द्राक्षा:
१०४	भोज्यं भोजनशक्तिश्च.
१०७	भोजनांतेचकिंपेयं.
१२२	भागीरथीकथंभूता.
२०८	भग्नाशस्य करंडपीडित-तनोर्म्लानेंद्रियस्यक्षुधा.
२३०	भो पांथ पुस्तकधरक्षण-मत्रतिष्ठ
३६३	भग्नकुंभ शकलेनवैमलं.
३७१	भाग्यवंतं प्रसूयेथा.
३९४	भूयिष्ठंद्रविणात्मजंजन-यितुंलिप्सावताचेतसा.
	म.
३६	मनःकृतं कृतं मन्ये.
४९	मनोरथान्करोत्युच्चैः.
७१	मुखेनचंद्रकांतेन.
७४	मुग्धेधानुष्मताचेयं.
८३	मानुष्येसतिदुर्लभापुरुष-तापुंस्त्वेपुनर्विप्रता.
१०८	मंदंनिक्षिपतेपदानिपरितः शब्दंसमुद्वीक्षते.
१६४	महतापुण्यपुण्येन.
१७१	मातेवरक्षतिपितेवहितेनि-युंक्ते
१८९	मुंचमुंचसलिलंदयानिधे.
२०९	माधावमाधावविनैवदैवं.
२५७	मूर्खशिष्योपदेशेन.
३०९	मानुष्यं वरवंशजन्मवि-भवोदीर्घायुरारोग्यता.
३४९	मनसिवचसिकायेपुण्य-पीयूषपूर्णा.
३६९	मज्जत्वंभसियातुमेरुशि-खरंशत्रून्जयत्वाहवे.
४४१	मित्रद्रोहीकृतघ्नश्च.
४४४	माकुरु धनजनयौवनगर्वं.
४६२	मंदोप्यमंदतामेति.
४६७	मृद्‌घटवत्सुखभेद्यो.
४६८	मृगमीनसज्जनानां.
४९२	मास्स्यमित्रमसिकिंचसु-धामयूख.
	य.
२	युगपत्स्वगंडचुंबन.
१०६	युधिष्ठिरःकस्यपुत्रो.
१२५	येजातेव्यसनेनिराकुलधि-यःसंपत्सुनाप्युन्नताः
१२६	येदीनेषुदयालवःस्पृश-तियानल्पोपिनश्रीम-दो.
१३६	यत्राभ्यागतदानमानच-रणप्रक्षालनंभोजनं.
१५७	यस्यपुत्रोनवैविद्वान्.
१६९	यावद्वित्तोपार्जनशक्तः.
१७६	यःकुलाभिजनाचारैः
२३३	यःप्रीणयेत्सुचरितैःपि-तरंसपुत्रो.
२६०	यस्मिन्देशेनसन्मानो.
२८९	यदिसंतिगुणाःपुंसां.
२९८	यःसुंदरःस्तद्वनिताकुरू-

॥ श्री ॥

सुभाषित संग्रह.

श्लोक.

अगजाननपद्मार्कं गजाननमहर्निशं ॥ अनेकदंतं भक्तानामेकदंतमुपास्महे ॥ १ ॥

अर्थ–' ग्रंथाच्या निर्विघ्न परिसमाप्त्यर्थ आरंभीं मंगलाचरण करितों, तें असें कीं, पार्वतीच्या मुखकमलास आल्हाद करण्याविषयीं सूर्यासमान असून भक्तांस मोक्षादि अनेक पुरुषार्थदाता अशा त्या गजवदनाची एकदंताची आह्मी रात्रंदिवस उपासना करितों ॥ १ ॥

युगपत् स्वगंडचुंबनलोलौ पितरौ निरीक्ष्य हेरंबः ॥ तन्मुखमेलनकुतुकी स्वाननमपनीय परिहसन् पायात् ॥ २ ॥

अर्थ–एक समयावच्छेदेंकरून आपल्या दोन्ही गालांस एकदांच चुंबन करण्याविषयीं उद्युक्त झालेल्या मातापितरांस पाहून, त्या उभयतांच्याच परस्पर चुंबनाचें कौतुक पाहण्याच्या इच्छेनें आपलें मुख दूर करून त्यांच्या झालेल्या चुंबनावरून अत्यंत हास्य केलें असा हेरंब देव आमचें अथवा तुमचें रक्षण करो ॥ २ ॥

द्विजराजशेखरो यत् वृषमारूढः सदा सदारस्त्वम् ॥ चक्रे हर तत् विधिना पुनरुपनयनं ललाटघटितं ते ॥ ३ ॥

अर्थ—हे शंकरा, आपण द्विजराजशेखर (मस्तकीं चंद्र धारण केला असून द्विजराजांतही श्रेष्ठ आहां) असे असून तुह्मी ज्यापेक्षां भार्येसह सर्वदां वृषभावर आरोहण करतां, यास्तव ब्रह्मदेवानें तुमचें पुन्हां उपनयन (मौंजीबंधन) केलें म्हणजे तुमच्या ललाटीं तृतीय नेत्र निर्मिला आहे. ॥ ३ ॥

गवीशपत्रो नगजार्तिहारी कुमारतातः शशिखंड-
मौलिः ॥ लंकेशसंपूजितपादपद्मः पायादनादिः
परमेश्वरो नः ॥ ४ ॥

अर्थ—नंदिवाहन, पार्वतीची व्यथा दूर करणारा, कार्तिक स्वामीचा पिता, मस्तकीं अर्ध चंद्र धारण करणारा व लंकेश (रावण) यानें उत्तम प्रकारें ज्याच्या चरणकमलाची पूजा केली आहे असा अनादि परमेश्वररूपी शंकर आमचें रक्षण करो. दुसरा अर्थ या श्लोकांतील प्रत्येक पदाचें आद्याक्षर सोडून अर्थ केला असतां विष्णुपर होतो तो असा कीं,—गरुडवाहन, गजेंद्राची पीडा हरण करणारा, मदनाचा (प्रद्युम्न) पिता, मयूरपिच्छांचा मुगुट धारण करणारा, ब्रह्मरुद्रांनीं पूजित चरणकमलयुक्त असा जो अनादिरूपी नारायण तो आमचें रक्षण करो. ॥ ४ ॥

संपन्नरमणीं शीलसंपन्नरमणीं विना ॥ इत्यूढ-
वान् नरमणी रमणीं रुक्मीणीं हरि : ॥ ५ ॥

अर्थ—संपत्ति, शीलसंपन्न स्त्रीवांचून आनंद देत नाहीं यास्तव सकल नरश्रेष्ठ हरीनें रुक्मिणी नामक शीलसंपन्न रमणीला वरिलें. ॥ ५ ॥

भ्रमयैति भवैपित्तं चेत् भज भंज नेर सुतंशेखरं
कृष्णम् ॥ सद्गोरसेन सहसितमनुत्र्टिकं सर्वथा त्यज
स्नेहं ॥ ६ ॥

अर्थ–हे मानवा, तुला संसाररूपपित्त निरंतर चवऱ्यायशी लक्ष योनींत भ्रमणांत पाडित आहे असें वाटत असेल तर तूं सारथीश्रेष्ठ, आणि किंचित् हास्य केलें आहे ज्यानें अशा श्रीकृष्णांस, सत्पुरुषांच्या वाणीसंबंधी जो ब्रह्मानंदरस तेणेंकरून प्रतिक्षणीं वारंवार भजत जा. आणि स्त्रीपुत्रधनादिकांविषयीं जो अंतःकरणांत लोभ आहे त्याचा सर्वथा त्याग कर. दुसरा अर्थ–हे मानवा देहांत उत्पन्न होणारें पित्त तुला भ्रम जर उत्पन्न करील तर तूं कृष्णवर्ण जो सूतशेखर त्याचें सेवन वारंवार करीत जा. परंतु याचें अनुपान असें कीं, गायीच्या उत्तम दुधांत शर्करा व वेलदोड्याची पूड मिश्रित करून ही मात्रा घ्यावी आणि तैलादिक स्नेह पदार्थ सर्वथा वर्ज्य करावे हें यास पथ्य आहे.

राधा पुनातु जगदच्युतदत्तचित्ता मंथानमाकल-
यती दधिरिक्तपात्रे ॥ तस्याः स्तनस्तवकचूचुकलो-
लदृष्टिर्देवोपि दोहनधिया वृषभं दुदोह ॥ ७ ॥

अर्थ–' एके समयीं ' राधा श्रीकृष्णास पाहून त्याच्या स्वरूपाकडे वृत्ति एकतान झाल्यामुळें दधि (दहीं) रहित पात्रांत रवि फिरवूं लागली. त्याचप्रमाणें श्रीकृष्णही राधेच्या स्तनरूप घोंसांच्या अग्रांवर आसक्त दृष्टि झाल्यामुळें तो देवही दूध काढण्याच्या बुद्धीनें वृषभाचीच (बैलाची) धार काढूं लागला. अशी राधा स्वतः श्रीकृष्णाविषयीं सप्रेम भक्तियुक्त असल्यामुळें कृष्णासही अति प्रेमास्पद आहे यास्तव ती जगास पवित्र करो.

राकारोच्चारमात्रेण मुखान्निर्याति पातकम् ॥ पुनः
प्रवेशसंदेहे मकारस्तत्कपाटवत् ॥ ८ ॥

अर्थ–रा या अक्षराच्या उच्चारणानेंच सर्व पातक मुखांतून बाहेर निघतें. परंतु तें पुनः मुखांत प्रवेश करील कीं काय असा संशय आला असतां मकार उच्चार केल्यानें मुखास कपाट लावल्यासारखें होऊन पुनः पापाचा

प्रवेश होत नाहीं असें रामनामाचें माहात्म्य आहे ह्मणून सर्वदां रामनाम जप करावा.

सौजन्यामृतसिंधवः परहितप्रारब्धवीरव्रता वाचालाः
परवर्णने निजगुणालापे च मौनव्रताः ॥ आपत्स्वप्य-
विलुप्तवीर्यनिचयाः संपत्स्वनुत्सेकिनो माभूवन्
खलवक्त्रनिर्गतविषज्वालातताः सज्जनाः ॥ ९ ॥

अर्थ—जे सज्जन आहेत ते दुष्टांच्या मुखांतून निघणाऱ्या ज्या वाणीरूप विषज्वाला त्यांनीं व्याप्त न होवोत; कारण ते सौजन्यरूप अमृतानें पूर्ण भरलेले केवल समुद्र असून परहितार्थच वीरव्रताचा आरंभ करणारे असतात. आणि ते इतरांच्या वर्णनाविषयीं बहुभाषण करणारे असुन स्वगुण वर्णनाविषयीं मौनव्रत धारण करणारे असतात. तसेच ते विपत्ति-कालांतही स्वकीय धैर्य समुदायाचा त्याग करीत नाहींत व संपत्ति प्राप्त झाली तरी उच्छृंखल होत नाहींत. ॥ ९ ॥

विकृतिं नैव गच्छंति संगदोषेण साधवः ॥ आवे-
ष्टितो महासर्पैश्चंदनो न विषायते ॥ १० ॥

अर्थ—जे साधु असतात ते दुष्टाच्या संगदोषानें कधींही विकार पावत नाहींत. यास दृष्टांत जसा चंदनवृक्ष आसमंतात् महा सर्पांनीं वेष्टित केला तथापि तो तत्संबंधी विषानें युक्त होत नाहीं. ॥ १० ॥

सुजनो न याति वैरं परहितकार्ये विनाशकालेपि ॥
छेदेपि चंदनतरुः सुरभयति मुखं कुठारस्य ॥ ११ ॥

अर्थ—जो सुजन आहे तो आपणास विनाशकाल प्राप्त झाला तरी दुस-ऱ्याचें जर कार्य होतें आहे तर तो वैरभाव धरीत नाहीं यास दृष्टांत चंदनवृक्ष तोडला तथापि तो त्या कुऱ्हाडीचें मुख सुगंधयुक्त करतो. ॥ ११ ॥

दाता न दापयति दापयिता न दत्ते यो दानदापन-

परो मधुरं न वक्ति ॥ दानं च दापनमथ प्रिय-
भाषणं च त्रीण्यप्यमूनि खलु सत्पुरुषे वसंति॥१२॥

अर्थ—जो दाता असतो तो इतरांकडून याचकांस देववीत नाहीं, आणि जो अन्यांकडून देवविता तो स्वतः दान करीत नाहीं. तसाच जो स्वतः दान करीत असून दुसऱ्याकडूनही देवविता तो मधुर भाषण करीत नाहीं, तर दान करणें इतरांकडून देवविणें व प्रिय भाषण करणें हे तिन्ही गुण सत्पुरुषांच्या अंगीं निश्चयेंकरून वास करतात. ॥ १२ ॥

विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा सदसि वाक्पटुता यु-
धि विक्रमः ॥ यशसि चाभिरुचिर्व्यसनं श्रुतौ
प्रकृतिसिद्धमिदं हि महात्मनाम् ॥ १३ ॥

अर्थ—विपत्तिकालीं धैर्य, उदयकालीं क्षमा, सभेंत वाक्चातुर्य, युद्धांत पराक्रम, कीर्तीविषयीं अभिरुचि असणें व श्रुती (वेद किंवा श्रवण) विषयीं व्यसन (संवय) असणें हे लोकोत्तर गुण महात्म्यांच्या अंगीं स्वभावसिद्ध असतात. ॥ १३ ॥

न ध्यातं पदमीश्वरस्य विधिवत्संसारविच्छित्तये,
स्वर्गद्वारकपाटपाटवपटुर्धर्मोऽपि नोपार्जितः॥ नारीपी-
नपयोधरोरुयुगुलं स्वप्नेऽपि नालिंगितं, मातुः केवल-
मेव यौवनवनच्छेदे कुठारा वयम् ॥ १४ ॥

अर्थ—आह्मीं संसारदुःखनाशार्थ ईश्वरचरणाचें यथाविधि ध्यान (सेवन केलें नाहीं. आणि स्वर्गद्वाराच्या कवाडांचें उद्घाटन करण्यास समर्थ असा धर्म त्याचेंही संपादन केलें नाहीं. तसेंच नारीचें पुष्टस्तनद्वय व ऊरु (मांड्या) द्वय यांचें आलिंगन स्वप्नांतही केलें नाहीं. तस्मात् मातेच्या तारुण्यरूप अरण्याच्या छेदनाविषयीं आम्ही केवळ कुठाररूपानेंच तिच्या उदरीं जन्मलों यास्तव आम्हांस धिःकार असो. ॥ १४ ॥

वलिभिर्मुखमाक्रांतं पलितैरंकितं शिरः ॥ गा-
त्राणि शिथिलायंते तृष्णैका तरुणायते ॥ १५ ॥

अर्थ—वळकुत्यांनीं मुख जरी व्याप्त केलें, मस्तक शुभ्र केशांनीं जरी युक्त झालें, व सर्व गात्रें प्रायः जरी शिथिल झालीं, तरी विषयतृष्णा यद्यपि उत्तरोत्तर अधिकच तरुण होत चालली आहे हें महदाश्चर्य आहे ॥१५॥

व्याघ्रीव तिष्ठति जरा परितर्जयंति रोगाश्च शत्रव
इव प्रहरंति देहम् ॥ आयुः परिस्रवति भिन्नघटा-
दिवांभो लोकस्तथाप्यहितमाचरतीतिचित्रम् ॥ १६ ॥

अर्थ—जरा व्याघ्रीसारखी भय उत्पन्न करीत अग्रभागीं स्थित आहे, सेच अनेक रोग शत्रूसमान देहास व्यथा देत आहेत आणि आयुष्य तर फुटक्या घटांतून स्रवणाऱ्या उदकासारखें निरंतर क्षीण होत आहे, तथापि लोक आपल्या अहितावेंच आचरण सर्व करीत असतात हिताकडे कोणीच पाहत नाहीं हें महदाश्चर्य आहे. ॥ १६ ॥

आदित्यस्य गतागतैरहरहः संक्षीयते जीवितं,
व्यापारैर्बहुकार्यभारगुरुभिः कालो न विज्ञायते ॥
दृष्ट्वा जन्मजराविपत्तिमरणं त्रासश्च नोत्पद्यते पी-
त्वा मोहमयीं प्रमादमदिरामुन्मत्तभूतं जगत् ॥ १७ ॥

अर्थ—आदित्याच्या अस्तोदयांनीं प्रति दिवशीं आयुष्य क्षीण होतें, तसाच बहु कार्य भारांनीं गुरु (मोठें) अशा व्यापारांच्या योगानें काळ किती अतिक्रांत झाला हें लक्ष्यांत येत नाहीं आणि जन्म, जरा, विपत्ति व मरण हीं दुःखें अनुभवलीं तरी अंतःकरणांत संसाराविषयीं त्रास उत्पन्न होत नाहीं याचें कारण असें कीं, हें जग मोहयुक्त प्रमाद (असावधपणा) रूप मद्य प्राशन करून उन्मत्तासारखें झालें आहे. ॥ १७ ॥

आयुर्वर्षशतं नृणां परिमितं रात्रौ तदर्धं गतं, तस्या-
र्धस्य परस्य चार्धमपरं बालत्ववृद्धत्वयोः ॥ शेषं
व्याधिवियोगदुःखसहितं सेवादिभिर्नीयते, जीवे
वारितरंगचंचलतरे सौख्यं कुतः प्राणिनाम् ॥१८॥

अर्थ–मनुष्यांचें आयुष्य शतवर्ष परिमितच असून त्यांतील अर्धें आयुष्य रात्रीं निद्रेंत जातें. शेष अर्धांतील अर्धें आयुष्य बालत्व व वृद्धत्व यांत जातें. तसेंच यांतून शेष राहिलेलें आयुष्य व्याधि, वियोग व दुःख यांनीं युक्त असून तें इतरांच्या सेवाकार्यांत जातें, आणि जीवाची स्थिति तर जलावरील तरंगा (लाटां) सारखी अत्यंत चंचल आहे. अशा संसारांत प्राण्यांस सौख्य कोठून होणार, कधींच प्राप्त व्हावयाचें नाहीं. ॥१८॥

केयुरा न विभूषयंति पुरुषं हारा न चंद्रोज्ज्वला,
न स्नानं न विलेपनं न कुसुमं नालंकृता मूर्धजाः
वाण्येका समलंकरोति पुरुषं या संस्कृता धार्यते,
क्षीयंते खलु भूषणानि सततं वाग्भूषणं
भूषणम् ॥ १९ ॥

अर्थ–बाहुभूषणें, चंद्रासमान देदीप्यमान, हार, स्नान, चंदनादिक उटी, पुष्पें, अभ्यंगादि संस्काराच्या योगानें अलंकृत केलेले केश इत्यादिक कोणताहि प्रकार पुरुषास विशेषकरून शोभवीत नाहीं तर संस्कारयुक्त जो धारण केलेली पवित्र वाणी आहे, ती मुख्यत्वेंकरून पुरुषास उत्तम रीतीनें शोभा देते; कारण सर्व भूषणें क्षीण होतात, आणि वाणी सर्वदां भूषणत्वानें पुरुषाच्या जवळ असते तस्मात् तेंच भूषण यथार्थ जाणावें ॥१९॥

शक्यो वारयितुं जलेन हुतभुक् छत्रेण सूर्यातपो,
नागेंद्रो निशितांकुशेन समदो दंडेन गोगर्दभौ ॥

व्याधिर्भेषजसंग्रहैश्च विविधैर्मंत्रैः प्रयोगैर्विषम्
सर्वस्यौषधमस्ति शास्त्रविहितं मूर्खस्य नास्त्यौ-
षधम् ॥ २० ॥

अर्थ—अग्नि, जलानें निवारण करण्याविषयीं शक्य आहे, छत्रानें सूर्याचें ऊन निवारिलें जातें. मदोन्मत्त महागज तीक्ष्ण अंकुशानें स्वाधीन होतो. गायी, वृषभ व गर्दभ यांचें निवारण काठीनें होतें. औषधांच्या सेवनानें व्याधि परिहार होतो. तसेच अनेक प्रकारचे मंत्र व प्रयोग यांनीं विष-बाधा दूर होते. असे शास्त्रविहित उपाय सर्वांवर आहेत परंतु; मूर्खास त्याचें मूर्खत्व निवारण करण्यास औषध नाहीं. ॥ २० ॥

साहित्यसंगीतकलाविहीनः साक्षात् पशुः पुच्छ-
विषाणहीनः ॥ तृणं न खादन्नपि जीवमानस्त-
द्भागधेयं परमं पशूनाम् ॥ २१ ॥

अर्थ—काव्यनाटकादि ग्रंथांतील अलंकारादि लक्षण प्रतिपादक शास्त्र, वाद्य व नृत्य यांसहित सांग गायन कला (छंदशास्त्र किंवा चौसष्ट कला) यांनीं हीन जो पुरुष तो पुच्छ व शृंगें यांनीं रहित जरी आहे तरी तो केवल पशूच जाणावा. असें असून तो तृण भक्षण न करतां वांचतो हें पशूंचें महा भाग्यच समजलें पाहिजे; कारण तो पुरुष पशु जर तृण भक्षण करता तर पशूंचें जीवन होणें दुर्घट झालें असतें. ॥ २१ ॥

विद्या नाम नरस्य रूपमधिकं प्रच्छन्नगुप्तं धनं, वि-
द्या भोगकरी यशःसुखकरी विद्या गुरूणां गुरुः ॥
विद्या बंधुजने विदेशगमने विद्या परा देवता, विद्या
राजसुपूजिता न तु धनं विद्याविहीनः पशुः ॥ २२ ॥

अर्थ–विद्या हेंच पुरुषाचें उत्तम रूप असून आच्छादन केलेलें अंतर्धन आहे. आणि विद्या, भोग, यश, व सुख हीं देणारी असून तीच सकल श्रेष्ठ वस्तूंत श्रेष्ठ आहे. तसेंच बंधुजनांत व परदेशांत गमन केलें असतां तेथेंही विद्याच रक्षक असल्यानें विद्याच सर्वांची परम देवता असून तिची उत्तम रीतीनें पूजा राजा जशी करितो तशी धनाची करीत नाहीं. तस्मात् विद्याहीन जो पुरुष असेल तो पशु जाणावा. ॥ २२ ॥

दाक्षिण्यं स्वजने दया परजने शाठ्यं सदा दुर्जने,
नीतिः साधुजने नयो नृपजने विद्वज्जनेष्वार्जवम् ॥
शौर्यं शत्रुजने क्षमा गुरुजने नारीजने धूर्तता, ये चैव पुरुषाः कलासु कुशलास्तेष्वेव लोकस्थितिः ॥ २३ ॥

अर्थ–स्वजनांविषयीं दक्षता, परकीय जनांविषयीं दया, दुर्जनाविषयीं सर्वदा दुष्टत्व, साधुजनांविषयीं नीति, राजकीय लोकांविषयीं नम्रता द्विजजनांविषयीं सरलता, शत्रुजनांविषयीं शौर्य, मातापितरगुरु इत्यादि पूज्यवर्गांविषयीं क्षमा व स्त्रियांविषयीं धूर्तता, इत्यादि कलांत जे कुशल पुरुष असतात त्यांच्याच स्वाधीन सर्व लोक असतात. ॥२३ ॥

क्षांतिश्चेद्वचनेन किं किमरिभिः क्रोधोस्ति चेद्देहिनां, ज्ञातिश्चेदनलेन किं यदि सुहृद्दिव्यौषधैः किं फलम् ॥ किं सर्पैर्यदि दुर्जनाः किमु धनैर्विद्यानवद्या यदि, व्रीडा चेत् किमु भूषणैः सुकविता यद्यस्ति राज्येन किम् ॥ २४ ॥

अर्थ–पुरुषाच्या अंगीं स्वतःसिद्ध क्षमा जर आहे तर त्यास इतरांच्या शांतिकारक वचनाचें काय कारण आहे, आणि देहधारी जनांस क्रोध

जर असला तर त्यास अन्य शत्रु अधिक काय करणार? दायाद (वांटेकरी) जर आहेत तर त्यास अग्नि अधिक उपद्रव काय देणार? उत्तम मित्र जर असले तर त्यास दिव्य औषधांनीं अधिक फल काय आहे? तसेच दुर्जन जर समागमास आहेत तर सर्प त्यास अधिक काय करणार आहेत? तशीच निर्दोष विद्या ज्यांच्या अंगीं आहे त्यांस धनाचें काय कारण आहे? लज्जा जर अंगीं असली तर भूषणांनीं अधिक काय कर्तव्य आहे? आणि उत्तम ज्ञान जर असलें तर त्यास राज्यानें विशेष काय होणार आहे? कांहीं नाहीं. ॥ २४ ॥

आवासः क्रियतां गांगे पापहारिणि वारिणि॥स्तनमध्ये तरुण्या वा मनोहारिणि हारिणि ॥ २५ ॥

अर्थ—या लोकीं मानवांस वास करण्याविषयीं योग्य दोन स्थानें आहेत तीं अशीं कीं, जे मुमुक्षु असतील त्यांनीं पाप हरण करणाऱ्या गंगातटाकीं वास करावा, आणि जे विषयी आहेत त्यांनीं मौक्तिकांच्या हारांनीं सुशोभित असून मनास हरण करणाऱ्या अशा तरुण स्त्रियेच्या स्तनमध्यभागीं वास करावा. ॥ २५ ॥

उरसि निपतितानां स्रस्तधम्मिलकानां मुकुलितनयनानां किंचिदुन्मीलितानाम्॥सुरतजनितखेदस्विन्नगंडस्थलीनामधरमधु वधूनां भाग्यवंतः पिबंति॥ २६॥

अर्थ—ज्या स्त्रियांचे केश सुटून उरस्थलावर पडले आहेत, तसेच ज्यांनीं आपले नेत्र पुष्पकलिके (कळी) सारखे आकुंचित केले असून किंचित् विकसितही केले आहेत, आणि सुरत (रति) संबंधि श्रमानें ज्यांच्या गंडस्थलांस (गालांस) घर्मबिंदु आले आहेत अशा स्त्रियांच्या अधरोष्ठ संबंधिरसाचें प्राशन भाग्यशाली पुरुषच करतात इतरांस प्राप्त होत नाहीं. तें प्राप्त होणें फार दुर्घट आहे. ॥ २६ ॥

वेधा द्वेधा भ्रमं चक्रे कांतासु कनकेषु च ॥ तासु
तेष्वप्यनासक्तः साक्षाद्भर्गो नराकृतिः ॥ २७ ॥

अर्थ—या जगांत ब्रह्मदेवानें सुंदर स्त्रिया व सुवर्ण यांच्या ठिकाणीं मोठा मोहक गुण उत्पन्न केला आहे. त्या गुणांनीं तीं सर्वांचें मन आपणाकडे आकर्षण करून घेतात. परंतु स्त्रिया व सुवर्ण यांच्या ठिकाणीं जो आसक्त नसतो तो मनुष्य नव्हे; तर मनुष्याकृति साक्षात् शंकरच आहे असें जाणावें. ॥ २७ ॥

प्राप्य चलानधिकारान् शत्रुषु मित्रेषु बंधुवर्गेषु ॥
नापकृतं नोपकृतं न सत्कृतं किं कृतं तेन ॥ २८ ॥

अर्थ—या लोकीं मनुष्यांस कांहीं अधिकार प्राप्त झाले तरी ते चिरकाल राहणारे नसतात यास्तव ज्यानें आपल्या अधिकार कालांत शत्रूंवर अपकार, मित्रांवर उपकार व बंधुवर्गाचा सत्कार असें केलें नाहीं त्यानें त्या अधिकाराचें साफल्य किमपि संपादन केलें नाहीं असें जाणावें. ॥ २८ ॥

पातितोपि कराघातैरुत्पतत्येव कंदुकः ॥ प्राय-
शस्तु सुवृत्तानामस्थायिन्यो विपत्तयः ॥ २९ ॥

अर्थ—कंदुक (चेंडू) हस्ताच्या आघातांनीं भूमीवर पाडिला तरी तो जसा वरच उडतो तसें जे सुवृत्त (सदाचरण संपन्न किंवा उत्तम वर्तुलाकृति) असतात त्यांच्या विपत्ति प्रायशः बहुकाल रहात नाहींत. ॥२९॥

कृतांतस्य दूती जरा कर्णमूले समागत्य वक्तीति-
लोकाः शृणुध्वम् ॥ परस्त्रीपरद्रव्यवांछां त्यजध्वं भ-
जध्वं रमानाथपादारविंदम् ॥ ३० ॥

अर्थ लोकहो, जरा ही यमाची दूती असून ती येऊन तुमच्या कर्णांत असें सांगते कीं, तुह्मी परस्त्री व परद्रव्य यांविषयींच्या वांछेचा

त्याग करावा. आणि रमानाथाच्या पादारविंदाचें भजन करावें हेंच उचित आहे. नाहीं तर व्यर्थ. ॥३० ॥

तृणादपि लघुस्तूलस्तूलादपि च याचकः ॥ वायुना किं न नीतोऽसौ मामेवं याचयेदिति ॥ ३१ ॥

अर्थ—कापूस तृणापेक्षांही हलका असून त्यापेक्षांही याचक हलका आहे, तर मग त्यास वायूनें उडवून कां नेलें नाहीं अशी शंका आली असतां त्याचें कारण सांगतात कीं, मी यास नेलें असतां हा मला अशीच याचना करील कीं काय असें वायूस वाटलें.॥३१ ॥

हे जिव्हे रससारज्ञे सर्वदा मधुरप्रिये ॥ नारायणाख्यपीयूषं पिब जिव्हे निरंतरम् ॥ ३२ ॥

अर्थ—हे जिव्हे, तूं सर्व रसांचें सार जाणणारी असून सर्वदां मधुर पदार्थच प्रिय मानीत आहेस; यास्तव तूं नारायण—नामामृत निरंतर प्राशन कर. ॥ ३२ ॥

भिक्षाशनं तदपि नीरसमेकवारं शय्या च भूः परिजनो निजदेहमात्रम् ॥ वस्त्रं सुजीर्णशतखंडमयी च कंथा हा हा तथापि विषयान् न जहाति चेतः ॥ ३३ ॥

अर्थ—भिक्षान्नाचें जें भोजन तेंही रसहीन व एकवार प्राप्त होत असून शय्या तर केवळ भूमीच असते, आणि परिवार जर पाहिला तर स्वदेहावांचून अन्य किमपि नसतो. तसेंच वस्त्र जर पहावें तर अत्यंत जीर्ण शंभर तुकड्यांची कंथाच असते. असा इच्छानुरूप सर्व विषयांचा अभाव असला तथापि मनुष्यांचें चित्त असल्या तुच्छ विषयांचाही त्याग करीत नाहीं हे परमखेदास्पद आहे. ॥ ३३ ॥

भोगे रोगभयं कुले च्युतिभयं वित्ते नृपालाद्भयम्,
माने दैन्यभयं बले रिपुभयं रूपे तरुण्या भयम् ॥
शास्त्रे वादभयं गुणे खलभयं काये कृतांताद्भयम्
सर्वं वस्तु भयान्वितं भुवि नृणां वैराग्यमेवा-
भयम् ॥ ३४ ॥

अर्थ–उपभोगाविषयीं रोगांचें भय, कुलास भ्रष्टतेचें भय, द्रव्याविषयीं राजभय, लोकांत मान झाला असतां पुढें दैन्याचें भय, सैन्य किंवा सामर्थ्य यांविषयीं शत्रुभय, पुरुषास रूपाविषयीं तरुण स्त्रीपासून भय अथवा तिला रूपाच्या संबंधानें भय, शास्त्रांत वादाचें भय, गुणाविषयीं दुष्टांचें भय, शरीराविषयीं मृत्युपासून भय, अशा सर्व वस्तु लोकांत भयानें युक्त आहेत. तस्मात् भूलोकीं मानवांस वैराग्य मात्र अभयकारक आहे. ॥ ३४ ॥

कृष्ण त्वदीयपदपंकजपंजरांतें अद्यैव मे विशतु
मानसराजहंसः ॥ प्राणप्रयाणसमये कफवातपित्तैः
कंठावरोधनविधौ स्मरणं कुतस्ते ॥ ३५ ॥

अर्थ–हे श्रीकृष्णा, तुझ्या चरणकमलरूप पिंजऱ्यांत आजच माझा मानसरूप राजहंस तेथें जाऊन राहो; कारण प्राणोत्क्रमणसमयीं कफ, वात व पित्त यांनीं कंठाचा अवरोध झाला असतां त्या कालीं मला तुझें स्मरण कोठून होणार ! ? ॥ ३५ ॥

मनः कृतं कृतं मन्ये न शरीरकृतं कृतम् ॥ येनैवा
लिंगिता कांता तेनैवालिंगिता सुता ॥ ३६ ॥

अर्थ–मनानें जें कर्म केलें तेंच कर्म यथार्थ केलें असें मी मानितों; कारण ज्या देहानें कांतेला आलिंगन केलें त्याच शरीरानें कन्येलाही आ-

लिंगन केलें; परंतु हें आलिंगन बाह्यक्रियेनें जरी समान दिसतें तरी त्यांतील मनोभाव भिन्न असल्यामुळें तें एकच आलिंगन दोन प्रकारचें होतें. (याबरून मनाच्या एकाग्रतेनेंच सर्व विहित कर्में केलीं असतां सर्व पुरुषार्थसिद्धि प्राप्त होते.) ॥ ३६ ॥

रायः कलत्रं पशवः सुतादयो गृहा मही कुंजरको-
शभूतयः, सर्वेऽर्थकामाः क्षणभंगुरायुषः कुर्वंति म-
र्त्यस्य कियत् प्रियम् चलाः ॥ ३७ ॥

अर्थ—अनेक प्रकारचीं धनें, स्त्रिया, गो, अश्वादिक अनेक पशु, पुत्रादिक स्वजन, बहुत गृहें, पृथ्वी, गज, वस्त्र, धान्यादिकांचीं भांडारगृहें, अनेक प्रकारच्या संपत्ति किंवा अणिमादिक आठ प्रकारचें योगसिद्धिसंबंधी ऐश्वर्य असे सर्व हे स्वतः अशाश्वत असून क्षणभंगुर आयुष्य असल्यामुळें मरणानें युक्त अशा मानवाचें प्रिय कितीसें करणार आहेत. ॥ ३७ ॥

कौमार आचरेत् प्राज्ञो धर्मान् भागवतानिह ॥ दु
र्लभं मानुषं जन्म तदप्यध्रुवमर्थदम् ॥ ३८ ॥

अर्थ—जो ज्ञानवान् असेल त्यानें या लोकीं कुमारवयापासूनच श्रवणकीर्तनादिक भागवतधर्माचें आचरण करावें; कारण मनुष्य जन्म दुर्लभ असून तें अस्थिर आहे तथापि धर्मादि सकल पुरुषार्थदायक आहे. ॥३८॥

कथं प्रियायात्यनुकंपितायाः संगं रहस्यं रुचिरां-
श्च मंत्रान् ॥ सुहृत्सु च स्नेहवशः शिशूनां कला-
क्षराणामनुरक्तचित्तः ॥ ३९ ॥

अर्थ—असें कुमारावस्थेपासून भागवतधर्म आचरण करण्याचें कारण असें कीं, पुढें तारुण्यावस्थेंत आत प्रेमास्पद झालेल्या भार्येचा एकांत संग, तिचे प्रियमंत्र (गुप्तविचार), तसेच सुहृत् (संबंधी किंवा मित्र) पुत्र

यांवर स्नेह व बालकांचीं अस्पष्ट (बोबडीं) मधुर भाषणें यांविषयीं आसक्त झाला असतां तो पश्चात् या दुरंत मोहांतून मुक्त होण्यास कसा समर्थ होईल ? यास्तव हें बंधन आपणास होण्यापूर्वींच त्यानें कौमार-वयापासून भागवतधर्माचें आचरण करावें. ॥ ३९ ॥

अहो एषां वरं जन्म सर्वप्राण्युपजीवनम् ॥ सुजन-
स्येव येषां वै विमुखा यांति नार्थिनः ॥ ४० ॥

अर्थ—या वृक्षांपासून सर्व प्राणिमात्रांचें उपजीवन होतें; तस्मात् यांचा जन्म श्रेष्ठ आहे, आणि यांजपासून याचक विमुख जात नाहींत. यावरून यांचें जन्म केवळ साधूसारखेंच आहे हें आश्चर्य आहे. ॥ ४० ॥

पत्रपुष्पफलच्छायामूलवल्कलदारुभिः ॥ गंधनिर्या-
सभस्मास्थितोक्मैः कामान् वितन्वते ॥ ४१ ॥

अर्थ—याचा अनुभव असा कीं, हे वृक्ष, स्वकीय पत्रें, पुष्पें, फळें, छाया, मुळें, वल्कलें, काष्ठें, गंध, निर्यास (चीक), भस्म, अस्थि, (आंठळी), व तोक्म (कोमल अंकुर) या पदार्थांनीं प्राण्यांचे मनोरथ पूर्ण करितात. ४१

एतावज्जन्मसाफल्यं देहिनामिह देहिषु ॥
प्राणैरर्थैर्धिया वाचा श्रेय एवाचरेत् सदा ॥४२॥

अर्थ—तस्मात् या मनुष्यलोकीं देहधारी जनांच्या जन्माचें साफल्य इतकेंच आहे कीं, त्यानीं स्वकीय प्राण, अर्थ, बुद्धि, व वाणी या साधन सामग्रीनें प्राणिमात्रांविषयीं सर्वदां कल्याणमार्गाचेंच आचरण करीत असावें. ॥ ४२ ॥

कुरंगमातंगपतंगभृंगमीना हताः पंचभिरेव पंच ॥
एकः प्रमादी स कथं न हन्यते यस्सैव ते पंचभिरे-
व पंच ॥ ४३ ॥

अर्थ–हरिण गायनरूप शब्दविषयानें मृत्यु पावतो; गज, हत्तिणीच्या अंगसंगरूप स्पर्शविषयानें मरण पावतो; पतंगनामकपक्षी, दीपांत रूपविषयाच्या योगानें मरण पावतो; भ्रमर, गंध (सुवास) विषयाच्या संबंधानें मृत्युमुखांत जातो; व मत्स्य रसविषयावरील आसक्तीमुळें प्राणास मुकतो. असे पांच जातींचे पशु एकेक विषयाच्या आसक्ततेनें जीवितास मुकतात. तेव्हां ज्याच्या पांचही इंद्रियांची विषयांविषयीं आसक्ति आहे तो एकाकी स्वहिताविषयीं असावध असल्यामुळें तो कसा त्या पंचविषयासक्तीनें मृत्यु पावणार नाहीं? पावेल. ॥ ४३ ॥

पथि स्थितं तिष्ठति दिष्टरक्षितं गृहे स्थितं तद्विह-
तं विनश्यति ॥ जीवत्यनाथोपि तदीक्षतो वने गृ-
हेपि गुप्तो स्य हतो न जीवति ॥ ४४ ॥

अर्थ–जी वस्तु आपल्या प्रारब्धीं असते ती मार्गांत पडली तरी सुरक्षित राहते आणि जी वस्तु आपल्या दैवींच नाहीं ती गृहांत रक्षण करून ठेविली तरी नष्ट होते तसाच कोणी अनाथप्राणी वनांत जरी असला तरी तो ईश्वराच्या कृपादृष्टीनें वांचतो, आणि सनाथप्राणी घरांत रक्षण करून ठेवला तरी तो परमेश्वराची कृपा नसली तर वांचत नाहीं. ॥ ४४ ॥

मनोरथान् करोत्युच्चैर्जनो दैवहतानपि ॥ सि-
द्ध्यसिद्ध्योः समं कुर्यात् दैवं हि फलसाधनम्॥४५॥

अर्थ–हा जन, आपले मनोरथ दैवानें कुंठित असले तरी तो उत्कृष्ट प्रकारानें ते करीत असतो; परंतु त्या मनोरथांचें फल साध्य होण्याविषयीं दैवच मुख्यत्वेंकरून कारण आहे; यास्तव मनुष्यानें स्वकीय मनोरथांची सिद्धि होणें किंवा सिद्धि न होणें, याविषयीं समान बुद्धीनें यत्न करावा ह्मणजे त्यास हर्ष खेद होत नाहींत. आणि अशी मनोरथ फलसिद्धि दैवाधीन आहे यास्तव त्यानें सर्वदा देवास शरण असावें, ह्मणजे त्याची फलसिद्धि होते. ॥ ४५ ॥

विश्वामित्रपराशरप्रभृतयो वातांबुपर्णाशनास्तेपि स्त्रीमुखपंकजं सुललितं दृष्ट्वैव मोहं गताः ॥ शाल्यन्नं सघृतं पयोदधियुतं भुंजंति ये मानवास्तेषामिंद्रियनिग्रहो यदि भवेद्विंध्यस्तरेत् सागरे ॥४६॥

अर्थ–विश्वामित्र व पराशरादिक ऋषि, वायु, उदक आणि शुष्कपर्ण यांचेंच भक्षण करीत असतांही स्त्रियांचें सुंदर मुखकमल अवलोकन करतांच मोह पावले, तेव्हां घृत, दुग्ध आणि (दहीं) यांसहित उत्तम शाल्योदन, भक्षण करणारे जे मानव आहेत त्यांस इंद्रियनिग्रह जर होईल तर सागरांत विंध्याद्रि (पर्वत) तरल्याप्रमाणें होईल. ॥ ४६ ॥

दुर्जनः परिहर्त्तव्यो विद्ययालंकृतोपि सन् ॥ मणिना भूषितः सर्पः किमसौ न भयंकरः ॥ ४७ ॥

अर्थ–जो मनुष्य दुर्जन आहे तो विद्येनें अलंकृत ह्मणजे विद्वान् असला तरी त्यास दूर करावें; यास दृष्टांत असा कीं, सर्प जरी रत्नमण्यानें भूषित आहे तथापि तो लोकांस भयंकर नाहीं कीं काय? ॥ ४७ ॥

अपूर्वरसनाव्यालाः खलाननबिलेशयाः ॥ कर्णमूले स्पृशंत्यन्यं हरंत्यन्यस्य जीवितम् ॥ ४८ ॥

अर्थ–जिव्हा ह्याच कोणी एक अद्भुत सर्प, दुर्जनमुखरूप बिळांत राहून अन्य जनांच्या कर्णमूलास स्पर्श करून इतरांचें जीवित हरण करितात.४८

न दुर्जनः सज्जनतामुपैति बहुप्रकारैरपि सेव्यमानः ॥ भूयो ऽपि सिक्तः पयसा घृतेन न निंबवृक्षो मधुरत्वमेति ॥ ४९ ॥

अर्थ–जो दुर्जन आहे त्याची बहुत प्रकारांनीं सेवा केली तरी त्यास स-ज्जनत्व प्राप्त होत नाहीं; याविषयीं दृष्टांत असा कीं, निंबवृक्षास दुग्ध व घृत यांनीं वारंवार सिंचन केलें तरी त्या वृक्षास जसा मधुर रस प्राप्त होत नाहीं तद्वत्. ॥ ४९ ॥

खलः सर्षपमात्राणि परच्छिद्राणि पश्यति ॥ आत्मनो
बिल्वमात्राणि पश्यन्नपि न पश्यति ॥ ५० ॥

अर्थ–जो खल आहे तो इतरांचे दोष मोहरी इतके बारीक असले तरी त्यांस शोधून काढितो. आणि तो दुर्जन आपले दोष बिल्वफला-(बेलफळ) समान मोठे असले तरी त्या दोषांस पाहून न पाहिल्या-सारिखें करितो. ॥ ५० ॥

खलानां कंटकानां च द्विविधैव प्रतिक्रिया ॥ उपा-
नन्मुखभंगो वा दुरतो वा विसर्जनम् ॥ ५१ ॥

अर्थ– दुर्जन व कंटक (कांटे) यांजवर दोन प्रकारचीच प्रतिक्रिया (प्रतीकार) आहे. ती अशी कीं, उपानहानें (जोड्यानें) त्यांच्या मुखा-चा भंग करावा किंवा त्यांचा त्याग करावा. ॥ ५१ ॥

न विना परवादेन रमते दुर्जनो जनः ॥ काकः स-
र्वरसान् भुंक्ते विनाऽमेध्यं न तृप्यति ॥ ५२ ॥

अर्थ–जो दुर्जन आहे तो परनिंदेवांचून संतोष पावत नाहीं. यावि-षयीं दृष्टांत असा कीं, जरी काकपक्षी सर्व रसांचें भक्षण करतो तरी तो अपवित्र रसावांचून तृप्त होत नाहीं तद्वत्. ॥ ५२ ॥

सर्पः क्रूरः खलः क्रूरः सर्पात् क्रूरतरः खलः ॥ मंत्रे-
ण शाम्यते सर्पो न खलः शाम्यते कदा ॥ ५३ ॥

अर्थ—सर्प आणि दुष्ट हे दोघेही क्रूर खरे; परंतु त्यांत सर्पापेक्षांही खल (दुष्ट) अत्यंत क्रूर आहे; कारण सर्पावर मंत्र घातला असतां तो शांत होतो आणि खल कदापि कोणत्याही उपायानें शांत होत, नाहीं. ॥५३॥

देवकीतनयपूजनपूतः पूतनारिचरणोदकधूतः ॥ यद्यहं
स्मृतधनंजयसूतः किं करिष्यति स मा यमदूतः॥५४॥

अर्थ—मी जर देवकीनंदनाच्या पूजनानें पवित्र होऊन त्याच पूतनारीच्या चरणोदकानें शुद्ध झालों आणि मी जर अर्जुनसारथ्याचें स्मरण केलें तर यमदूत मला काय करणार आहे? मजपुढें त्याचें कांहीं एक चालावयाचें नाहीं. ॥ ५४ ॥

तद्दिनं दुर्दिनं मन्ये यत्र मित्रागमो न हि ॥ तद्दि-
नं दुर्दिनं मन्ये यत्र मित्रागमो न हि ॥ ५५ ॥

अर्थ—ज्या दिवशीं सूर्यदर्शन होत नाहीं त्या दिवसास मी दुर्दिन असें मानितों. तसेंच ज्या दिवशीं आपले घरीं मित्राचें आगमन होत नाहीं त्या दिवसासही मी दुर्दिन असें मानतों ॥ ५५ ॥

किटिस्तु धरणीधरः कति न संति भूदारकाः, मरुत्तु
मलयानिलः कति न संति झंझानिलाः॥ गिरिस्तु
कनकाचलः कति न संति चाश्मव्रजाः, प्रभुस्तु विबुधा-
श्रयः कति न संति कुक्षिंभराः ॥ ५६ ॥

अर्थ—ज्यानें प्रलयोदकांतून पृथ्वीचा उद्धार केला तोच एक वराह, बाकीचे पुष्कळ वराह आहेत; परंतु ते केवल पृथ्वीचें विदारण मात्र करणारे आहेत, त्यांपासून दुसरा उपयोग कांहीं नाहीं. तसाच जो मलयपर्वतावरील सुगंध वायु तोच स्तुत्य आहे, जे झंझावात (पर्जन्यवृष्टियुक्त) आहेत ते असून नसून काय उपयोग? त्याचप्रमाणें जो मेरुनामक सुवर्णपर्वत आहे,

तोच एक श्रेष्ठ आहे. अन्य जे पर्वत ते पाषाणसमुदायरूपच आहेत. तसाच जो राजा ज्ञानिजनांच्या आश्रयानें वर्ततो तोच प्रभु यथार्थ जाणावा. आणि अशा सन्मार्गानें प्रजा पालनावर लक्ष्य न देतां केवल जे राजे आपल्या कुक्षीच धनानें भरितात ते राजे निंद्य समजावे ॥ ५६ ॥

चेतोहरा युवतयः स्वमनोनुकूलाः सद्बांधवाः प्रणत-
नम्रगिरश्च भृत्याः ॥ गर्जंति दंतिनिवहास्तरला-
स्तुरंगाः संमीलने नयनयोर्नहि किंचिदस्ति ॥५७॥

अर्थ–अंतःकरणास हरण करणाऱ्या तरुण स्त्रिया, आपल्या मनोगतानुसार अनुकूल उत्तम बांधव, स्वयें विनयसंपन्न असून नम्र रीतीनें भाषण करणारे सेवक तसेच गजांचे समुदाय व चंचल अश्वही गर्जना करीत आहेत असें जरी सर्व ऐश्वर्य अनुकूल असलें तरी तें नेत्र झांकल्यावर आपणास किमपि उपयुक्त नाहीं, असें जाणावें. ॥ ५७ ॥

शिवयोः सुधाहरिद्रादीप्तिमतोः सारभृज्जगत्पित्रोः॥
त्रिभुवनविघ्नध्वंसी करिकल्पः कश्चिदरुणिमा
जयति ॥ ५८ ॥

अर्थ–सुधा (चुना) सदृश शुभ्रकांति शिव आणि हरिद्रेसारखी पीतवर्ण कांतियुक्त पार्वती या जगाच्या मातापितरांचें सार* धारण करणारा असून, त्रिभुवनांतील विघ्नांचा नाशक असा गजतुल्य कोणी एक आर*क्तवर्ण गजानन देव सर्वोत्कर्षानें वर्तत आहे. ॥ ५८ ॥

कस्त्वं शूली मृगय भिषजं नीलकंठः प्रियेऽहं, केका-
मेकां कुरु पशुपतिर्नैव दृष्टे विषाणे ॥ स्थाणुर्मुग्धे

---

* वीर्य. * हळद व चुना यांच्या संयोगानें होणाऱ्या लोकप्रसिद्ध वर्णासारखा.

न वदति तरुर्जीवितेशः शिवाया गच्छारण्यं प्रति-
वचनजडः पातु वश्चंद्रचूडः ॥ ५९ ॥

अर्थ—कोण तूं? मी शूली ह्मणजे त्रिशूलधारी शिव आहें. तेव्हां पार्वतीनें उत्तर दिलें कीं, आपण शूलरोगानें व्यथित असला तर वैद्याचा शोध करावा. हे प्रियें, मी नीलकंठ आहें. मयूरही नीलकंठ आहे तर तुह्मी एकवार मयूरासारखा शब्द करा बरें! मी पशुपति आहें तर मस्तकावर दोन शृंगें कां दिसत नाहींत? हे मुग्धे, मी स्थाणु (अचल) आहें, वृक्षही अचल आहे, परंतु तो भाषण करीत नाहीं, त्याकाळीं शिव बोलले कीं, मी शिवा (पार्वती) जी तिचा प्राणनाथ आहें. तेव्हां त्या विनोदप्रसंगीं पार्वती ह्मणाली कीं, शिवा हें नाम कोल्हीचेंही आहे. यावरून तुह्मी तिचे प्राणनाथ असला तर अरण्यांत जावें. अशा पार्वतीच्या प्रत्युत्तरांनीं कुंठित झालेला चंद्रचूड तुह्मांस रक्षण करो. ॥ ५९ ॥

केयं मूर्ध्न्यंधकारे तिमिरमिह कुतः सुभ्रु कांतेंदु-
युक्ते,कांताप्यत्रास्ति काचिन्ननु भवतु मया पृष्ट-
मेतावदेव ॥ नाहं हूंहं करोमीत्यपनयशिरसस्तू-
र्णमेनामिदानीमित्थं प्रोक्तो भवान्या प्रतिवचनजि-
तः पातु वश्चंद्रचूडः ॥ ६० ॥

अर्थ—एके समयीं पार्वतीनें शिवाच्या मस्तकीं गंगेस अवलोकन करून त्यांस प्रश्न केला, हे अंधकारे (अंधकासुरशत्रो) तुमच्या मस्तकीं ही स्त्री कोण आहे? तेव्हां अंधकारांत ही कोण आहे असा प्रश्नाचा आशय घेऊन शिव उत्तर देतात हे सुंदर भृकुटिप्रिये, रम्यचंद्रयुक्त या मस्तकावर अंधकार कोठून असेल यावरून येथें अन्य स्त्रीचा कसा संभव होईल? तेव्हां रम्यचंद्रयुक्त मस्तकावर हा शिवाचा आशय न घेतां कांता आणि चंद्र एतद्युक्त मस्तकावर असा अर्थ मनांत घेऊन पार्वती पुनः ह्मणते कीं, या स्थळीं कोणी कांता आहे का-

य ? तें समयीं शिव बोलले कीं, असली तर असो. त्या कालीं पार्वती ह्मणाली कीं, मीं इतकेंच विचारिलें होतें तेव्हां 'कांतेंदुयुक्ते' या पदांत कांता व इंदु असा द्वंद्वसमास मी करीत नाहीं; तर कांत ह्मणजे रम्य जो इंदु असा कर्मधारय समास करतें. हा त्यांचा भाव न घेतां मी तिला भार्या करणार नाहीं, हा अर्थ मनांत घेऊन पार्वती ह्मणाली कीं, असें आहे तर तुह्मी मस्तकावरून तिला याकालीं शीघ्र दूर करा. अशा पार्वतीशीं झालेल्या प्रश्नोत्तर संभाषणांतील प्रत्युत्तरांत पराजित झालेला चंद्रशेखर तुमचें रक्षण करो. असा या श्लोकाचा भावार्थ आहे.

पाणिग्रहे पुलकितं वपुरैशं भूतिभूषितं जयति ॥
अंकुरित इव मनोभूर्यस्मिन् भस्मावशेषोपि ॥६१॥

अर्थ–पार्वतीच्या पाणिग्रहणाविषयीं हर्षरोमांचांनीं युक्त झालेलें असून भस्मानें भूषित असें शिवाचें स्वरूप सर्वोत्कृष्ट दिसूं लागलें; कारण मदन पूर्वीं भस्मावशेष झाला असूनही त्याकालीं शिवस्वरूपांत अंकुरित झाल्यासारखा दिसूं लागला अशी शिवाच्या स्वरूपीं अत्यंत शोभा दिसत होती. ॥ ६१ ॥

पार्वतीफणिबालेंदुभस्ममंदाकिनीयुता ॥ पवर्गरचिता मूर्तिरपवर्गप्रदायिनी ॥ ६२ ॥

अर्थ–तशीच पार्वती, वासुकीप्रमुख फणी (नाग), बालचंद्र, भस्म, मंदाकिनी, (भागीरथी) या क्रमानें पवर्गाच्या आदिअक्षरयुक्त पार्वतीप्रभृति पदार्थांनीं जरी शिवमूर्ति युक्त आहे तथापि ती भक्तांस अपवर्ग (मोक्ष) प्रदायक आहे. ॥ ६२ ॥

भवान् हि भगवानेव गतो भेदः परस्परम् ॥ महत्या गदया युक्तः सत्यभामासमन्वितः ॥६३ ॥

अर्थ–अहो श्रीकृष्णा, आपण साक्षात् भगवानच आहां, यावरून तुमच्या स्वरूपांत व भगवानाच्या स्वरूपांत परस्पर भेद नाहीं; कारण

मूलरूपी भगवान् मोठ्या गदेनें युक्त आहे आणि तुमचें हें अवताररूप तर उत्सव, दान व दया यांनीं युक्त आहे. तसाच तो भगवान् सत्य, कांति, व लक्ष्मी यांनीं युक्त असून तुम्हीं सत्यभामा नामक भार्येनें युक्त आहां. ॥ ६३ ॥

अंगुल्या कः कपाटं प्रहरति कुटिले माधवः किं व
संतो, नो चक्री किं कुलालो न हि धरणिधर किं
द्विजिव्हः फणींद्रः ॥ नाहं घोराहिमर्दी किमसि
खगपतिर्नो हरिः किं कपींद्र, इत्येवं सत्यभामाप्रति-
वचनजितः पातु वश्चक्रपाणिः ॥ ६४ ॥

अर्थ—एके दिवशीं रात्रौ श्रीकृष्णानीं सत्यभामेच्या मंदिरीं येऊन द्वार बोटानें वाजविलें. तेसमयीं आंतून सत्यभामेनें प्रश्न केला कीं, द्वारावर अंगुलीनें प्रहार कोण करीत आहे. तेव्हां श्रीकृष्णानें उत्तर दिलें का, हे कुटिले मी माधव (लक्ष्मीपति) आहें. त्या काळीं माधव हें नांव वसंतऋतूचेंही आहे; यावरून तिणें प्रत्युत्तर दिलें कीं, तूं वसंत आहेस काय? मी चक्रधारी आहें. तूं कुलाल (कुंभार) आहेस काय? मी धरणीधर आहें, तूं जिव्हाद्वययुक्त नागाधिपति शेष आहेस काय? मी कालिया नामक क्रूर सर्पाचें मर्दन करणारा आहें, तूं पक्षिस्वामी गरुड आहेस काय? तेव्हां कृष्णानें भाषण केलें कीं, गरुड नाहीं तर मी हरि आहें. तरी हरि हें नांव वानराचेंही आहे तस्मात् तूं कोणी कपिश्रेष्ठ आहेस काय? अशा प्रकारें सत्यभामेच्या प्रत्युत्तरांनीं पराजित झालेला चक्रपाणी श्रीकृष्ण तुमचें संरक्षण करो ॥ ६४ ॥

स्वेदस्ते कथमीदृशः प्रियतमे त्वन्नेत्रवन्हेर्विभो,
कस्माद्वेपितमेतदिंदुवदने भोगींद्रभीतेस्तव ॥ रो-
मांचः कथमेष देव भगवन् गंगाभसा सीकरैरि-
त्थं भर्तरि भावगोपनपरा गौरी चिरं पातु वः ॥ ६५ ॥

अर्थ–कोणी एके समयीं शंकर, पार्वतीला प्रश्न करीत होते कीं, हे अतिप्रिये तुला असा घर्म कशानें आला? तेव्हां तिनें उत्तर दिलें कीं, हे विभो, तुमच्या तृतीयनेत्रसंबंधी अग्नीच्या योगानें हा घर्म (घाम) आला आहे. असो परंतु हे चंद्रवदने, तुझ्या अंगीं हा कंप काय कारणानें उत्पन्न झाला आहे? ते समयीं पार्वतीनें उत्तर दिलें कीं, तुमच्या अंगावरील भूषणभूत नागराजांच्या भीतीनें हा कंप उत्पन्न झाला आहे. बरें परंतु तुझ्या अंगावर हे रोमांच कशानें आले? त्या कालीं तिणें उत्तर दिलें कीं, हे भगवन् देवा, तुमच्या मस्तकावरील गंगोदकाच्या तुषारांनीं हे रोमांच आले आहेत. अशा रीतीनें भर्त्याच्या अग्रभागीं आपला कामोद्दीपन संबंधी भाव गुप्त करणारी पार्वती तुमचें चिरकाल रक्षण करो ॥ ६५ ॥

भिक्षुः क्वास्ति बलेर्मखे पशुपतिः किं नास्त्यसौ गोकुले, मुग्धे पन्नगभूषणः सखि सदा शेते च तस्योपरि ॥ आर्ये मुंच विषादमाशु कमले नाहं प्रकृत्याचला, चेत्थं वै गिरिजासमुद्रसुतयोः संभाषणं पातु वः ॥ ६६ ॥

अर्थ–कोणी एके समयीं लक्ष्मीनें पार्वतीला प्रश्न केला कीं, भिक्षुकरूपी तुझा पति कोठें आहे? तेव्हां तिणें उत्तर दिलें कीं, बलीच्या यज्ञांत होता. ते समयीं लक्ष्मी ह्मणाली पशुपति कोठें आहे? तेव्हां पार्वती ह्मणाली कीं, तो गोकुळांत नाहीं काय? त्या कालीं लक्ष्मी पुनः ह्मणाली हे मुग्धे, सर्पभूषण कोठें आहे? तेव्हां तिणें उत्तर केलें कीं, हे सखि तो तर सर्वदां सर्पावर शयन करीत आहे. तेव्हां लक्ष्मी बोलली हे आर्यें, तूं विषादाचा (खेद अथवा विषभक्षक शिव याचा) शीघ्र त्याग कर. तेव्हां पार्वती बोलली हे लक्ष्मी, मी त्याग करण्याविषयीं तुजसारखी स्वभावानें चंचल नाहीं. असें पार्वती व समुद्रकन्या लक्ष्मी यांचें विनोदपर झालेलें संभाषण तुमचें रक्षण करो. ॥ ६७ ॥

पार्वतीमोषधीमेकामपर्णां मृगयामहे ॥ शूली
हालाहलं पीत्वा यया मृत्युंजयोऽभवत् ॥ ६७ ॥

अर्थ—कोणी कवि ह्मणतात कीं, पर्वतसंबंधि व पर्वतकन्या असून पर्ण (पानें) रहित व अपर्णा नामक अशा एका ओषधीचा शोध आह्मी करीत आहों; कारण शूलरोगी व त्रिशूलधारी शिव हालाहल नामक विष प्राशन करूनही जिच्या योगानें मृत्युनाशक व मृत्युंजय नामानें प्रसिद्ध झाला आहे. ॥ ६७ ॥

अस्त्रामास तृणं प्रियाद्रुहि तृणामास स्मरारे-
र्धनुर्दारामास मुनेः शिलापि नृवरामास स्वयं
पादुका ॥ कुल्यामास महार्णवोपि कपयो योधां-
बभूवुस्तदा पौलस्त्यो मशकांबभूव भगवंस्त्वं
मानुषामासिथाः ॥ ६८ ॥

अर्थ—हे भगवान्, तुह्मी ज्याकालीं मनुष्यांत रामावतार घेतला होता, त्या कालीं सीता व लक्ष्मण यांसह तुह्मी दंडकारण्यांत गेलां असतां तेथें तुमच्या प्रिय सीतेचा द्रोह करण्याविषयीं आलेल्या काकावर आपण दर्भ टाकला तो त्यास अस्त्ररूप झाला. तसेंच सीतास्वयंवर प्रसंगीं मदनारी शिवाचें धनुष्य तृणासारखें तुह्मीं लीलेनें भग्न केलें आणि शिलारूप झालेली अहल्या तुमच्या चरण रजस्पर्शानें तत्काल पुनः पूर्ववत् गौतम मुनीची भार्या झाली. त्याचप्रमाणें तुह्मी वनवासास गेल्यानंतर तुमच्या पादुकाच स्वयें राजपदारूढ झाल्या. पश्चात् तुह्मी स्वनामप्रतापानें शिला पाण्यावर तारून लंकेंत जाण्यासाठीं समुद्रावर सेतु बांधिला. तेव्हां तो महान् समुद्र असूनही सेतूच्या योगानें नवीन केलेल्या अल्पनदीसारखा झाला. तसेच त्याकालीं वानर वीर योद्धे झाले व त्या युद्ध प्रसंगीं पुलस्त्यमुनी वंशस्थ त्रैलोक्य विजयी रावण मशकप्राय तुच्छ झाला असें रामानें माहात्म्य आहे. ॥ ६८ ॥

अद्यापि नोज्झति हरः किल कालकूटं कूर्मो बि-
भर्ति धरणीं खलु पृष्ठभागे ॥ अंभोनिधिर्वहति
दुःसहवाडवाग्निमंगीकृतं सुकृतिनः परिपाल-
यंति ॥ ६९ ॥

अर्थ—जे साधु आहेत ते अंगीकारिलेल्या वस्तूचें पालनच करितात, त्याग करीत नाहींत, याचा अनुभव असा कीं, शंकरें स्वयें प्राशन केलेल्या कालकूट विषाचा त्याग अद्यापि करीतच नाहींत. तसाच कूर्म आपल्या पृष्ठभागावर निश्चयेंकरून धरणीला धारण करतो आणि उदकनिधि समुद्र दुःखानेंही सहन करण्याविषयीं अशक्य अशा वाडव नामक अग्नीला वहात आहे. ॥ ६९ ॥

गुरुणा स्तनभारेण मुखचंद्रेण भास्वता ॥ शनैश्चरा-
भ्यां पादाभ्यां रेजे ग्रहमयीव सा ॥ ७० ॥

अर्थ—गुरु (महान्) स्तनभार, कांतियुक्त मुखचंद्र व शनैश्चरासारखे मंदगतियुक्त चरण अशा अवयवांच्या योगानें स्त्री ग्रहमय शोभते. ॥ ७० ॥

मुखेन चंद्रकांतेन महानीलैः शिरोरुहैः ॥ पाणिभ्यां
पद्मरागाभ्यां रेजे रत्नमयीव सा ॥ ७१ ॥

अर्थ—मुख हाच कोणीएक चंद्रकांत मणि तसेच इंद्रनीलमणि सदृश मस्तकावरील कृष्णवर्ण केश व पद्मराग मणितुल्य आरक्त हस्त या अवयवांनीं तरुण स्त्री रत्नस्वरूप शोभते. ॥ ७१ ॥

संमोहयंति मदयंति विडंबयंति निर्भर्त्सयंति रमयंति
विषादयंति ॥ एताः प्रविश्य सदयं हृदयं नराणां किं
नाम वामनयना न समाचरंति ॥ ७२ ॥

अर्थ—ह्या स्त्रिया स्वकीय भावांनीं पुरुषांस अत्यंत मोहित करतात, निर्लज्ज करतात, हेलना करतात, निर्भत्सना करतात, खेद उत्पन्न करतात, तस्मात् अशा ह्या मृगनयना सुंदर स्त्रिया पुरुषांच्या सदय हृदयांत प्रवेश करून काय एक आचरण करीत नाहींत? तर त्या सर्व कार्यें करण्याविषयीं समर्थ आहेत असें स्त्रियांचें चरित्र विचित्र आहे. ॥ ७२ ॥

भ्रूचातुर्यात्कुंचिताक्षाः कटाक्षाः स्निग्धा वाचो लज्जिताश्चैव हासाः ॥ लीलामंदं प्रस्थितं च स्थितं च स्त्रीणामेतद्भूषणं चायुधं च ॥ ७३ ॥

अर्थ—भृकुटि चातुर्यानें आकुंचित नेत्रकटाक्ष, प्रीतियुक्त भाषणें, लज्जायुक्त हास्य, लीलेनें मंद मंद गमन करणें, व उभें राहणें, इत्यादि प्रकार स्त्रियांचें स्वभावसिद्ध भूषण असून पुरुषास वश करण्याचें आयुधही आहे. ॥ ७३ ॥

मुग्धे धानुष्मता चेयमपूर्वा त्वयि दृश्यते ॥ यथा विध्यसि चेतांसि गुणैरेव न सायकैः ॥ ७४ ॥

अर्थ—हे सुंदरी, तुझ्या अंगीं अद्भुत धनुर्धारित्व दिसत आहे. तें असें कीं, लोकांत जे धनुर्धारी आहेत, त्यांस बाणाची अपेक्षा असून ज्या लक्ष्यास वेध करावयाचा असेल तें प्रत्यक्ष असावें लागतें. आणि तूं तर केवळ स्वकीय * गुणांनींच पुरुषांच्या अंतःकरणास विद्ध करतेस. तें अंतःकरण दृष्टिगोचर नाहीं, व तुला पुरुषांच्या अंतःकरणास वेध करण्याविषयीं मुळींच बाणाची अपेक्षा नाहीं. ॥ ७४ ॥

बाले तवाधरसुधारसपानकाले चेतो मदीयमभिवांछति शेषभावम् ॥ आलिंगने तव विरोचनपौत्रभावमाखंडलत्वमखिलांगनिरीक्षणेषु ॥ ७५ ॥

---

* धनुष्याकडे दोरी व स्त्रीचा ठिकाणीं सौंदर्यादिक.

अर्थ—हे बाले, तुझ्या अधरामृतरूप रसाच्या प्राशनकालीं माझ्या चित्तास असें वाटतें कीं, मी जर या कालीं शेषस्वरूप असतों तर मीं अनेक मुखांनीं तुझें अधरामृत पान केलें असतें. तशाच तुझ्या आलिंगनसमर्थी विरोचनपौत्र जो सहस्त्रार्जुन त्या सारख्या सहस्त्र भुजांची इच्छा मला होत्ये. आणि तुझ्या सर्वांग सौंदर्याच्या अवलोकनाविषयीं मला इंद्रासारखे सहस्त्र नेत्र असते तर मीं तुझें पूर्ण सौंदर्य अवलोकन केलें असतें. ७९

उत्साहसंपन्नमदीर्घसूत्रं क्रियाविधिज्ञं व्यसनेष्वसक्तम्॥ शूरं कृतज्ञं दृढसौहृदं च लक्ष्मीः स्वयं याति निवासहेतोः ॥ ७६ ॥

अर्थ—जो पुरुष सर्वदा आनंदांत असून दीर्घसूत्री नसेल, आणि सर्व सत्कर्मांचा विधि जाणणारा, दुर्व्यसनाविषयीं आसक्त नसणारा, शूर, कोणीही केलेले उपकार किंवा सेवा यांस जाणणारा व सज्जनाशीं दृढ स्नेहानें वर्तणारा अशा मानवाच्या सन्निध वास करण्याच्या हेतूनें लक्ष्मी स्वयमेव प्राप्त होत्ये. ॥ ७६ ॥

तक्षकस्य विषं दंते मक्षिकाया विषं शिरः ॥ वृश्चिकस्य विषं पुच्छं सर्वांगे दुर्जनो विषम् ॥ ७७ ॥

अर्थ—तक्षका (सर्प) च्या दंतांत विष आहे. मक्षिकेचे मस्तकीं विष आहे. तसेंच वृश्चिकाचें (विंचू) पुच्छ विष असून दुर्जन तर सर्वांगीं केवल विषमूर्तिच असतो. ॥ ७७ ॥

तृणं ब्रह्मविदः स्वर्गस्तृणं शूरस्य जीवितम् ॥ जिताक्षस्य तृणं नारी निस्पृहस्य तृणं जगत् ॥७८॥

अर्थ—ब्रह्मवेत्त्यास स्वर्ग तृणासमान तुच्छ असतो. शूरास जीवित तृणप्राय असतें. जितेंद्रिय पुरुषास स्त्री तृणतुल्य असत्ये, आणि निस्पृह लोकांस सकल जगत तृणवत् असतें. ॥ ७८ ॥

पलाशकुसुमभ्रांत्या शुकतुंडे पतत्यलिः ॥ सोपि जंबू-
फलभ्रांत्या तमलिं धर्तुमिच्छति ॥ ७९ ॥

अर्थ—कोणी एके समयीं एका वृक्षशाखेवर राघु बसला होता त्याची चोंच आरक्तवर्ण असल्यामुळें त्यावर पलाश पुष्पाच्या (पळसाच्या फुलाच्या) भ्रांतीनें त्या राघूच्या तोंडावर वरून भ्रमर आला. ते समयीं भ्रमराच्या कृष्णवर्णामुळें त्यावर जंबूफलाची (जांबूळाची) भ्रांति राघूस होऊन तो राघूही त्या भ्रमरास धरावें अशी इच्छा करूं लागला. ॥ ७९ ॥

अव्यवसायिनमलसं दैवपरं साहसाच्च परिहीनम् ॥
प्रमदा पतिमिव वृद्धं नेच्छति लक्ष्मीरुपस्थातुम् ॥ ८० ॥

अर्थ—निरुद्योगी, आळशी, केवळ दैवावरच स्वस्थ बसणारा, कोणत्याही साहस कृत्याविषयीं न झटणारा, अशा पुरुषाजवळ वास करण्यास लक्ष्मी कधींच इच्छीत नाहीं. यास दृष्टांत असा कीं, जशी तरुण स्त्री वृद्ध पतीस इच्छित नाहीं तद्वत्. ॥ ८० ॥

आलस्यं स्त्रीसेवा सरोगता जन्मभूमिवात्सल्यम् ॥
संतोषो भीरुत्वं षड् व्याघाता महत्त्वस्य ॥ ८१ ॥

अर्थ—आलस्य, स्त्रीसेवा, रोगीपणा, जन्मभूमीचा त्याग न करणें, संतोष व भीरुत्व (भित्रेपणा) हे सहा दोष महत्व प्राप्त होण्यास प्रतिबंधक आहेत. ॥ ८१ ॥

तुंगभद्रापयःपानं तुंगसौधाधिरोहणम् ॥ तुंगस्तनीप-
रिष्वंगस्तुंगस्य तपसः फलम् ॥ ८२ ॥

अर्थ—तुंगभद्रा नदीचें उदक प्राशन, उंच राजमंदिरादिकांवरील वास, तसेंच उच्च स्तन आहेत जिचे अशा सुंदरीचें आलिंगन, हीं प्राप्त होणें हें श्रेष्ठ तपाचें फल आहे ॥ ८२ ॥

त्यजति ॥ स भवति सद्यो वंद्यः सर्षप इव सर्व-
लोकस्य ॥ ८९ ॥

अर्थ—जो पुरुष ज्यात्यादिकांनीं लघु व अंतःकरणांत तीक्ष्ण असूनही स्वकीय सदाचरणाचा त्याग जर करीत नाहीं तर तो तितक्यानेंच तत्काल सर्व लोकांस वंद्य होतो. यास दृष्टांत असा कीं, जसे सर्षप (मोहोऱ्या) स्वतः हलके व अभ्यंतरीं तीक्ष्ण आहेत तथापि ते सर्व लोकांस ग्राह्य आहेत तद्वत्. ॥ ८९ ॥

ऊर्जितं सज्जनं दृष्ट्वा द्वेष्टि नीचः पुनः पुनः ॥ क-
वलीकुरुते स्वस्थं विधुं दिवि विधुंतुदः ॥ ९० ॥

अर्थ—अतिशयित श्रीमान् झालेल्या सज्जनास पाहून नीच पुरुष त्याचा द्वेष वारंवार करतो. याचें उदाहरण असें कीं, चंद्रास व्यथा देणारा राहु आकाशस्थित चंद्रास आकाशांत जसा ग्रासितो तद्वत्. ॥ ९० ॥

एकस्य कर्म संवीक्ष्य करोत्यन्यो विगर्हितम् ॥ गता-
नुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः ॥ ९१ ॥

अर्थ—एकाचें कर्म पाहून अन्य पुरुषही तसेंच निंद्य कर्म करितो. यावरून असें सिद्ध होतें कीं, लोकांची प्रवृत्ति केवल अंधपरंपरेसारखी गतानुगतिक ह्मणजे एक गेला त्याच्यामागून दुसरा गेला अशा रीतीनें असते. परंतु विचारपूर्वक परमार्थाचरणाविषयीं नसते. ॥ ९१ ॥

कुदेशमासाद्य कुतोऽर्थसंचयः कुपुत्रमासाद्य कुतो ज-
लांजलिः ॥ कुगेहिनीं प्राप्य गृहे कुतः सुखं कुशि-
ष्यमध्यापयतः कुतो यशः ॥ ९२ ॥

अर्थ—भिकार देशाचा आश्रय केल्यावर धनसंचय कोठून होणार आहे ? तसाच आपले उदरीं कुपुत्र जन्मल्यावर आपणास मरणोत्तर त्याचे हातून तिलांजली कोठून मिळणार ? तशीच व्यभिचारादि दोषांनीं कुत्सित अशी पत्नी प्राप्त झाली असतां त्या गृहांत भर्ता आदिकरून तिच्यासंबंधि वर्गास सुख कसें होईल, व निंद्य शिष्यास अध्ययन सांगणाऱ्या गुरूस लोकांत यश कसें प्राप्त होईल. ॥ ९२ ॥

क्वचिद्रुष्टः क्वचित्तुष्टो रुष्टस्तुष्टः क्षणे क्षणे ॥ अ-
व्यवस्थितचित्तस्य प्रसादोपि भयंकरः ॥ ९३ ॥

अर्थ—कदाचित् रुष्ट होणारा व कदाचित् संतुष्ट होणारा असून क्षणांत रुष्ट होणारा व क्षणांत संतुष्ट होणारा अशा अव्यवस्थित चित्तयुक्त पुरुषाची प्रसन्नता झाली तरी ती आपणास भय उत्पन्न करणारीच होईल असें समजावें. ॥ ९३ ॥

क्षते प्रहारा निपतंत्यभीक्ष्णं धनक्षये वर्धति जा-
ठराग्निः ॥ आपत्सु वैराणि समुल्लसंति छिद्रेष्वन-
र्था बहुलीभवंति ॥ ९४ ॥

अर्थ—अंगास एकादें क्षत पडलें असतां त्यावर वारंवार लागतें. तसाच आपणाजवळच्या धनाचा क्षय झाला असतां जठराग्नि अतिशयित प्रदीप्त होतो. आणि आपणास आपत्ति प्राप्त झाल्या असतां त्या कालांत लोकांचीं वैरें उपस्थित होतात व कांहीं एकादें छिद्र (न्यूनता) प्राप्त झाली असतां त्या संधींत बहुत अनर्थ प्राप्त होतात. ॥ ९४ ॥

ग्रासादपि तदर्धं च कस्मान्नोदीयतेऽर्थिषु ॥ इ-
च्छानुरूपो विभवः कदा कस्य भविष्यति ॥ ९५ ॥

अर्थ—आपणास अनुकूल असलेल्या ग्रासांतून अर्धा भाग याचकांस कां देत नाहीं; कारण आपल्या इच्छेनुरूप वैभव कोणास कोणत्या कालीं प्राप्त होत असतें, तर असें मनोरथानुसार ऐश्वर्य कोणासही कदापि प्राप्त होत नाहीं. ॥ ९५ ॥

चलं चित्तं चलं वित्तं चले जीवितयौवने ॥ चलाचलमिदं सर्वं कीर्तिर्यस्य स जीवति ॥ १६ ॥

अर्थ–चित्त चंचल व द्रव्य चंचल असून जीवित (आयुष्य) व तारुण्य हीं चंचल आहेत. आणि सर्व चराचर विश्व चंचलच आहे. तस्मात् ज्याची कीर्ति देहत्यागानंतरही या लोकीं यावत्कालपर्यंत स्थिर असते तावत्कालपर्यंत तो जिवंतच आहे असें समजावें. ॥ १६ ॥

राजनि विदुषां मध्ये वरसुरतानां समागमे स्त्रीणाम् ॥ साध्वसदूषितहृदयो वाक्पटुरपि कातरो भवति॥१७॥

अर्थ–राजासमीप, विद्वज्जनांमध्यें, उत्तम सुरत चतुर स्त्रियांजवळ ज्याचें अंतःकरण भयानें व्याप्त झालें तो वाक्चातुर्यानें युक्त असला तरी भयभीत होतो. ॥ १७ ॥

दानाय लक्ष्मीः सुकृताय विद्या चिंता परब्रह्मविनिश्चयाय ॥ परोपकाराय वचांसि यस्य वंद्यस्त्रिलोकीतिलकः स एव ॥ १८ ॥

अर्थ– ज्यानें आपली संपत्ति केवल दानार्थ योजलेली असून विद्या सुकृत संपादनार्थ योजिला आहे, आणि ज्यानें आपली चिंता परब्रह्माच्या निश्चयाविषयींच योजलेली असून आपलीं भाषणें सर्वदा परोपकाराविषयींच योजलेलीं असतील, असा जो पुरुष तोच त्रैलोक्यांत भूषणभूत असल्यामुळें सर्वांस वंद्य होतो. ॥ १८ ॥

निष्कलंककलयैकयापि यः संयुतः स खलु पूज्यते जनैः ॥ भद्र पश्य जलजोपि धार्यते शंकरेण शिरसा निशाकरः ॥ १९ ॥

अर्थ--जो पुरुष एक कां होईना पण पूर्ण विद्येनें युक्त आहे तरी, तो सर्व जनांना निश्चयेंकरून पूज्य होतो. याचा अनुभव पहा कीं, हे कल्या-

करूपा, चंद्र जलापासून उत्पन्न झाला असूनही कलंकरहित एका क-
लेनें युक्त आहे यास्तव शंकरांनीं स्वमस्तकावर धारण केला आहे. ॥९९॥

अदाता पुरुषस्त्यागी धनं संत्यज्य गच्छति ॥ दा-
तारं कृपणं मन्ये मृतोप्यर्थं न मुंचति ॥ १०० ॥

अर्थ—जो पुरुष दान करीत नाहीं तो स्वधनाचा त्याग करून परलोकीं जातो यावरून तोच उदार असें समजावें. आणि जो पुरुष दाता असतो त्यास मी कृपण मानतों. कारण तो मरण पावला तरी स्वधनाचा त्याग करीत नाहीं. स्वधनापासून प्राप्त झालेला पुण्यांश बरोबर घेऊन जातो. ॥ १०० ॥

करोति निर्मलाधारस्तुच्छस्यापि महर्घताम् ॥ अंबु-
नो बिंदुरल्पोपि शुक्तौ मुक्ताफलं भवेत् ॥ १०१॥

अर्थ—लोकांत जो निर्दोष आश्रय असतो तो हीन वस्तूलाही महामूल्य युक्तत्व प्राप्त करितो. याचें उदाहरण असें कीं, उदकाचा बिंदु अल्प असला तरी तो शुक्तींत (शिंपींत) प्रविष्ट झाला असतां तिच्या आश्रयानें मुक्ताफलरूप होतो. ॥ १०१ ॥

पतितोपि राहुवदने तरणिर्बोधयति पद्मखंडानि ॥
भवति विपद्यपि महतामंगीकृतवस्तुनिर्वाहः॥१०२॥

अर्थ—सूर्य राहूच्या मुखांत जरी पडला तरी तो कमलसमुदायांस विकासित करतोच. यावरून असें सिद्ध होतें कीं, महाजनांस विपत्ति प्राप्त झाली तरी त्यांनीं ज्या वस्तूचा पूर्वीं अंगीकार केला त्या वस्तूंचा ते निर्वाह करितात. ॥ १०२ ॥

हस्तादपि न दातव्यं गृहादपि न दीयते ॥ परोपक-
रणार्थाय वचने किं दरिद्रता ॥ १०३ ॥

अर्थ—जर स्वहस्तानें याचकास दान करवत नाहीं आणि गृहांतूनही कोणाकडून देववत नाहीं तर परोपकारार्थ आपलें वचन जर उपयोगी पडत

असेल तर त्याविषयीं दरिद्रता करणें हें काय ? तर हें अनुचित आहे. असें करूं नये. ॥ १०३ ॥

भोज्यं भोजनशक्तिश्च रतिशक्तिर्वरास्त्रियः ॥ विभ-
वो दानशक्तिश्च नाल्पस्य तपसः फलम् ॥ १०४ ॥

अर्थ—सर्व भोज्य पदार्थ, असून पूर्ण भोजनशक्ति, रतीविषयींची उत्कृष्टशक्ति, उत्तम स्त्रिया व वैभव असून तदनुसार दान करण्याची शक्ति बुद्धीला असणें हें सर्व अल्प तपाचें फल नाहीं तर महत्तपाचें फल आहे. ॥ १०४ ॥

पातालतः किमु सुधारसमानयामि निष्पीड्य चंद्र-
ममृतं किमुता हरामि ॥उद्यत्प्रचंडकिरणं किमु वा-
रयामि कीनाशपाशमनिशं कीमु चूर्णयामि ॥१०५॥

अर्थ—लंकेत युद्ध प्रसंगीं रावणाची शक्ति लक्ष्मणास लागून तो मूर्च्छित पडला तेव्हां सुषेणानें सांगितलें कीं, द्रोणागिरिवरील औषधींचा रस सूर्योदयाच्या आंत लक्ष्मणास दिला तर हा वांचेल नाहींपेक्षां हा सूर्योदयानंतर वांचणार नाहीं. ते समयीं जांबवानादिक वानरांनीं मारुतीची स्तुति करतांच त्याची उत्साहशक्ति प्रगट होऊन तो भाषण करूं लागला कीं, याकालीं लक्ष्मणासाठीं मी पातालांतून अमृतरस आणूं काय? अथवा चंद्रमंडलाचें निष्पीडन (पिळणें) करून अमृत आणूं ? किंवा सूर्योदयाच्या भीतीस्तव मी सूर्योदयाचेंच निवारण करूं काय ? किंवा लक्ष्मणास ज्या यमपाशापासून भय आहे त्या यमपाशाचें सर्वदा चूर्ण करूं काय ? १०५

युधिष्ठिरः कस्य पुत्रो, गंगा वहति कीदृशी ॥ हं-
सस्य शोभा का वास्ति, धर्मस्य त्वरिता गतिः॥१०६॥

अर्थ—युधिष्ठिर हा कोणाचा पुत्र आहे ? गंगा कशी वहात आहे ? तशीच हंसाला शोभा कोणती आहे ? अशा तीन चरणांतील प्रश्नांचीं उत्तरें चतुर्थ चरणांत आहेत तीं अशीं कीं, युधिष्ठिर हा यमधर्माचा पुत्र असून

गेला त्वरित वाहल्ये, व हंसास शोभादायक त्याची गति (गमन) आहे. ॥ १०६ ॥

भोजनांते च किं पेयं जयंतः कस्य वै सुतः ॥ क-
थं विष्णुपदं प्रोक्तं तक्रं शक्रस्य दुर्लभम् ॥१०७॥

अर्थ—मनुष्यांनीं भोजनाच्या अंतीं प्राशन काय करावें? जयंत हा कोणाचा पुत्र आहे तसेंच विष्णूचें पद कसें आहे, या तीन चरणांतील प्रश्नांचीं उत्तरें अशीं कीं, भोजनाच्या अंतीं तक्र प्राशन करावें, जयंत हा इंद्राचा पुत्र आहे आणि विष्णुपद दुर्लभ आहे. ॥ १०७ ॥

मंदं निक्षिपते पदानि परितः शब्दं समुद्वीक्षते, ना-
नार्थाहरणं च कांक्षति मुदाऽलंकारमाकर्षति ॥
आदत्ते सकलं सुवर्णनिचयं धत्ते रसांतर्गतं दोषान्वे-
षणतत्परो विजयते चोरोपमः सत्कविः ॥ १०८ ॥

अर्थ—जो उत्तम कवि असतो तो चोरासारख्या कृतीनें युक्त असतो. तें असें कीं, जसा कवि आपल्या कवितेंत सुबंत व तिङंत इत्यादिक पदें युक्तीनें योजितो, तसा चोर आपले पाय हळू हळू पुढें टाकतो आणि कवि स्वकवितेंत योजण्याचा पदांत हा शब्द शुद्ध आहे किंवा अशुद्ध आहे याचा उत्तम रीतीनें विचार करतो व चोर जेथें चोरी करण्यास जातो तेथें आसमंतात् काय शब्द होतो त्याचा विचार करीत असतो. त्याचप्रमाणें कवि श्लेष व ध्वनित इत्यादि प्रकारांनीं अनेकार्थांचें संपादन करतो आणि चोर सुवर्ण रौप्य इत्यादिक द्रव्यांच्या हरणाची इच्छा करतो. तसाच कवि स्वकवितेंत उपमादिक अलंकाररचना प्रीतीनें आणण्याची इच्छा करितो व चोर कंकणादिक अलंकार हर्षानें हरण करतो आणि कवि स्वकवितेंत उत्तम सकल वर्णांचा संग्रह करतो, व चोर सर्व सुवर्ण समुदायास हरण करतो. तसाच कवि शृंगारादि रसमिश्रित कवितेची रचना करतो व चोर आपण हरण केलेलें द्रव्य पृथ्वींत गुप्त करून ठेवितो. आणि कवि, काव्यसंबंधि

शोभनाविषयीं तत्पर असतो व चोर रात्रीं चोरीचा मार्ग शोधण्याविषयीं आसक्त असतो अशा रीतीनें उभयतांचें साद्दश्य आहे. ॥ १०८ ॥

अहो दुर्जनसंसर्गान्मानहानिः पदे पदे ॥ पावको लोहसंगेन मुद्गरैरभिहन्यते ॥ १०९॥

अर्थ—दुर्जनाच्या संसर्गानें सज्जनाची मानहानी पदोपदीं होते. याचें उदाहरण असें कीं, अग्नि लोकवंद्य असतांही लोहाच्या (लोखंडाच्या) संगामुळें घणाच्या घावास पात्र होतो तस्मात् हें महदाश्चर्य आहे.॥१०९॥

परिपूर्णेपि तटाके काकः कुंभोदकं पिबति ॥ अनुकूलेपि कलत्रे नीचः परदारलंपटो भवति ॥११०॥

अर्थ—तटाक (तळें) जरी उदकानें आसमंतात् पूर्ण भरलें असलें तरी त्याचा त्याग करून जसा काकपक्षी कुंभांतील जल प्राशन करतो तद्वत् नीच लोक स्वस्त्रीचा त्याग करून परस्त्रीलंपट होतात. ॥ ११० ॥

सर्वलोकपरितोषकारिणि स्वर्धुनीविमलवारिणि स्थिते ॥ पूतिगंधवति पल्वलोदके सूकरः सुखमतीव मन्यते ॥ १११ ॥

अर्थ—सर्व लोकांचा संतोष करणारें भागीरथीचें निर्मल उदक असून त्याचा त्याग करून सूकर (डुकर) दुर्गंधयुक्त अल्प जलाशयांतील उदकांत अत्यंत सुख मानतो. यावरून दुर्जनाचा स्वभाव अमंगल असतो असें जाणावें ॥ १११ ॥

कृपणेन समो दाता न भूतो न भविष्यति ॥ अस्पृशन्नेव वित्तानि यः परेभ्यः प्रयच्छति ॥ ११२ ॥

अर्थ—कोणी कवि अशी उत्प्रेक्षा करतो कीं, जो कृपण असतो त्यासमान दाता पूर्वीं झाला नाहीं व पुढेंही होणार नाहीं; कारण तो स्वकीय द्रव्यास स्पर्श न करतां इतरांस देतो. ॥ ११२ ॥

कृपणो धनलोभेन स्वां भार्यां नाभिगच्छति ॥ अ-
स्यां यो जायते पुत्रः स मे वित्तं हरेदिति ॥११३॥

अर्थ—तसाच जो कृपण असतो तो धनलोभामुळें आपल्या भार्येशीं संग करीत नाहीं; कारण इच्या उदरीं जो पुत्र होईल तो माझें वित्त हरण करील ही भीति त्याच्या मनांत असते. ॥ ११३ ॥

प्राप्तानपि नो लभते भोगान् भोक्तुं स्वकर्मभिः कृ-
पणः ॥ द्राक्षाप्रपाकसमये मुखपाको भवति का-
कानाम् ॥ ११४ ॥

अर्थ—कृपणांस स्वकर्मांनीं भोग प्राप्त झाले तरी ते विषय उपयोग करण्याविषयीं प्राप्त होत नाहींत. यास दृष्टांत असा कीं, द्राक्षें पक्क होण्याच्या समयीं काक पक्ष्यांस मुखरोग प्राप्त होतो. ॥ ११४ ॥

अनुकूले विधौ देयं यतः पूरयिता हरिः ॥ प्रतिकूले
विधौ देयं यतः सर्वं हरिष्यति ॥ ११५ ॥

अर्थ—दैव अनुकूल असतां मनुष्यांनीं दान अवश्य करावें; कारण आपलें कांहीं न्यून पडलें असतां त्याचें पूरण करणारा हरि समर्थ आहे. तसेंच दैव प्रतिकूल झालें असतांही दानच करावें. कारण आपण स्वधनाचें रक्षण करीत असलों तरी प्रतिकूल झालेलें दैव सर्वस्व हरण करणारच आहे. तस्मात् त्या प्रतिकूलकालीं दान कां करूं नये, आणि किंबहुना त्या दान पुण्यानें दैवाची प्रतिकूलता न्यून होईल एतदर्थ मनुष्यांनीं आपणास उभय लोकीं कल्याण प्राप्त होण्यासाठीं सर्वदा दान करीत असावें.॥११५॥

दातव्यं भोक्तव्यं सति विभवे संचयो न कर्तव्यः
॥ पश्येह मधुकरीणां संचितमर्थं हरंत्यन्ये ॥११६॥

अर्थ—आपणास वैभव अनुकूल असलें तर दान व उपभोग या दोन प्र-

कारांनीं त्याचा विनियोग करावा परंतु संचय न करावा; कारण याविषयीं असा अनुभव अवलोकन कर कीं, मधुमक्षिकांनीं प्रत्येक पुष्पांतून संपादन करून एकत्र संचित करून ठेवलेल्या मधु (मध) रूप पदार्थास जसे अन्य लोकच हरण करतात तद्वतच संपत्तीची अवस्था जाणावी.

सर्वस्य हि परीक्ष्यंते स्वभावा नेतरे गुणाः ॥ अतीत्य
हि गुणान् सर्वान् स्वभावो मूर्ध्नि वर्तते ॥ ११७ ॥

अर्थ—सर्व लोकांच्या स्वभावांची परीक्षा मुख्यत्वें केली जाते. परंतु इतर गुणांची तशी परीक्षा करण्यांत येत नाहीं; कारण स्वभाव सर्व गुणांचें अतिक्रमण करून त्यांच्या मस्तकावर वर्ततो असा तो सर्व गुणापेक्षां श्रेष्ठ आहे. ॥ ११७ ॥

न धर्मशास्त्रं पठतीति कारणं न चापि वेदाध्ययनं
दुरात्मनः ॥ स्वभाव एवात्र तथातिरिच्यते यथा प्र-
कृत्या मधुरं गवां पयः ॥ ११८ ॥

अर्थ—जो मनुष्य स्वभावतः दुष्टच असतो त्यानें धर्मशास्त्र पठन केलें किंवा वेदाध्ययन केलें तरी तीं त्यास सौजन्यप्राप्तीला कारण होत नाहींत; कारण त्याचा तो दुष्ट स्वभावच त्या अध्ययनादि साधनांपेक्षां अधिक प्रबल असतो, यास्तव त्यापुढें त्या साधनांचें कांहीं एक चालत नाहीं. आणि याविषयीं दृष्टांतही असा आहे कीं, गाईचें दुग्ध स्वभावसिद्ध मधुर असून तें जसें अन्यथा करण्यास शक्य नाहीं तद्वत्. ॥ ११८ ॥

वाणी रसवती यस्य भार्या पुत्रवती सती ॥ लक्ष्मी-
र्दानवती यस्य सफलं तस्य जीवितम् ॥ ११९ ॥

अर्थ—ज्याची वाणी रसयुक्त असून भार्या साध्वी असून पुत्रवती असेल व ज्याच्या संपत्तीचा दानक्रियेंत व्यय होत असेल त्या मानवाचें जीवित सफल जाणावें. ॥ ११९ ॥

कार्येषु मंत्री करणेषु दासी भोज्येषु माता शयनेषु
रंभा ॥ धर्मानुकूला क्षमया धरित्री भार्या च षाड्गुण्य-
वतीह दुर्लभा ॥ १२० ॥

अर्थ—कार्याविषयीं प्रधानासारिखी दक्ष, गृहकृत्य करण्यास दासीसमान तत्पर, भोज्य पदार्थांविषयीं मातेसमान, शयनस्थानीं रंभेसारखी रूपादि-गुणांनीं उत्कृष्ट, धर्माविषयीं अनुकूल व क्षमारूप गुणानें केवळ धरित्रीसारखी सहनशील, अशा सहा गुणांनीं युक्त भार्या या लोकांत दुर्लभ असते. ॥ १२० ॥

द्वाविमावंभसि क्षेप्यौ कंठे बध्वा दृढां शिलाम् ॥ ध-
निनं चाप्रदातारं दरिद्रं चातपस्विनम् ॥ १२१ ॥

अर्थ—जो धनिक असून दान करीत नाहीं, आणि जो दरिद्री असून तप करीत नाहीं असे जे दोघे आहेत, त्या उभयतांच्या गळ्यांत दृढ शिला बांधून त्यांस उदकांत बुडवावें. ॥ १२१ ॥

भागीरथी कथंभूता कामिनी प्राह किं प्रियम् ॥ ए-
कमेवोत्तरं देहि शास्त्रलौकिकभाषया ॥ १२२ ॥

अर्थ—भागीरथी कशी आहे आणि कामिनी स्त्री प्रिय भाषण काय बोलली या दोन्ही प्रश्नांचें एकच उत्तर शास्त्रीय (संस्कृत) व लौकिक (प्राकृत) अशा दोन भाषांनीं दिलें तर तें मला पाहिजे. तें असें कीं, मलापहा भागीरथी मलाची म्हणजे पापाची अपहारक (नाशक) आहे आणि कामिनी मला पहा असें प्रिय भाषण पुरुषास करिते. ॥ १२२ ॥

बुधः कीदृग्वचो ब्रूते को रोगी कश्च नास्तिकः ॥
कीदृक्चंद्रं नमस्यंति किं सूत्रं पाणिनेर्वद ॥ १२३ ॥

अर्थ—पंडित कसें भाषण करतो? रोगी कोण असतो? नास्तिक कोण असतो? कशा प्रकारच्या चंद्रास नमस्कार करतात? या चार प्रश्नांचीं उत्तरें ज्या पाणिनीच्या व्याकरण सूत्रांत आहेत तें सूत्र कोणतें तें सांगा? तर याविषयीं "अर्थवदधातुरप्रत्ययः प्रातिपदकं" हेंच सूत्र आहे यांत चार उत्तरें आहेत तीं अशीं कीं, विद्वान् जें भाषण करतात तें अर्थवत् ह्मणजे अर्थयुक्त असतें. जो अधातु ह्मणजे ज्याच्या शरीरांत धातु नसतो तो रोगी होय. ज्यास कोणताही अदृष्ट गोष्टींचा प्रत्यय येत नाहीं तो नास्तिक होय. व प्रातिपदकं ह्मणजे प्रतिपदा शब्दानें येथें द्वितीया ग्रहण करावी. कारण प्रतिपदेला चंद्रदर्शन होत नाहीं, यास्तव प्रतिपदेला ह्मणजे द्वितीयेला उदयास आलेल्या चंद्रास सर्व लोक नमस्कार करतात. ॥ १२३ ॥

किं त्राणं जगतां न पश्यति च कः के देवताविद्विपः, किं दातुः करभूषणं निरुदरः कः किं पिधानं दृशाम् ॥ के खे खेलनमाचरंति सुदृशां किं चारुताभूषणं, बुध्या ब्रूहि विचार्य सूक्ष्ममतिमंस्त्वेकं द्वयोरुत्तरम् ॥ १२४ ॥

अर्थ—जगाचें त्राण कशाच्या योगानें होत असून कोण अवलोकन करीत नाहीं, तसेंच देवतांचा द्वेष करणारे कोण? दान करणाराच्या हस्ताचें भूषण कोणतें? आणि उदरानें रहित असा कोणता प्राणी? नेत्रांस आच्छादन करणारा पदार्थ कोणता? त्याचप्रमाणें आकाशांत क्रीडा करणारे कोण? सुंदर नेत्रयुक्त स्त्रियांच्या सौंदर्यास शोभविणारें काय? अशा या आठ प्रश्नांतील दोन प्रश्नांचें उत्तर एक असावें अशा रीतीनें या सर्व प्रश्नांचीं चार उत्तरें हे सूक्ष्म बुद्धिमंता, तूं बुद्धीनें विचार करून दे. असे प्रश्न केले तेव्हां अंधः, दानवाः, तमः व वयः अशीं चार उत्तरें दिलीं त्यांतील तात्पर्य असें कीं, अंधः ह्मणजे अन्न व अंधप्राणी त्यांत अन्नानें जगाचें जीवन होतें व अंध पहात नाहीं. दानवाः ह्मणजे

दैत्य व दानोदक त्यांत दैत्य हे देवांचे द्वेषी आहेत व दानोदक दात्याच्या हस्तास भूषणरूप आहे. तमः ह्मणजे राहु व अंधकार त्यांत राहु हा उदररहित आहे व अंधकार नेत्रांस आच्छादन करणारा आहे. वयः ह्मणजे पक्षी व तारुण्य त्यांत पक्षी आकाशांत क्रीडा करीत असतात व तारुण्य हें सुंदर स्त्रियांस शोभविणारें केवल भूषणास्पदच आहे. ॥१२४॥

ये जाते व्यसने निराकुलधियः संपत्सु नाभ्युन्नताः,
प्राप्ते नैव पराङ्मुखाः प्रणयिनि प्राणप्रयोगैरपि॥ ह्रीमंतः स्वगुणप्रकाशनविधावन्यस्तुतौ पंडितास्ते
भूमंडलमंडनैकतिलकाः संतः कियंतो जनाः॥ १२५॥

अर्थ—जे दुःख प्राप्त झालें तरी अंतःकरणांत व्याकुल होत नाहींत. संपत्ति प्राप्त झाल्या तथापि उन्मत्त होत नाहींत. आणि कोणी विनयानें शरण आला असतां त्याच्या संरक्षणाविषयीं स्वकीय प्राणांचा विनियोग करणें प्राप्त झालें तरी जे पराङ्मुख होत नाहींत, तसेच जे आपले गुण लोकांत प्रकाशित करण्याविषयीं लज्जित होतात व इतरांच्या स्तुतीविषयीं पंडित असणारे असे भूमंडळास शोभविण्याविषयीं एकच तिलकरूपानें वर्तणारे असे संतजन पृथ्वीवर किती आहेत ते सांगा? तर असे साधु अत्यंत विरल आहेत हें त्यांतील तात्पर्य आहे. ॥ १२५ ॥

ये दीनेषु दयालवः स्पृशति यानल्पोपि न श्रीमदो,
व्यग्रा ये च परोपकारकरणे हृष्यंति ये याचिताः॥
स्वस्थाः संति च यौवनोन्मदमहाव्याधिप्रकोपेपि ये,
तैः स्तंभैरिव सुस्थिरैः किल भरक्रांता धरा धार्यते॥ १२६॥

अर्थ—जे, दीनांवर दया करण्याविषयीं तत्पर असून त्यांस अल्पही श्रीमद स्पर्श करूं शकत नाहीं आणि परोपकार करण्याविषयीं सर्वदा व्यग्र

असून जे आपणांस कोणी याचना केली असतां हर्षयुक्त होतात. तसेच जे तारुण्यवयसंबंधी उन्मादरूप महा व्याधीचा प्रकोप झाला तरी स्वस्थचित्त असतात, अशा उत्तम स्थिर स्तंभसदृश त्या सत्पुरुषांच्या योगानें या भारामुळें म्लान झालेल्या पृथ्वीचें धारण निश्चयेंकरून होतें. ॥ १२६ ॥

शरदि न वर्षति गर्जति वर्षति वर्षासु निःस्वनो मेघः ॥ नीचो वदति न कुरुते वदति न साधुः करोत्येव ॥ १२७ ॥

अर्थ—जसा शरदृतूंतील मेघ केवल गर्जना मात्र करीत असून पर्जन्यवृष्टि करीत नाहीं, आणि वर्षाऋतूंतला मेघ किमपि शब्द न करितां वृष्टि करितो, तद्वतच जो नीच असतो तो केवल वाचाल पंचविशी मात्र करतो, परंतु कार्य करीत नाहीं, आणि जो साधु आहे तो वृथा भाषण न करितां कार्य करितो. ॥ १२७ ॥

पिबंति नद्यः स्वयमेव नांभः स्वयं न खादंति फलानि वृक्षाः ॥ नादंति सस्यं खलु वारिवाहाः परोपकाराय सतां विभूतयः ॥ १२८ ॥

अर्थ—नद्या स्वतःच उदक प्राशन करीत नाहींत, वृक्ष आपलीं फळें स्वयें भक्षण करीत नाहींत, आणि मेघ स्वयमेव धान्य भक्षीत नाहींत. तस्मात् सत्पुरुषांच्या संपत्ति स्वार्थार्थ नसून केवल परोपकारार्थच असतात. ॥१२८॥

सुजनं व्यजनं मन्ये चारुवंशसमुद्भवम् ॥ आत्मानं च परिभ्राम्य परतापनिवारणम् ॥ १२९ ॥

अर्थ—जो सुजन असतो त्यास व्यजनाची (पंख्याची) साम्यता आहे असें मी मानितों; कारण विंझणा जसा उत्तम वंशा (वेळू) पासून उत्पन्न

झालेला असून आपल्या समोंवतीं भ्रमण पावून वायूच्या योगानें इतर जनांच्या तापाचें निवारण करतो, तद्वतच सुजनही उत्तम वंशांत ह्मणजे महत्कुलांत उत्पन्न होऊन त्या व्यजनासारखाच स्वतः श्रम करून परकीय जनांच्या दुःखाचें निवारण करीत असतो. ॥ १२९ ॥

अनंतरत्नप्रभवस्य यस्य हिमं न सौभाग्यविलोपि जातम् ॥ एकोहिं दोषो गुणसन्निपाते निमज्जतींदोः किरणेष्विवांकः ॥ १३० ॥

अर्थ—जो हिमालय पर्वत अनंत रत्नांचें उत्पत्तिस्थान आहे यास्तव हिम (बर्फ) हें त्याच्या पूज्य महत्वाचा अभाव करण्याविषयीं समर्थ झालें नाहीं. कारण जर एकच दोष असला तर तो अनेक गुणांच्या समुदायाखालीं आच्छादित होतो. यास दृष्टांत असा कीं, यद्यपि चंद्राच्या ठिकाणीं हरिणाकृति एक कलंक आहे तथापि तो त्याच्या बहु किरणांत झांकला जातो. ॥ १३० ॥

एको हि दोषो गुणसन्निपाते निमज्जतींदोरिति यो बभाषे ॥ न तेन दृष्टं कविना समस्तं दारिद्र्यमेकं गुणकोटिहारि ॥ १३१ ॥

अर्थ—जर एकादा दोष असला तर तो बहुत गुणांच्या समुदायाखालीं चंद्राच्या कलंकासारखा आच्छादित होतो असें जो बोलला, त्या कवीनें जगांतील सकल स्थिति अवलोकन केली नाहीं असें सिद्ध होतें. याचें उदाहरण असें कीं, एकच दारिद्र्यरूप दोष कोटिगुणांचा नाशक होतो असें अनुभव सिद्ध आहे. ॥ १३१ ॥

वेपथुर्मलिनं वक्त्रं दिना वाग्गद्गदः स्वरः॥मरणे यानि चिन्हानि तानि चिन्हानि याचके ॥ १३२ ॥

अर्थ—अंगीं कंप उत्पन्न होऊन मुख निस्तेज होणें आणि दीनवाणी निघत असून मुखांतून गद्गदाकारयुक्त स्वर येणें, अशीं हीं जीं मरणकालीं चिन्हें होणारीं तीं याचकाच्या ठिकाणीं याचना करण्याचें समयीं दृष्टोत्पत्तीस येतात. त्यावरून याचना मरण दुःखासम होय. ॥ १३२ ॥

तावत्सर्वगुणालयः पटुमतिः साधुः सतां वल्लभः, शूरः सच्चरितः कलंकरहितो मानी कृतज्ञः कविः ॥ दक्षो धर्मरतःसुशीलगुणवांस्तावत्प्रतिष्ठान्वितो यावन्निष्ठुरवज्रपातसदृशं देहीति नो भाषते ॥ १३३ ॥

अर्थ—यावत्कालपर्यंत हा मनुष्य कठोर वज्रपातासमान देही (दे) असें भाषण करीत नाहीं तावत्कालपर्यंतच तो सर्व गुणांचा स्थानभूत, उत्कृष्ट बुद्धिमान्, साधु, सज्जनास प्रिय, शूर, उत्तम चरित्रानें युक्त, कलंकरहित, मानी, कृतज्ञ, कवि, सर्व कार्याविषयीं दक्ष, धर्माविषयीं तत्पर, सुशीलरूप गुणानें युक्त व प्रतिष्ठित अशा गुणांनीं संपन्न असतो. ॥ १३३ ॥

दक्षिणाशाप्रवृत्तस्य प्रसारितकरस्य च ॥ तेजस्तेजस्विनोऽर्कस्य ह्रियतेऽन्यस्य का कथा ॥ १३४ ॥

अर्थ—दक्षिणायनांत सूर्य दक्षिण दिशेकडे गमन करण्यास प्रवृत्त होऊन त्यानें आपले किरण प्रसारित केले तरी त्या तेजस्वी सूर्याचें तेज देखील क्षीण होतें, तेव्हां दक्षिणा ग्रहण करण्याच्या आशेनें प्रवृत्त होऊन ज्यानें आपला हस्त दात्यापुढें पसरला त्या अन्य मानवाचें तेज न्यून होण्याची कथा काय सांगावयाची आहे. ॥ १३४ ॥

तावन्महतां महती यावत्किमपि हि न याच्यते लोकम् ॥ बलिमनुयाचनसमये श्रीपतिरपि वामनो जातः ॥ १३५ ॥

अर्थ–जावत्कालपर्यंत लोकांस कांहीं याचना करीत नाहींत तावत्काल पर्यंतच मोठ्याचें मोठेपण रहातें. याचा अनुभव असा कीं, विष्णूनें ज्याकाळीं बलीस याचना केली, त्यासमयीं तो लक्ष्मीपति असूनही त्यास आकृतीनें ऱ्हस्व होऊन त्यापुढें हात पसरून लघुत्व स्वीकारणें प्राप्त झालें. ॥ १३५ ॥

यत्राभ्यागतदानमानचरणप्रक्षालनं भोजनं, सत्सेवा
पितृदेवतार्चनविधिः सत्यं गवां पालनम् ॥ धान्याना-
मपि संग्रहो न कलहश्चित्तानुरूपा प्रिया, दृष्टा प्राह
हरिं वसामि कमला तस्मिन् गृहे निश्चला ॥१३६॥

अर्थ–जेथें अभ्यागतास दान, मान, चरणप्रक्षालनपूर्वक भोजन मिळत असून साधूंची सेवा, पितर व देवता यांचा पूजाविधि सतत चालला आहे, तसेंच जेथें सत्याचरण, गायींचें पालन, विपुल धान्य असून कलह नसणें, व पतीच्या मनोधर्माप्रमाणें वागणारी भार्या असें ज्या स्थलीं आहे त्या गृहीं मी निश्चलत्वानें (स्थिरत्वानें) वास करितें असें हर्षानें लक्ष्मी हरीस भाषण करिते. ॥ १३६ ॥

गवाशनानां स शृणोति वाक्यमहं हि राजन् पठितं मु-
नीनाम् ॥ न तस्य दोषो न च मद्गुणो वा संसर्गजा
दोषगुणा भवंति ॥ १३७ ॥

अर्थ–" कोणी एका राजास कोणी दोन राघू आणून नजर केले. तेव्हां राजानें त्यांतील एक राघू न्यायसभेंत ठेविला व एक राघू बाहेरील शिपायांच्या देवडीवर ठेविला, पुढें एके दिवशीं ते दोन्ही राघू राजानें आपल्यापाशीं परीक्षेकरितां आणविले. तेव्हां न्यायसभेंतील राघूनें नीतियुक्त भाषणें केलीं आणि देवडीवरील राघूनें त्या शिपायांचीं ऐकलेलीं उद्धटपणाचीं अमर्याद भाषणें केलीं असतां राजानें त्याचा वध करण्याविषयीं

आज्ञा केली. " ते समयीं तो न्यायसमास्थापित राघू राजास म्हणतो कीं, हे राजन्, तो राघू नित्य गोमांस भक्षण करणाऱ्या उन्मत्त जनांचीं जीं भाषणें ऐकतो तीं तो बोलला, आणि मी निरंतर मननशील पंडितांचीं जशीं वाक्यें श्रवण करितों तशीं बोललों, यास्तव यांत त्याचा दोष नाहीं व माझाही गुण नाहीं; तस्मात् गुण व दोष हे जशी संगती असेल तसे त्या संगतीपासून प्राप्त होतात. ॥ १३७ ॥

अहो नु कष्टः सततं प्रवासः ततोतिकष्टःपरगे-
हवासः ॥ कष्टाधिका नीचजनस्य सेवा ततोतिक-
ष्टा धनहीनता च ॥ १३८ ॥

अर्थ--सतत प्रवास करणें हें निश्चयेंकरून दुःखकारक असल्यामुळें खेदास्पद आहे, आणि परगृहीं वास करणें हें प्रवासापेक्षां अति कष्टकारक आहे, तशीच नीच सेवा अति दुःखकारक आहे, परंतु त्यापेक्षांही निर्धनता अति कष्टदायक आहे. ॥ १३८ ॥

सीमंतिनीषु का शांता राजा कोभूद्गुणोत्तमः ॥ वि-
द्वद्भिः का सदा वंद्या अत्रैवोक्तं न बुध्यते ॥१३९॥

अर्थ--स्त्रियांत शांत कोण ? सर्व गुणांनीं उत्तम असा राजा पूर्वीं कोण झाला होता ? आणि विद्वज्जनांनीं सर्वदां वंदन करण्यास योग्य वस्तु कोणती? या प्रश्नांचें उत्तर यांतच गुप्त असून समजत नाहीं तें असें कीं, ही अंतर्लापिका असल्यामुळें याच्या तिन्ही चरणांतील प्रत्येक चरणाचीं आद्यंत अक्षरें मिळविलीं असतां त्या तिन्ही प्रश्नांचीं उत्तरें त्या चरणांतच आहेत तीं अशीं कीं, स्त्रियांत श्रेष्ठ सीता, उत्तम गुणयुक्त राजा राम व विद्या विद्वजनांस सर्व काळीं वंद्य आहे. ॥ १३९ ॥

पर्जन्य इव भूतानामाधारः पृथिवीपतिः ॥ विकले-
पि हि पर्जन्ये जीव्यते नतु भूपतौ ॥ १४० ॥

अर्थ—पृथ्वीपति राजा पर्जन्यासमान किंबहुना त्यापेक्षांही अधिक रीतीनें प्राणिमात्रांस आधार आहे; तो असा कीं, पर्जन्य कदाचित् पडला नाहीं तरी राजा लोकांस जसा वांचवितो, तसा राजा नसून केवल पर्जन्यच लोकरक्षणाविषयीं समर्थ नाहीं. ॥ १४० ॥

सत्यानृता च परुषा प्रियवादिनी च हिंस्रा दयालुरपि चार्थपरावदान्या ॥ नित्यव्यया प्रचुरनित्यधनागमा च वेश्यांगनेव नृपनीतिरनेकरूपा ॥ १४१ ॥

अर्थ—राजनीति वेश्येसारखी अनेकरूप आहे. ती अशी कीं, स्थलविशेषानुरूप क्वचित् सत्य, क्वचित् असत्य, कदाचित् तीक्ष्ण, प्रियभाषणयुक्त, घातक शक्तीनें वर्तणारी, तशीच योग्याविषयीं दयालुही असते. आणि अर्थसंपादक, बहुदानाविषयीं समर्थ, निरंतर व्ययानें युक्त असून नित्यशः बहुद्रव्य प्राप्तिकारक अशी असते. ॥ १४१ ॥

आज्ञा कीर्तिः पालनं ब्राह्मणानां दानं भोगो मित्रसंरक्षणं च ॥ येषामेते षड्गुणा न प्रवृत्ताः कोर्थस्तेषां पार्थिवोपाश्रयेण ॥ १४२ ॥

अर्थ—आज्ञा, कीर्ति, ब्राह्मणांचें पालन, दान, उपभोग व मित्रांचें संरक्षण हे सहा गुण ज्यांच्या अंगीं प्राप्त झाले नाहींत, त्यांनीं राजाश्रय करून तरी काय फल आहे ? कांहीं नाहीं. ॥ १४२ ॥

न कश्चिच्चंडकोपानामात्मीयो नाम भूभुजाम् ॥ होतारमपि जुव्हानं स्पृष्टो दहति पावकः ॥ १४३ ॥

अर्थ—राजे अत्यंत कोपिष्ट असतात, यास्तव, त्यांस कोणीही अपराध करणारा आत्मीय बुद्धीनें प्रिय नसतो. यास दृष्टांत,—होता नामक ऋत्विज होम करीत असतां त्यानें जरी अग्नीस स्पर्श केला तरी तो त्यासही दग्ध करतो. ॥ १४३ ॥

राजंस्त्वद्दर्शनेनैव गलंति त्रीणि तत्क्षणात् ॥ रिपोः
शस्त्रं कवेर्दैन्यं नीविबंधो मृगीदृशाम् ॥ १४४ ॥

अर्थ—हे राजा, तुझ्या दर्शनानेंच तत्क्षणीं तीन पदार्थ गलित होतात, ते-असे कीं, शत्रूच्या हस्तांतील शस्त्र, कविजनाचें दैन्य व मृगनयना स्त्रियांचें अंगावरील नेसलेलें वस्त्र. ॥ १४४ ॥

इच्छेद्यस्तु सुखं निवस्तुमवनौ गच्छेत् स राज्ञः
सभाम्, कल्याणीं गिरमेव संसदि वदेत् कार्यं वदध्या-
त् कृती ॥ आक्रोशात् धनमर्जयेदधिपतेरावुर्जयेद्दुर्ल-
भान्, कुर्वीतोपकृतिं जनस्य जनयेत् कस्यापिनाप-
क्रियाम् ॥ १४५ ॥

अर्थ—ज्या मानवास सुखेंकरून पृथ्वीवर वास करण्याविषयीं इच्छा असेल त्यानें राजसभेंत जात जावें, आणि त्या सभेंत नीतिशास्त्र संमत अशींच सुंदर भाषणें बोलत असून तेथील कार्यही त्या कुशल पुरुषानें करीत जावें. तसेंच तेथें त्याणें इतरांस दुःख न देतां धन संपादन करावें आणि त्या कामांत राजप्रिय लोकांपासून द्रव्य मिळण्याची इच्छा करूं नये, आणि सर्व जनांवर उपकारच करीत असावें. अपकार कोणावरही करूं नये ॥ १४५ ॥

किं तया क्रियते धेन्वा या न दोग्ध्री न गर्भिणी ॥
कोऽर्थः पुत्रेण जातेन यो न विद्वान् न धा-
र्मिकः ॥ १४६ ॥

अर्थ—जी धेनु गर्भिणी होत नाहीं व दूधही देत नाहीं त्या गायीच्या योगानें जसा आपला कांहीं एक उपयोग होत नाहीं, तद्वत् जो पुत्र विद्वान् नाहीं अथवा धार्मिकही नाहीं, अशा पुत्राच्या जन्माच्या योगानें मातापितरांस काय फल आहे. ॥ १४६ ॥

यस्य पुत्रो न वै विद्वान् न शूरो न च धार्मिकः ॥
अप्रकाशं कुलं तस्य नष्टचंद्रेव शर्वरी ॥ १४७ ॥

अर्थ—ज्याचा पुत्र विद्वान् किंवा शूर अथवा धार्मिक असाही नसेल त्याचें कुल लोकांत प्रकाशास येत नाहीं. यास दृष्टांत असा कीं, चंद्ररहित रात्रीं जशी शोभत नाहीं तद्वत्. ॥ १४७ ॥

एकोपि गुणवान् पुत्रो निर्गुणैः किं शतेन तैः ॥ ए-
कश्चंद्रो गजश्चक्षुः नक्षत्रैः किं प्रयोजनम् ॥ १४८ ॥

अर्थ—एक पुत्र असला तरी तो गुणवान् असावा आणि गुणहीन शंभर पुत्र असले तरी त्यांच्या योगानें कांहींही फल नाहीं, यास दृष्टांत असा कीं, चंद्र जरी एकच आहे तरी तो सर्व जगास प्रकाशक आहे. आणि नक्षत्रें बहुत असून त्यांचा प्रकाश नाहीं. ॥ १४८ ॥

एकेन हि सुवृक्षेण पुष्पितेन सुगंधिना ॥ वासितं
तद्वनं सर्वं सुपुत्रेण कुलं यथा ॥ १४९ ॥

अर्थ—वनांत एकच उत्तम वृक्ष पुष्पांनीं व सुगंधानें युक्त असा असला, तर त्याच्या योगानें तें सर्व वन सुवासयुक्त जसें होतें, तद्वत् सुपुत्राच्या योगानें सर्व कुल आनंदित होतें. ॥ १४९ ॥

पदन्यासो गेहाद्बहिरहिफणारोपणसमो निजावासा-
दन्यद्भवनमपरद्वीपतुलितम् ॥ वचो लोकालभ्यं कृपण-
धनतुल्यं मृगदृशः, पुमानन्यः कांताद्विधुरिव चतुर्थी-
समुदितः ॥ १५० ॥

अर्थ—आपल्या गृहद्वाराच्या बाह्य प्रदेशीं पाय ठेवणें जिला सर्पाच्या फणेवर पाय ठेवल्यासारखें वाटत आहे, स्वगृहांतून अन्यगृहीं जाणें जिला द्वीपांतरीं जाण्यासमान भासतें, तसेंच ज्या मृगनयनेचें भाषण कृपणाच्या

धनासारखें लोकांस सर्वदां दुर्लभ असतें, त्याचप्रमाणें जिला स्वभर्त्याहून अन्य पुरुष गणेश चतुर्थीला उदयास आलेल्या चंद्रासमान अदर्शनीय असतो. ती स्त्री पतिव्रता जाणावी. ॥ १५० ॥

सा भार्या या प्रियं ब्रूते स पुत्रो यत्र निर्वृतिः ॥ त-
न्मित्रं यत्र विश्वासः स देशो यत्र जीविका॥१५१॥

अर्थ–जी स्त्री प्रिय भाषण करते ती उत्तम स्त्री जाणावी. ज्या पुत्रापासून सुख होतें तोच सुपुत्र समजावा. ज्यावर विश्वास ठेवणें योग्य असेल तोच आपला मित्र जाणावा, आणि जेथें आपली उपजीविका चालेल तोच स्वदेश जाणावा. ॥ १५१ ॥

जीवति जीवति नाथे मृते मृता या मुदायुता मुदिते
॥सहजस्नेहरसाला कुलवनिता केन तुल्या स्यात्१५२

अर्थ–पति जिवंत असला तरच जी वांचते आणि तो मृत झाला असतां मरते आणि तो हर्षयुक्त असला तर आनंदित असते व जिचें अंतःकरण पतीविषयीं स्वाभाविक प्रेमयुक्त असतें, अशी पतिव्रता स्त्री कोणाशीं समान होईल तर तिला सर्वापेक्षा श्रेष्ठ जाणावी. ॥ १५२ ॥

का शंभुकांता किमु नेत्ररम्यं शुकार्भकः किं कुरुते
फलानि ॥ मोक्षस्य दाता स्मरणेन को वा गौरी मुखं
चुंबति वासुदेवः ॥ १५३ ॥

अर्थ–शंभुकांता कोणती तर गौरी, नेत्रांस रम्य काय दिसतें तर मुख, राघूचा बालक फलांस काय करितो तर चुंबति (चुंबन करतो.) आणि स्मरणमात्रानें मोक्ष दाता कोण आहे तर असा वासुदेव आहे. ॥ १५३ ॥

प्रसन्नाः कांतिहारिण्यो नानाश्लेषविचक्षणाः ॥ भवं-
ति कस्यचित् पुण्यैर्मुखे वाचो गृहे स्त्रियः ॥१५४॥

अर्थ—प्रसन्न वदन असून स्वरूप शोभेनें मनास हरण करणाऱ्या व अनेक प्रकारच्या आलिंगनाविषयीं कुशल अशा स्त्रिया पुण्यानेंच एकाद्याच्या गृहीं प्राप्त होतात. तशाच उत्तानार्थानें युक्त असून भाषण गुणानें लोकांच्या मनास हरण करणाऱ्या आणि नाना प्रकारच्या श्लेषाविषयीं कुशल अशा वाणी पुण्यांनींच एकाद्याच्या मुखांत वास करतात. ॥ १५४ ॥

धवलयति समग्रं चंद्रमा जीवलोकं किमिति निजकलंकं नात्मसंस्थं प्रमार्ष्टि ॥ भवति विदितमेतत् प्रायशः सज्जनानां, परहितनिरतानामादरो नात्मकार्ये ॥ १५५ ॥

अर्थ—चंद्रमा, समग्र जीव लोकांस (मृत्यु लोकांस) आपल्या शुभ्र प्रकाशानें प्रकाशित करतो आणि आपल्या मंडलांतील स्वकीय कलंकास दूर कां करीत नाहीं, तर हें गुह्य प्रायशः सज्जनांसच विदित असतें. तें असें कीं, परहिताविषयीं जे आसक्त असतात त्यांच्या मनांत आत्मकार्याविषयीं आदर नसतो. ॥ १५५ ॥

अहो महत्त्वं महतामपूर्वं विपत्तिकालेपि परोपकारः ॥ यथास्यमध्ये पतितोपि राहोः कलानिधिः पुण्यचयं ददाति ॥ १५६ ॥

अर्थ—विपत्तिकालींही परोपकार करणें हें महात्म्यांचें महत्व अपूर्व असल्यामुळें आश्चर्यकारक आहे. तें असें कीं, चंद्र राहूच्या मुखांत पतन पावला तरी तो त्या कालींही लोकांस पुण्य समुदाय देतो. ॥ १५६ ॥

विद्यया विनयावाप्तिः सा चेदविनयावहा ॥ किं कुर्मः कं प्रति ब्रूमो गरदायां स्वमातरि ॥ १५७ ॥

अर्थ—विद्येनें विनयप्राप्ति होते असें असून ती जर उद्धटपणा देण्याला कारण होईल तर आह्मीं काय करावें, व कोणास सांगावें! यास दृष्टांत असा

कीं, आपली माता जर आपणास विष देईल तर त्या बालकानें काय करावें किंवा कोणाला सांगावें. ॥ १५७ ॥

सर्वद्रव्येषु विद्यैव द्रव्यमाहुरनुत्तमम् ॥ अहार्यत्वादन-
र्घ्यत्वादक्षयत्वाच्च सर्वदा ॥ १५८ ॥

अर्थ—सर्व द्रव्यांत विद्या हें श्रेष्ठ धन आहे असें ह्मणतात; कारण विद्या कोणासही हरण करतां येत नसून ही अमोल्य व सर्वदां नाशरहित आहे. ॥ १५८ ॥

किं कुलेन विशालेन विद्याहीनस्य देहिनः ॥ अकु-
लीनोपि विद्यावान् दैवैरपि स पूज्यते ॥ १५९ ॥

अर्थ—जो विद्याहीन प्राणी, तो महत्कुलांत जन्मलेला असला तरी का महत्व प्राप्त होणार आहे! आणि कोणी पुरुष महत्कुलांत जन्मला नसून-ही विद्वान् जर असला तर देवही त्यास मान देतात. ॥ १५९ ॥

वीणेव श्रोत्रहीनस्य लोलाक्षीव विचक्षुषः ॥ व्यसोः
कुसुममालेव विद्या स्तब्धस्य निष्फला ॥ १६० ॥

अर्थ—कर्णहीनास जसा वीणानाद निष्फल; मृगनयना स्त्री जशी अंधापुढें व्यर्थ, पुष्पमाला जशी गतप्राण देहास व्यर्थ तशी नम्रतारहित पुरुषास विद्या निष्फल, आहे. ॥ १६० ॥

गतेपि वयसि ग्राह्या विद्या सर्वात्मना बुधैः ॥ यद्य-
पि स्यान्न फलदा सुलभा सान्यजन्मनि ॥ १६१ ॥

अर्थ—वृद्ध वय प्राप्त झालें तरी त्यांतही ज्ञात्यांनीं सर्व प्रयत्नानें विद्या संपादन करावी; कारण ती या जन्मांत फलद्रूप न झाली तरी ती अन्य जन्मीं येण्याविषयीं सुलभ होईल. ॥ १६१ ॥

शुनः पुच्छमिव व्यर्थं जीवितं विद्यया विना ॥ न गु-
ह्यगोपने शक्तं न च दंशनिवारणे ॥ १६२ ॥

अर्थ—श्वानाचें पुच्छ त्याच्या गुह्य इंद्रियाच्या आच्छादनाविषयीं समर्थ नसून त्यास दंश करणाऱ्या प्राण्यांच्या निवारणासही उपयोगी पडत नाहीं. तस्मात् तें जसें व्यर्थ, तसें विद्याहीन पुरुषाचें जीवित व्यर्थ जाणावें. ॥ १६२ ॥

सरसापि कवेर्वाणी हरिनामांकिता यदि ॥ सादरं गृह्यते तज्ज्ञैः शुक्तिर्मुक्तान्विता यथा ॥ १६३ ॥

अर्थ—कवीची वाणी रसयुक्त असूनही ती जर हरिनामानें युक्त असेल तर हरिनामाचे रसज्ञ लोक त्या वाणीचा स्वीकार आदरानें करतात. यास दृष्टांत असा कीं, जसे परीक्षक लोक मुक्ताफलांनीं युक्त शिंपल्याचें ग्रहण करतात. तद्वत्. ॥ १६३ ॥

महता पुण्यपुण्येन क्रीतेयं कायनौस्त्वया ॥ पारं दुःखोदधेर्गन्तुं तर यावन्न भिद्यते ॥ १६४ ॥

अर्थ—हे मानवा, तूं महत् पुण्यरूप द्रव्यानें ही शरीररूप नौका विकत घेतली आहेस, यास्तव ही जावत्कालपर्यंत भंगली नाहीं तावत्कालपर्यंत तूं आतां दुःखसमुद्ररूप संसाराच्या परतीरास जाण्यासाठीं या नौकेंतच बसून आपलें कार्य साध जा. ॥ १६४ ॥

यावद्वित्तोपार्जनशक्तस्तावन्निजपरिवारो रक्तः ॥ तदनु च जरया जर्जरदेहे वार्तां कोपि न पृच्छति गेहे ॥ १६५ ॥

अर्थ—हा मनुष्य जावत्कालपर्यंत द्रव्योपार्जनाविषयीं समर्थ असतो तावत्कालपर्यंतच त्याचा स्वकीय परिवार त्यावर प्रीति करतो. पुढें कालेंकरून त्याचा देह जरेनें जर्जर झाला असतां कोणीही गृहांत त्याला विचारीत नाहीं. ॥ १६५ ॥

सरसा सालंकारा सुपदन्यासा सुवर्णमयमूर्तिः ॥ आर्या तथैव भार्या न लभ्यते पुण्यहीनेन ॥ १६६ ॥

अर्थ–रसयुक्त, उपमादि अलंकारसहित, उत्तम पदांच्या रचनेनें युक्त व अकारादि उत्कृष्ट वर्णांनीं ग्रथित अशी आर्या पुण्यहीन पुरुषाचे हातून जशी होत नाहीं, तद्वत् रसिक, भूषणांनीं युक्त, उत्तम रीतीनें पाऊल ठेवणारी व उत्कृष्ट गौरवर्ण; स्वरूपानें शोभणारी अशी भार्याही पुण्यहीन पुरुषास प्राप्त होत नाहीं. ॥ १६६ ॥

कामं क्रोधं लोभं मोहं त्यक्त्वात्मानं पश्य हि कोहं ॥
आत्मज्ञानविहीना मूढास्ते पच्यंते नरकनिगूढाः॥१६७॥

अर्थ–काम, क्रोध, लोभ व मोह यांचा त्याग करून मी कोण आहें याचा विचार करून आत्मस्वरूप अवलोकन कर; कारण जे आत्मज्ञानहीन मूढ असतात, ते नरकांत पतन पावून यातना भोगतात. ॥ १६७ ॥

धैर्यं यस्य पिता क्षमा च जननी शांतिश्चिरंगेहिनी, सत्यं
सूनुरयं दया च भगिनी भ्राता मनःसंयमः ॥ शय्या
भूमितलं दिशोपि वसनं ज्ञानामृतं भोजनं, एते यस्य
कुटुंबिनो वद सखे कस्माद्भयं योगिनः ॥ १६८ ॥

अर्थ–धैर्यच ज्याचा पिता, क्षमा हीच ज्याची जननी, तशीच शांति हीच कोणी एक ज्याची बहुकालची पत्नी, सत्य हाच कोणीएक पुत्र, दया हीच भगिनी, मनाचा निग्रह हाच बंधु, भूमितल हीच शय्या, दिशाच वस्त्र, ज्ञानामृताचें भोजन, असे हे ज्याचे कुटुंबी आहेत, त्या योग्यास भय कोठून होईल बरें? तें मित्रा तूं सांग? ॥ १६८ ॥

कविः करोति पद्यानि लालयत्युत्तमो जनः ॥ तरुः प्र-
सूते पुष्पाणि मरुद्वहति सौरभम् ॥ १६९ ॥

अर्थ–कवि श्लोक करतो आणि जे उत्तम जन आहेत ते त्या श्लोकांतील रसाचें लालन करितात. यास दृष्टांत असा कीं, वृक्ष पुष्पांस प्रसवतो आणि त्याचा सुगंध जसा वायु ग्रहण करतो तद्वत्. ॥ १६९ ॥

अतिरमणीये काव्ये पिशुनोऽन्वेषयति दूषणान्येव
॥अतिरमणीये वपुषि व्रणमिव हि मक्षिकानिकरः १७०

अर्थ—काव्य अतिसुंदर जरी असलें तरी दुर्जन त्यांत दूषणांचाच शोध करीत असतो. यास दृष्टांत असा कीं,—अति रमणीय शरीर असून त्यावर मक्षिकासमुदाय जसा व्रणाचा शोध करीत असतो तद्वत्. ॥ १७० ॥

मातेव रक्षति पितेव हिते नियुंक्ते, कांतेव चापि
रमयत्यपनीय खेदम् ॥लक्ष्मीं तनोति वितनोति च दि-
क्षु कीर्तिं, किं किं न साधयति कल्पलतेव वि-
द्या ॥ १७१ ॥

अर्थ—विद्या मातेसमान रक्षण करीत असून पित्यासारखी हिताविषयीं योजना करते आणि खेदास दूर करून कांतेप्रमाणें चित्तास रमवितही असते. त्याचप्रमाणें गृहांत लक्ष्मीचा विस्तार करिते व सर्व दिशांत कीर्ति पसरविते. फार काय सांगावें कीं, विद्येपासून कोणत्या अर्थाची सिद्धि होत नाहीं ? सर्व अर्थांची सिद्धि होते. तर विद्या कल्पलतेसारखी सर्व पुरुषार्थ सिद्धिदायक आहे. ॥ १७१ ॥

तीर्थानामवलोकनं परिचयः सर्वत्र वित्तार्जनं, नाना-
श्चर्यनिरीक्षणं चतुरता बुद्धेः प्रशस्ता गिरः ॥ एते सं-
ति गुणाः प्रवासविषये दोषोस्ति चैको महान् यन्मु-
ग्धामधुराधराधरसुधापानं विना स्थीयते ॥ १७२ ॥

अर्थ—तीर्थांचें अवलोकन, सर्वत्र परिचय, द्रव्यसंपादन, अनेक आश्चर्य दर्शन, बुद्धीला चातुर्य व सुंदर वाणी हे गुण प्रवासांत आहेत; परंतु त्यांत एक महान् दोष आहे तो असा कीं, सुंदर स्त्रियांच्या मधुर अधरामृत प्राशनावांचून प्रवासांत रहावें लागतें. ॥ १७२ ॥

व्यापारांतरमुत्सृज्य वीक्षमाणो वधूमुखम् ॥ यो गृहेष्वे-
व निद्राति दरिद्राति स दुर्मतिः ॥ १७३ ॥

अर्थ—अन्य उद्योग सोडून जो निरंतर स्त्रीमुख अवलोकन करीत असून स्वगृहांतच निद्रा करितो तो दुर्बुद्धि पुरुष दरिद्री होतो. ॥ १७३ ॥

त्रिदोषशमनार्थाय त्वयि मज्जन्ति मानवाः ॥ त्वं करो-
षि चतुर्दोषं कथं गंगे न लज्जसि ॥ १७४ ॥

अर्थ—हे गंगे, तुझ्या ओघांत मानव त्रिदोषशमनार्थ स्नान करीत असून तूं त्यांस चार दोषांनीं युक्त करितेस तरी तुला कशी लज्जा वाटत नाहीं; या बाह्यार्थानें निंदा दिसते, परंतु अंतर्गत अर्थानें ही स्तुति आहे, ती अशी कीं, दोष शब्द भुजांचा वाचक असल्यामुळें चार दोषांनीं ह्मणजे चार भुजांनीं युक्त करून सारूप्यमुक्ति देतेस. ॥ १७४ ॥

अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभता ॥ अशुचि-
त्वं निर्दयत्वं स्त्रीणां दोषाः स्वभावजाः ॥ १७५ ॥

अर्थ—असत्य, साहस, माया (कपट), मूर्खत्व, अतिलोभ, अशुचित्व व निर्दयत्व हे स्त्रियांच्या अंगीं स्वभावसिद्धच दोष आहेत. ॥ १७५ ॥

यः कुलाभिजनाचारैरतिशुद्धः प्रतापवान् ॥ धार्मि-
को नीतिकुशलः स स्वामी युज्यते भुवि ॥१७६॥

अर्थ—कुल, देश व आचार यांनीं अतिशुद्ध असून प्रतापी, धार्मिक व नितीविषयीं कुशल असा जो तोच राजा पृथ्वीपालनाविषयीं योग्य जाणावा. ॥ १७६ ॥

उदनिषदः परिपीता गीतापि च हंत मतिपथं नीता
॥तदपि न हा विधुवदना मानससदनाद्बहिर्याति १७७

अर्थ—उपनिषद्भागांचा अभ्यास केला तरीच गीता ही बुद्धिमार्गांत नि-

श्रयानें आथिली, तथापि चंद्रमुखी स्त्री माझ्या मानस सदनांतून अद्यापि बाहेर आज नाहीं आली काय करें करावें. ॥ १७७ ॥

जीवन्तोपि मृताः पंच व्यासेन परिकीर्तिताः ॥ दरिद्रो व्याधितो मूर्खः प्रवासी नित्यसेवकः ॥ १७८ ॥

अर्थ—दरिद्री, रोगी, मूर्ख, प्रवासी व नित्यसेवक (नित्य चाकरी करणारा) हे पांच जिवंत असूनही मेल्यासारखे आहेत असें व्यासांनीं सांगितलें आहे. ॥ १७८ ॥

शिरसा धार्यमाणोपि सोमः सौम्येन शंभुना ॥ तथापि कृशतां धत्ते कष्टः खलु पराश्रयः ॥ १७९ ॥

अर्थ—सौम्यरूप शंभूनीं आपल्या शिरावर चंद्र धारण केला आहे, तथापि तो कृशता धारण करतो; यावरून असें सिद्ध झालें कीं, अन्याचा आश्रय करणें निश्चयेंकरून दुःखकारक आहे. ॥ १७९ ॥

करान् प्रसार्य रविणा दक्षिणाशावलंबिना ॥ न केवलमनेनात्मा दिवसोपि लघुः कृतः ॥ १८० ॥

अर्थ—स्वकीय कर (किरण) पसरून दक्षिण दिशेचा आश्रय करणाऱ्या या रवीनें आपला आत्माच केवल लघु केला असें नाहीं, तर त्यानें त्या दक्षिणायनांतील दिवसही लघु केला. तस्मात् दक्षिणेच्या आशेनें हात पसरणाऱ्या मानवास लघुत्व येतें यांत आश्चर्य काय आहे. ॥ १८० ॥

आलोकवंतः संत्येव भूयांसो भास्करादयः ॥ चंद्रमा एव तु ग्रावद्रावकर्मणि कर्मठः ॥ १८१ ॥

अर्थ—सूर्यादिक बहुत ग्रह प्रकाशयुक्त आहेत परंतु त्या सर्वांत चंद्रमाच पाषाणांस[१] द्रव आणण्याविषयीं समर्थ आहे. ॥ १८१

१ जे चंद्रकांत नांवाचे पाषाण आहेत त्यांवर चंद्रकिरण पडले असतां त्यांपासून उदकाचे पाझर चालतात.

निष्पीडितो यद्यपि दैवयोगाद्विशाकरस्त्वापि विधुंतुदेन ॥ तथापि पीयुषविशेषवर्षी सुधाकरः कैरवकाननेषु ॥ १८२ ॥

अर्थ—यद्यपि चंद्रास दैवयोगामुळें राहूनें पीडा दिली तथापि तो अमृतकिरणचंद्र, कमलवनांवर विशेषेंकरून अमृतवृष्टि करितो. यावरून साधुजन संकटांत असले तरी ते लोकांवर उपकारच करितात. ॥ १८२ ॥

क्षीणः क्षीणः समीपत्व पूर्णः पूर्णोतिदूरताम् ॥ उपैति मित्राद्यश्चंद्रो युक्तं तन्मलिनात्मनः ॥ १८३ ॥

अर्थ—चंद्र कलांनीं जों जों क्षीण होत जातो तों तों सूर्याच्या समीप येतो आणि जों जों कलांनीं पूर्ण होत जातो, तों तों सूर्यापासून अत्यंत दूर जातो. हें त्यास युक्तच आहे, कारण तो मलिनात्मा (कलंकयुक्त) आहे. ॥ १८३ ॥

दोषाकरोपि कुटिलोपि कलंकितोपि मित्रावसानसमये विहितोदयोपि ॥ चंद्रस्तथापि हरवल्लभतामुपैति नैवाश्रितेषु महतां गुणदोषशंका ॥ १८४ ॥

अर्थ—चंद्र दोषाकर, कुटिल, कलंकयुक्त व मित्रावसानसमयीं उदयास येणारा असा आहे तथापि तो शंकराच्या प्रीतीला पात्रभूत आहे. यावरून. असें सिद्ध होतें कीं, महतांनीं ज्यांच्या आश्रय केला, ते त्यांच्या गुणदोषाविषयीं शंका बिलकुल घेत नाहींत. ॥ १८४ ॥

मुंच मुंच सलिलं दयानिधे, नास्ति नास्ति समयो

---

१ रात्रीला करणारा किंवा दोषांची खाणी. २ सूर्यास्तसमयीं अथवा मित्र संकटसमयीं.

विलंबने ॥ अथ चातककुले मृते पुनर्वारि वारिधर किं करिष्यसि ॥ १८५ ॥

अर्थ–हे दयानिधे मेघा, त्वरेनें जल सोड सोड. हा विलंब करण्याचा समय नव्हे कारण तूं जर वृष्टि न केलीस तर चातकपक्ष्यांचें कुल आज तृषेनें मरण पावणार व पावलें तर पश्चात् या उदकाचा काय उपयोग करशील. (तस्मात् ज्यास वैभव अनुकूल असेल त्यानें आपल्या अनन्य अश्रितांस समयीं द्यावें हें तात्पर्य आहे.)

चातकः स्वानुमानेन जलं प्रार्थयतेंबुदात् ॥ सःस्वोदारतया सर्वां प्लावयत्यंबुना महीम् ॥ १८६ ॥

अर्थ–चातक स्वकीय तृषा शांति होण्या पुरतें जल मेघापासून मिळण्यासाठीं त्याची प्रार्थना करितो, आणि तो मेघ आपल्या स्वभावसिद्ध औदार्यानें सर्व पृथ्वीला उदकानें पूर्ण करतो. ॥ १८६ ॥

उपकारिणि विश्रब्धे शुद्धमतौ यः समाचरति पापम् ॥ तं जनमसत्यसंधं भगवति वसुधे कथं वहसि १८७

अर्थ–हे सकलैश्वर्यसंपन्न पृथ्वी, लोकांवर उपकार करणारा असून सर्वांस विश्वासपात्र अशा शुद्धमतियुक्त पुरुषाविषयीं जो पापाचरण करतो, त्या असत्यप्रतिज्ञ दुर्जनास तूं कशीगे आपल्या पाठीवर धारण करितेस ॥ १८७ ॥

वन्हिस्तस्य जलायते जलनिधिः कुल्यायते तत्क्षणात्, मेरुः स्वल्पशिलायते मृगपतेः संघः कुरंगायते ॥ व्यालो माल्यगुणायते विषरसः पीयूषवर्षायते, यस्यागेऽखिललोकवल्लभतमं शीलं समुन्मीलति ॥ १८८ ॥

अर्थ–ज्याच्या अंगीं अतिप्रिय होण्यास योग्य असा उत्तम स्वभाव असेल त्यास अग्नि जलासमान शीतळ होतो. समुद्र तत्क्षणीं अल्प नदीसा-

रखा सुखानें वरून आण्यास शक्य होतो, तसाच मेरु पर्वत अल्प शिलेसारखा सुगम होतो, आणि सिंहसमुदाय हरिणांसारखा अभयंकर होतो. त्याचप्रमाणें सर्पही त्यास पुष्पवत् धारण करण्यास योग्य इतका सौम्य होतो व विषरसही अमृत वृष्टीसारिखा मृत्युभयनाशक होतो. ॥ १८८ ॥

शैलेयेषु शिलातलेषु च गिरेः शृंगेषु गर्तेषु च, श्रीखंडेषु
बिभीतकेषु च तथा पूर्णेषु रिक्तेषु च॥ स्निग्धेन ध्वनिना
ऽखिलेपि जगतीचक्रे समं वर्षतो, वंदे वारिद सार्व-
भौम भवतो विश्वोपकारिव्रतम् ॥ १८९ ॥

अर्थ—हे सार्वभौमरूप मेघा, तुझ्या विश्वोपकारि व्रतास मी वंदन करितों. तें व्रत असें कीं, पर्वतावरील शिलातलें, पर्वत शिखरें, गर्त (खळगे), चंदनवृक्ष, बिभीतक (बेहड्याचे वृक्ष,) तशींच पूर्णस्थळें व रिक्तस्थळें अशा सकल पृथ्वीचक्रांतही स्निग्ध (प्रेमास्पद) ध्वनीनें तूं सर्वत्र संपूर्ण प्राणीजीवनार्थ समान वृष्टि करीत आहेस. ॥ १८९ ॥

दग्धं खांडवमर्जुनेन बलिना दिव्यैर्द्रुमैः सेवितं, दग्धा
वायुसुतेन रावणपुरी लंका पुनः स्वर्णभूः ॥ दग्धः पं-
चशरः पिनाकपतिना तेनाप्ययुक्तं कृतं, दारिद्र्यं जन-
तापकारकमिदं केनापि दग्धं न हि ॥ १९० ॥

अर्थ—पूर्वी बलिष्ठ अर्जुनानें दिव्य वृक्षयुक्त खांडववन दग्ध केलें. तशीच दुसरी गोष्ट अशी कीं, वायुपुत्र मारुतीनें लंकानामक रावणपुरी सुवर्णभूमी असून ती जाळिली. तसाच पिनाकधनुष्य धारण करणाऱ्या शंकरांनीं पंचबाण मदन दग्ध केला, तथापि तें त्यांनीं अयुक्तच केलें. कारण सर्व जनांस तापकारक असें हें दारिद्र्य दुःख कोणीही दग्ध केलें नाहीं, आणि ज्या खांडव वनादिक सुखकारक वस्तु त्या व्यर्थ जाळिल्या. ॥ १९० ॥

संपदि यस्य न हर्षो विपदि विषादो रणे च धीरत्वम्।
तं भुवनत्रयतिलकं जनयति जननी सुतं विरलम् ॥ १९१ ॥

अर्थ—ज्यास संपत्ति प्राप्त झाली तरी हर्ष होत नाहीं, विपत्ति प्राप्त झाली तरी त्या कालांत विषाद होत नाहीं, आणि युद्धप्रसंगीं ज्याच्या अंगीं धैर्य असतें, अशा त्रिभुवन भूषणास्पद विरल पुत्रास जननी प्रसवते. अशा गुणांनीं युक्त पुत्र होणें फार विरळ आहे. ॥ १९१ ॥

अभ्युत्थानमुपागते गृहपतौ तद्भाषणे नम्रता, तत्पा-
दार्पितदृष्टिरासनविधिस्तस्योपचर्या स्वयम् ॥ सुप्ते त-
त्र शयीत तत्प्रथमतो जह्याच्च शय्यामिति प्राच्यैः
पुत्रि निवेदितः कुलवधूसिद्धांतधर्मागमः ॥ १९२ ॥

अर्थ—गृहस्वामी आला असतां, त्यास अभ्युत्थान देऊन त्याशीं भाषण करण्याविषयीं नम्रता धारण करून त्याच्या पायाकडे दृष्टि अर्पण करावी, तसेच त्यास आसन देऊन त्याची सेवा स्वतः करावी, आणि तो निजल्यावर आपण निद्रा करणें व तो उठण्याच्या पूर्वी आपण शय्येचा त्याग करणें असें हें कुलस्त्रीचें सिद्धांतरूप धर्मशास्त्र, हे कन्ये, पूर्वदेशस्थांनीं निवेदन केलें आहे. ॥ १९२ ॥

नामृतं न विषं किंचिदेकां मुक्त्वा नितंबिनीम् ॥ सै-
वामृतलता रक्ता विरक्ता विषवल्लरी ॥ १९३ ॥

अर्थ—एका स्त्रीवांचून या लोकांत अमृत व विष हें कांहीं एक नाहीं. तर स्त्री पुरुषावर प्रीतियुक्त झाली असतां तीच अमृतवल्लीसारखी सुखकारक होते आणि तीच प्रीतीरहित झाली असतां विषमंजरीसमान दुःखदायक होते. ॥ १९३ ॥

अनंकुरितकूर्चकःस तु सितोपलाढ्यं पयः, स एव धृ-
तकूर्चकः सलवणांबुतक्रोपमः ॥ स एव सितकूर्चकः

कथितगुग्गुलोद्वेगकृत, भवंति हरिणीदृशां प्रियतमेषु भावास्त्रयः ॥ १९४ ॥

अर्थ—मृगनयना स्त्रियांस स्वकीय अतिप्रिय पुरुषाविषयीं तीन प्रकारचे भाव होतात. ते असे कीं, ज्यास मुखावर मिशा वगैरे केश उत्पन्न झाले नाहींत तो तर त्यांस खडीसाखर युक्त आटीव दुधासारखा सुखावह होतो. आणि तोच मुखावर केश आले असतां लवण व उदक यांनीं मिश्रित झालेल्या तक्रासमान त्या स्त्रियांस वाटतो, व तोच मुखावर शुभ्र केशांनीं युक्त झाला असतां गुग्गुळाच्या कषायासारखा स्त्रियांच्या मनास त्रासकारक होतो. ॥ १९४ ॥

आकारेण शशी गिरा च परभृत् पारावतश्चुंबने, हंसश्चंक्रमणे समं दयितया रत्यां प्रमत्तो गजः ॥ इत्थं भर्तरि मे समस्तयुवति श्लाघ्योपि नो रोचते, मद्भाग्येन विवाहितः पतिरति स्यान्नैकदोषो यदि ॥ १९५ ॥

अर्थ—आकृतीनें चंद्रासारखा, वाणीनें कोकिलेसमान, चुंबनाविषयीं पारव्यासारखा, चालण्यांत हंसतुल्य स्त्रीसहवर्तमान क्रीडा करण्यांत उत्तम गजासारखा, असा माझा पति सर्व तरुणी स्त्रियांस मान्य जरी आहे, तथापि तो मला रुचत नाहीं; कारण माझ्या दैवानें लग्नाचा पति हा एक दोष जर त्याच्या ठिकाणीं नसता तर बहुत उत्तम झालें असतें. ॥ १९५ ॥

ब्रह्मैव सत्यमखिलं नहि किंचिदस्ति, तस्मान्न मे सखि परावरभेदबुद्धिः ॥ जारे तथा निजवरे सदृशो ऽनुरागो व्यर्थ किमर्थमसतीति कदर्थयंति ॥ १९६ ॥

अर्थ—सर्व ब्रह्मच सत्य आहे त्यावांचून अन्यवस्तु किमपि सत्य नाहीं, यास्तव हे सखि, श्रेष्ठ व नीच इत्यादिक भेदबुद्धि मला सर्वथा नाहीं, अतएव जार व स्वकीयपति यांवर माझी प्रीति समानच आहे. असें शास्त्र

संमत यथार्थ असून लोक व्यर्थ किमर्थ व्यभिचारिणी म्हणून माझा असा धिक्कार करितात. ॥ १९७ ॥

करोति शोभा मलके स्त्रियाः को, दृश्या न कांता
विधिना च कोक्ता ॥ अंगे तु कस्मिन् दहनः पुरारेः
सिंदूरबिंदुर्विधवा ललाटे ॥ १९८ ॥

अर्थ—स्त्रीच्या केशावर शोभा कोणता पदार्थ आणतो, शास्त्रानें कोणती स्त्री अवलोकनाविषयीं अयोग्य सांगितली आहे, शिवाच्या कोणत्या अंगांत अग्नि वास करतो. या तिन्ही प्रश्नांचीं उत्तरें चतुर्थ चरणांत दिलीं आहेत. तीं अशीं कीं, सिंदूरबिंदु स्त्रीच्या केशांस शोभादायक आहे. विधवा दर्शनास अयोग्य असें शास्त्र आहे. अग्नि शंकराच्या ललाटांत रहातो हीं तीन उत्तरें. ॥ १९८ ॥

कं संजघान कृष्णः का शीतलवाहिनी गंगा ॥
के दारपोषणरताः कं बलवंतं न बाधते शीतम् ॥ १९९ ॥

अर्थ—कृष्णानें कोणास मारिलें? कंसास. शीतल उदकवाहिनी कोण? गंगा. स्त्रीच्या पोषणाविषयीं तत्पर कोण असतात? जे शेताच्या पोषणाविषयीं आसक्त असतात ते. शीत कोणास बाधत नाहीं? जो बलवान् किंवा कंबलवान् असेल त्यास. ॥ १९९ ॥

अहं च त्वं च राजेंद्र लोकनाथावुभावपि ॥
बहुव्रीहिरहं राजन् षष्ठीतत्पुरुषो भवान् ॥ २०० ॥

अर्थ—हे राजेंद्रा, मी व तूं हे आपण दोघेही लोकनाथ हें नाम पावलों आहों. परंतु हे राजन्, मी याचक असल्यामुळें माझ्या नामांत लोक आहेत नाथ ज्याचे असा बहुव्रीही समास आहे व तुझ्या नामांत लोकांचा नाथ असा षष्ठीतत्पुरुष समास आहे. ॥ २०० ॥

अधुना मधुकरपतिना गिलितोप्यपकारदंपती येन ॥

भातः स पालये त्वां विकाररहितो विनायको लक्ष्म्याः ॥ २०१ ॥

अर्थ—मु अक्षररहित जो मधुकर पति ह्मणजे मकरपति (नक्र) त्यानें पकाररहित दंपती ह्मणजे दंती (गजेंद्रास) पूर्वी गिळिलें असतां त्यास ज्यानें रक्षिलें तो विकाररहित व वि अक्षररहित असा लक्ष्मीचा विनायक ह्मणजे नायक तुझें पालन करो. ॥ २०१ ॥

अयि कांत पश्य मेघं नहि नहि पापं तवातिपुण्यायाः । नहि नहि पश्य पयोधरमपसारय कंचुकीमुरसः ॥ २०२ ॥

अर्थ—कोणी स्त्री पतीस ह्मणत्ये हे कांत मेघास अवलोकन करा. तेव्हां तो मेघ शब्द न समजतां मे (माझें) अघ (पातक) असा अर्थ मनांत घेऊन तिला ह्मणतो कीं, तूं अतिपुण्यवती असल्यामुळें तूं पातकी नाहींस, तेव्हां ती मेघ शब्द सोडून पुनः बोलली कीं, असें नव्हे, पयोधर पहा, तेव्हां तोही पयोधर शब्दाचा मेघ हा अर्थ सोडून पयोधर ह्मणजे स्तन असा अर्थ मनांत आणून तिला ह्मणाला कीं, तर उरस्थलावरील कंचुकी दूर कर. ॥ २०२ ॥

सर्वस्य द्वे सुमतिकुमती संपदापत्तिहेतू, एको गोत्रे प्रभवति पुमान् यः कुटुंबं बिभर्ति ॥ वृद्धो यूना सह परिचयात् त्यज्यते कामिनिभिः, स्त्री पुंवच्च प्रभवति यदा तद्धि गेहं विनष्टम् ॥ २०३ ॥

अर्थ—सर्वांस दोन प्रकारच्या बुद्धि होतात. त्या अशा कीं, एक सुबुद्धि व दुसरी कुबुद्धि. त्यांतील सुबुद्धि संपत्तिप्राप्तीला कारण असून कुबुद्धि विपत्तीला कारण होते. तसाच कुटुंब पोषण करण्याविषयीं समर्थ असा जो

पुरुष तो वंशांत एकच असतो, आणि विषयासक्त स्त्रियांचा तरुण पुरुषांशीं परिचय झाला असतां त्या वृद्ध पुरुषाचा त्याग करितात. व ज्या गृहांत स्त्री पुरुषासारखी सर्व कार्यांत प्रबल ज्याकालीं होतें, त्याच कालीं तें गृह विनाशोन्मुख झालें असें समजावें. ॥ २०३ ॥

प्राप्तव्यमर्थं लभते मनुष्यो दैवोपि तं लंघयितुं न
शक्तः ॥ तस्मान्न शोचामि न विस्मयो मे यदस्म-
दीयं नहि तत् परेषाम् ॥ २०४ ॥

अर्थ—मनुष्यास दैवयोगानें मिळणारें धन प्राप्त होतें त्याचें उलंघन करण्याविषयीं देवही समर्थ नाहीं. यास्तव जें आह्मास मिळणारें असेल तें इतरांस मिळणार नाहीं. अतएव मी त्याविषयीं शोक करीत नाहीं, व मला विस्मयही नाहीं. ॥ २०४ ॥

मा धाव मा धाव विनैव दैवं, नो धावनं साधनमस्ति
लक्ष्म्याः ॥ चेद्धावनं साधनमस्ति लक्ष्म्याः, श्वा धा-
वमानो न लभेत लक्ष्मीम् ॥ २०५ ॥

अर्थ—दैव अनुकूल असल्यावांचून व्यर्थ धांवूं नको; कारण धांवणें लक्ष्मीप्राप्तीचें साधन नाहीं. याचा अनुभव असा कीं, धांवणें जर लक्ष्मीप्राप्तीचें साधन आहे तर श्वान निरंतर धांवत असून त्यास लक्ष्मीची प्राप्ति कां होत नाहीं. ॥ २०९ ॥

दैवे विमुखतां याते साहाय्यं कुरुते न कः ॥ पिता
माता तथा भार्या भ्राता वाथ सहोदरः ॥ २०६ ॥

अर्थ—दैव विमुख झालें असतां त्याकालीं पिता, माता, तशाच भार्या अथवा सहोदर बंधु हे कोणीही साहाय्य करीत नाहींत. तेव्हां इतरांची काय कथा. ॥ २०६ ॥

नेता यस्य बृहस्पतिः प्रहरणं वज्रं सुराः सैनिकाः,
स्वर्गो दुर्गमनुग्रहः किल हरेरैरावतो वारणः॥ इत्या-
श्चर्यबलान्वितोपि बलिभिर्भग्नः परैः संगरे, तद्युक्तं वर-
मेव दैवशरणं धिग् धिग् वृथा पौरुषम् ॥ २०७ ॥

अर्थ—बृहस्पति ज्याचा गुरु असून, आयुध वज्र, सर्व देव सैनिक, स्वर्गरूप दुर्ग (अगम्य किल्ला), हरिचा निश्चित अनुग्रह, वाहन ऐरावत गज, अशा आश्चर्यकारक साहाय्यानें इंद्र संपन्न असूनही संग्रामांत बलिष्ठ असुरांनीं त्याचा पराभव केला. तस्मात् दैवच सर्वांत श्रेष्ठ शरण आहे हें युक्त आहे, आणि पराक्रम व्यर्थ आहे यास्तव त्यास वारंवार धिक्कार असो. ॥ २०७ ॥

भग्नाशस्य करंडपीडिततनोर्म्लानेंद्रियस्य क्षुधा कृत्वा-
खुर्विवरं स्वयं निपतितो नक्तं मुखे भोगिनः ॥ तृ-
प्तस्तत्पिशितेन सत्वरमसौ तेनैव यातः पथा, लोकाः
पश्यत दैवमेवहि नृणां वृद्धौ क्षये कारणम् ॥२०८॥

अर्थ—एके समयीं सर्प गारोड्याच्या हातीं सांपडला असतां त्यानें त्यास आपल्या करंडींत ठेविलें. तेव्हां तो तेथून सुटण्याविषयीं निराश होऊन त्याचें शरीर त्या करंडीनें पीडित झालें व त्याचीं इंद्रियें क्षुधेनें ग्लान झालीं. त्याकालीं रात्रीं एका उंदीरानें त्या करंडीला भोंक पाडून तो स्वतः त्या सर्पाच्या मुखांत प्रविष्ट झाला असतां तो त्या मूषकाच्या मांसानें तृप्त होऊन त्वरेनें त्याच मार्गानें बाहेर पडला तस्मात् लोकहो विचारानें असें समजा कीं, मनुष्यांच्या वृद्धीस अथवा क्षयास कारण दैवच आहे. ॥ २०८ ॥

शिरसा धार्यमाणोपि सोमः सौम्येन शंभुना ॥ तथा-
पि कृशतां धत्ते कष्टः खलु पराश्रयः ॥ २०९ ॥

अर्थ—शांत शंकरांनीं चंद्र स्वमस्तकावर धारण केला आहे तरी तो कृशतेप्रत पावत आहे. यावरून असें सिद्ध होतें कीं, पराधीनता निश्चयेंकरून दुःखकारक आहे. ॥ २०९ ॥

ध्माता भालतलानलैः कवलिता कंठस्थहालाहलै-
रालीढाथ जटाटवीविलुठितैराशीविषाणां गणैः ॥
छन्ना भस्मभिराहतास्थिपटलैः क्लिन्नार्द्रचर्माम्बरैः
स्वियां मुंचति माधुरीं हरशिरोरत्नं किमिंदोः
कला ॥ २१० ॥

अर्थ—कपाळाच्या अधोभागीं तृतीय नेत्राग्नीच्या ज्वालांनीं तप्त झालेली असून कंठांतील हालाहल विषाच्या उद्गारांनीं ग्रस्त झालेली. त्याचप्रमाणें जटारूप अरण्यांत संचार करणाऱ्या सर्प समुदायांनीं चाटलेली आणि भस्मानें आच्छादित, अस्थिसमूहानें ताडित व आर्द्र चर्मरूप वस्त्रांनीं भिजलेली अशी शंकराच्या मस्तकावरील रत्नभूत जी चंद्रकला ती स्वकीय माधुर्याचा त्याग करिते काय? करीत नाहीं! तात्पर्य.—महात्मे दुर्जनांनीं अति पीडित झाले तरी ते आपल्या सौजन्याचा त्याग करीत नाहींत. ॥ २१० ॥

नक्षत्राणि बहूनि संति परितः पूर्णोदयान्यंबरे, किं तैः
शांतिमुपैति दीर्घतिमिरं किं वार्धिरुज्जृंभते ॥ किं
स्यादार्तचकोरपारणविधिभ्रांतः सुधादीधिते तन्नूनं भु-
वनैकतापशमनः श्लाघ्यस्तवैवोदयः ॥ २११ ॥

अर्थ—आकाशांत सभोंवतीं पूर्ण उदयास आलेलीं नक्षत्रें बहुत आहेत, परंतु त्यांच्या योगानें मोठा अंधकार नाश पावतो काय? नाहीं. तसाच नक्षत्रोदयानें समुद्र वृद्धिंगत होतो काय? नाहीं. त्याचप्रमाणें कामोद्दीपनानें

पीडित झालेल्या चक्रवाक पक्ष्यांतील स्त्रीपुरुषांचा समागम घडून त्यांच्या विरहाची पारणा होते काय? नाहीं. आणि हे विश्ववंद्या अमृतकिरण चंद्रा, तुझ्या उदयानें अंधकार दूर होऊन समुद्रास आनंद होऊन त्याला भरती येते व चकोर पक्ष्यांचें विरहदुःख दूर होतें, तस्मात् तुझा एकच उदय भुवनाच्या तापशांतीविषयीं समर्थ, अशा स्तुतिविषयीं निश्चयेंकरून तूं पात्र आहेस ॥ २११ ॥

शुक्ले पक्षे शीतरश्मिर्बलीयान्न प्राधान्यं तारकायास्तु
दृष्टम् ॥ शक्त्यायुक्ते विद्यमानेपि कान्ते न प्राधान्यं
योषितां क्वापि दृष्टम् ॥ २१२ ॥

अर्थ—शुक्लपक्षांत शीतलकिरण चंद्र बलिष्ठ असतो त्यामुळें त्या कालांत नक्षत्रांचें प्राधान्य जसें दिसत नाहीं, तसें पति शक्तीनें युक्त विद्यमान असतां तेथें स्त्रियांचें प्राधान्य कोठेंही दिसत नाहीं. ॥ २१२ ॥

आस्ते विधुः परमनिर्वृत एव मौलौ शंभोरिति त्रि-
जगतीजनचित्तवृत्तिः ॥ अंतर्निगूढनयनानलदाहदुःखं
जानाति कः परमृते बत शीतरश्मेः ॥ २१३ ॥

अर्थ—चंद्र शिवाच्या मस्तकावर परम सुखीच आहे असें त्रैलोक्यांतील जनांच्या चित्तवृत्तीला भासतें; परंतु शंकराच्या कपाळावरील झांकलेल्या तृतीय नेत्रांतील अग्नीच्या दाहाचें परम दुःख त्या शीत किरणांवांचून इतर कोण जाणतो कोणी जाणत नाहीं. तात्पर्य.—महाजन बाहेरून जरी सुखी भासतात तरी त्यांचें अंतर्दुःख इतरांस समजत नाहीं. ॥ २१३ ॥

वदंती जारवृत्तान्तं पत्यौ धूर्ता सखीधिया ॥ पतिं बु-
ध्वा सखि ततः प्रबुद्धास्मीत्यपूरयत् ॥ २१४ ॥

अर्थ—कोणी एक धूर्त स्त्री, पतीजवळ ही आपली सखी आहे अशा बुद्धीनें जारसंबंधि वृत्तांत सांगत असतां ही सखी नव्हे हा आपला पति

आहे असें जेव्हां तिला कळलें, तेव्हां ती बोलली कीं, हे सखि, इतकें स्वप्न पाहून नंतर मी जागी झाल्यें असें तिणें आपलें तें वाक्य पूर्ण साधून घेतलें. ॥ २१४ ॥

हेमंते बहुदोषाढ्ये द्वौ गुणौ सर्वसंमतौ ॥ अयत्नशी-
तलं वारि सुरतं स्वेदवर्जितम् ॥ २१५ ॥

अर्थ—हेमंत ऋतु बहु दोषांनीं युक्त जरी आहे, तथापि त्यांत दोन गुण सर्व संमत आहेत, ते हे कीं, यत्न केल्यावांचून उदक गार असतें व घर्म (घाम) वर्जित सुरत (मैथुन) असतें. ॥ २१५ ॥

पुरुहूतदिगंगना प्रसूता रविमुद्दामसुतं चिरादुपेत्य ॥
अलिनो नलिनीदलाद्विमुक्ताः प्रियबाहुद्वयबंधना-
न्नवोढाः ॥ २१६ ॥

अर्थ—प्रातःकाळ झाला असतां अशा गोष्टी घडतात कीं, रविनामक बहु कालचा उद्दाम पुत्र पावून इंद्राची पूर्व दिशारूप स्त्री प्रसूत होत्ये, आणि सूर्यविकासि कमलें सूर्योदयानें उमलल्यामुळें त्यांतील भ्रमर मुक्त होतात. व तरुण स्त्रिया पतीच्या भुजद्वयरूप बंधनांतून मुक्त होतात. ॥ २१६ ॥

कांतां दृष्ट्वा चरणयुगलक्षालनाय प्रवृत्तामस्मिन्राष्ट्रे
श्रियमिति वचः पापठीति प्रयत्नात् ॥ देवस्यत्वेति च
पुनरसौ वीटिकायाः प्रदाने, जामाता ते जडमतिरयं
छांदसः किं करोमि ॥ २१७ ॥

अर्थ—कोणी एक स्त्री आपल्या मातेला ह्मणत्ये कीं, तुझा हा जामात मूढमति, छांदस आहे यास्तव त्यास मी काय करूं. तें छांदसत्व असें कीं, मी त्याच्या चरणद्वयप्रक्षालनास प्रवृत्त झाल्यें असें पाहून तो अस्मिन्

राष्ट्रे श्रिय या ऋचेचें पठन करतो. पुनः तो तांबूल देतेसमयीं देवस्वत्या ही ऋचा पठन करतो. ॥ २१७ ॥

परिपतति पयोनिधौ पतंगः सरसिरुहामुदरेषुमत्तभृं-
गः ॥ उपवनतरुकोटरे विहंगस्तरुणिजनेषु शनैः श-
नैरनंगः ॥ २१८ ॥

अर्थ—सूर्यास्तसमयीं अशा गोष्टी होतात कीं, सूर्य समुद्रांत प्रवेश करतो. पुष्परस प्राशन करून मत्त झालेला भ्रमर कमलांच्या उदरांत सांपडतो. यावरून सूर्यविकासि कमलें सूर्यास्तसमयीं मिटतात; आणि पक्षी उपवनांतील वृक्षांच्या ढोलींत प्रवेश करतात. व मदन तरुणि स्त्रियांच्या अंगीं हळू हळू वृद्धिंगत होतो. ॥ २१८ ॥

तन्वी चारुपयोधरा सुवदना श्यामा मनोहारिणी, नी-
ता निष्करुणेन केन चिदहो देशांतरादागता ॥ उ-
त्संगोचितया तया रहितया किं जीवनापेक्षया, भिक्षो
ते दयितास्ति किं नहि नहि प्राणप्रिया तुंबिका २१९

अर्थ—सूक्ष्म असून सुंदर स्तन व मुख यांनीं सुशोभित षोडश वार्षिकी सर्वांचें मन हरण करणारी व देशांतरांतून आलेली, असें असून तिला कोणी निर्दयानें नेली हें महदाश्चर्य आहे. आणि ती माझ्या अंकावर असण्यास योग्य होती, तस्मात् आतां तिजवांचून मला जिवंत राहून काय करावयाचें आहे कांहीं नाहीं; असें जेव्हां एका वैराग्यानें ह्मटलें तेव्हां त्यास कोणी जवळच्यांनीं विचारिलें कीं, हे भिक्षो, तुजपाशीं कोणी स्त्री होती काय? तत्काल त्यानें उत्तर दिलें कीं असें नाहीं, तर अशी पूर्वोक्त गुणयुक्त माझी उत्तम प्राणप्रिया तुंबिका (तुंबा) होती. त्यांत ती उत्कृष्ट पय ह्मणजे उदक धारण करणारी असून श्यामवर्ण होती. ॥ २१९ ॥

विषं भुंक्ष्व महाराज सबलैर्मंत्रिभिः सह ॥ विना केन विना नाभ्यां कृष्णाजिनमकंटकम् ॥ २२० ॥

अर्थ–हे महाराज, तूं सबल मंत्रिजनांसह षकार, ककार व दोन नकार यांनींरहित अशा निष्कंटक कृष्णाजिनाचा उपभोग कर, ह्मणजे कृष्णाजिन या शब्दांतील क् ष् ण् न् हे वर्ण काढिले असतां ऋ आ जि अं असे वर्ण राहिले. तेव्हां व्याकरणांतील संधिकार्यप्रमाणें यण् होऊन ऋला र झाल्यानें र आ मिळून रा झाला आणि जि येथील इला य् झाला तेव्हां ज्य् अं मिळून ज्यं झाला एवंच राज्याचा उपभोग कर हें तात्पर्य झालें. ॥ २२० ॥

शिलार्पितपदद्वंद्वा नासार्पितकरद्वया ॥ अभूद्व्यक्तस्तनी नारी कथमेतद्भविष्यति ॥ २२१ ॥

अर्थ–कोणी एका स्त्रीनें आपले दोन्ही पाय शिलेवर ठेवले असून दोन्ही हात नासे (नासीके) वर ठेविले असतां तिचे स्तन स्पष्ट दिसले हें कसें घडलें? यास्तव याची योजना अशी कीं, दाराच्या चौकटींतील खालच्या लांकुडास शिला ह्मणतात व वरील लांकुडास नासा ह्मणतात. ॥ २२१ ॥

सुवर्णस्य सुवर्णस्य सुवर्णस्य च जानकि ॥ प्रेषिता तव रामेण सुवर्णस्य च मुद्रिका ॥ २२२ ॥

अर्थ–हे जानकि, तुला रामानें राम या उत्तमाक्षरांनीं युक्त असल्यामुळें स्तुत्य असून उत्तम वर्ण शोभित अशी सुवर्णाची मुद्रिका पाठविली आहे. ॥ २२२ ॥

सुकपरिविंदः शब्दः सुब्रह्मण्यस्य वाचकः केन ॥ स्तनभरनमिता नारी येनोपायेन रंजयेत् कांतम् ॥ २२३ ॥

अर्थ–मुकपरिविंद हा शब्द कार्तिकस्वामीचा वाचक कशानें होतो? स्तनभरानें नम्र झालेली स्त्री ज्या उपायानें पतीस रमवित्ये तो उपाय कार्तिकस्वामीवाचक होतो. तो कसा ह्मणाल तर स्तनभरानें नम्र झालेली स्त्री उपरिविपात (आपल्यावर घेणें) या उपायानें रमविते. यावरून असें झालें कीं, मुकपरिविंद यांतील उपरिवि हीं अक्षरें कमी करून शेष राहिलेलें स्कंद हें नाम कार्तिकस्वामीचें आहे. ॥ २२३ ॥

लंकाभूपनिशाचरो रघुपतिं युद्धे कथं दृष्टवान्, दीनं
पाति पितेव यः पशुपतिः कस्तस्य वाहः प्रियः ॥
केनापूर्वफलं नरैः सुकृतिभिः कस्मिंस्थले भुज्यते,
जारा ये भुवि तान् प्रशास्ति कतमो त्वेषामिहैवोत्तरम् ॥ २२४ ॥

अर्थ–रावण रामास युद्धांत कसें पहात होता? दीनास पित्यासमान रक्षण करणारा जो शंकर त्याचें प्रिय वाहन कोणतें? आणि पुण्यवंत लोक सुकृताचें फल सुखानें कोणत्या स्थलीं भोगतात? व जे जार पुरुष त्यांस भूलोकीं कोण शासन करतो? या चारी प्रश्नांचीं उत्तरें त्या त्या चरणांतच आहेत तीं अशीं कीं,–प्रति चरणांतील दोन आद्य अक्षरांचा विपर्यास केला ह्मणजे लंका–काले,–दीनं–नंदी,–केना–नाके,–जारा राजा,–अशीं अक्षरें उलटीं केल्यावर असा अर्थ झाला कीं,–रावणानें रामास काळासमान पाहिलें, शिवास वाहनांत नंदी प्रिय आहे, पुण्यवंत लोक स्वकर्माचें फल स्वर्गांत भोगतात, व जारांस शासनकर्ता राजा आहे. ॥ २२४ ॥

प्रज्ञया वा विसारिण्या यो बलेन धनेन वा ॥ धुरं
वहति गोत्रस्य जननी तेन पुत्रिणी ॥ २२५ ॥

अर्थ–जो मानव विशालबुद्धि, बल व धन यांनीं स्वकुलांतील प्राप्त कार्याचा भार वाहतो त्या पुत्राच्या योगानें जननी लोकांत यथार्थ पुत्रवती होते. ॥ २२५ ॥

स जातो येन जातेन याति वंशः समुन्नतिम् ॥ परिव-
र्तिनि संसारे मृतः को वा न जायते ॥ २२६ ॥

अर्थ—चक्राकार गतियुक्त संसारांत मृत झालेला कोण प्राणी जन्मास येत नाहीं ? तर सर्व पुनः जन्मतात; परंतु वंश ज्याच्या योगानें उत्तम उदयास येतो तो जन्मास आल्याचें सार्थक पावतो. ॥ २२६ ॥

विद्याविहिना बहवोपि पुत्राः कल्पायुषः संतु पितुः
किमेतैः ॥ क्षयिष्णुनावापि कलावता वा तस्य प्रमो-
दः शशिनेव सिंधोः ॥ २२७ ॥

अर्थ—कल्पपर्यंत आयुष्यसंपन्न पुष्कळ पुत्र विद्याहीन जर असले तर ते असोत; परंतु त्यांच्या योगानें पित्यास काय फल ? कांहीं नाहीं. आणि एकच पुत्र अशक्त असून तो विद्यादिकलांनीं युक्त असला तर त्याच्या योगानें पित्यास अति हर्ष होतो. यास दृष्टांत,—जसा क्षीण चंद्राच्या द-र्शनानें आनंद होऊन समुद्र वृद्धिंगत होतो तद्वत्. ॥ २२७ ॥

एकेनापि सुपुत्रेन विद्यायुक्तेन भासते ॥ कुलं पुरुष-
सिंहेन चंद्रेणेवाहि शर्वरी ॥ २२८ ॥

अर्थ—विद्यायुक्त असल्यामुळें पुरुषश्रेष्ठ अशा एकाहि सुपुत्राच्या योगानें कुल शोभतें. यास दृष्टांत, जशी रात्र चंद्राच्या योगानें शोभते तद्वत्. ॥ २२८ ॥

अजातमृतमूर्खाणां वरमाद्यौ न चांतिमः ॥ सकृद्दुः-
खकरावाद्यावंतिमस्तु पदे पदे ॥ २२९ ॥

अर्थ—मुळींच न झालेला, मृत व मूर्ख अशा त्रिवर्ग पुत्रांत पहिले दोन बरे. परंतु अंतीचा चांगला नाहीं. कारण प्रथम दोघे एकवारच दुःखका-रक होतात. व शेवटचा तर पदोपदीं दुःखदायक होतो. ॥ २२९ ॥

भो पांथ पुस्तकधर क्षणमत्र तिष्ठ वैद्योसि किं ग-
णकशास्त्रविशारदोसि ॥ केनौषधेन मम पश्यति
भर्तुरंबा किंवा गमिष्यति पतिः सुचिरप्रवासी ॥ २३० ॥

अर्थ—कोणी कामुक स्त्री प्रश्न करिते हे पांथ, येथें क्षणमात्र उभा रहा. कारण तूं हातांत पुस्तक घेतलें आहेस, यावरून तूं वैद्य आहेस किंवा ज्योतिषशास्त्रांत निपुण आहेस ? वैद्य असलास तर माझ्या भर्त्याची माता अंध आहे ती कोणत्या औषधानें पाहील ? अथवा ज्योतिषी असलास तर बहुकाल प्रवासास गेलेला माझा पति कधीं येईल ? (यावरून तुला येथें रहाण्यास कांहीं प्रतिबंधक नाहीं. हें यांतील तात्पर्य आहे.) ॥२३० ॥

कामिनीकायकांतारे कुचपर्वतदुर्गमे ॥ मा संचर
मनःपांथ तत्रास्ते स्मरतस्करः ॥ २३१ ॥

अर्थ—हे मनरूप पांथा, तूं स्तनरूप पर्वतामुळें गमन करण्यास अशक्य अशा कामिनी देहरूप अरण्यांत संचार करूं नको; कारण तेथें मदन चोर आहे तो तुझा नाश करील. ॥ २३१ ॥

संपत्सु महतां चित्तं भवत्युत्पलकोमलम् ॥ आपत्सु
च महाशैलशिलासंघातकर्कशम् ॥ २३२ ॥

अर्थ—महात्म्याचें चित्त संपत्तिकालांत कमलासारखें कोमल असतें. आणि तेंच आपत्कालांत महा पर्वताच्या शिलासमुदायासमान कठिण होतें. ॥ २३२ ॥

यः प्रीणयेत् सुचरितैः पितरं स पुत्रो, यद्भर्तुरेव
हितमिच्छति तत् कलत्रम् ॥ तन्मित्रमापदि सुखे च
समक्रियं यदेतत्त्रयं जगति पुण्यकृतो लभंते ॥ २३३ ॥

अर्थ–जो सत्कर्मांनीं पित्यास संतुष्ट करतो तोच पुत्र जाणावा, जी भर्त्याचें हित इच्छील तीच भार्या समजावी. आपत्कालांत व सुखाच्या कालांत जो आपली वागणूक सारखी ठेवतो, तोच मित्र ह्मणावा. तर तीन प्रकार जगांत पुण्यवंत लोकांसच प्राप्त होतात. ॥ २३३ ॥

अंबुजमंबुनि जातं नहि दृष्टं जातमंबुजादंबु ॥ अधुना तद्विपरीतं चरणसरोजाद्विनिर्गता गंगा ॥ २३४ ॥

अर्थ–कमल उदकांत उत्पन्न होतें व कमलापासून जल उत्पन्न झालेलें कोठेंच दृष्टी पडत नाहीं; परंतु याकालीं विपरीत झालें तें असें कीं, गंगोदक विष्णुचरणकमलापासून निघालें. ॥ २३४ ॥

जाता लताहि शैले जातु लतायां न जायते शैलः ॥ अधुना तद्विपरीतं कनकलतायां गिरिद्वयं जातम् २३५

अर्थ–लता पर्वतावर उत्पन्न होतात. आणि लतेवर कदापि पर्वत उत्पन्न होत नाहीं; परंतु याकालीं हा नियम विपरीत झाला तो असा कीं, सुवर्णलते (स्त्री) वर दोन पर्वत (स्तन) उत्पन्न झाले. ॥ २३५ ॥

कमले कमलोत्पत्तिः श्रूयते न च दृश्यते ॥ बाले तव मुखांभोजे दृष्टमिंदीवरद्वयम् ॥ २३६ ॥

अर्थ–कमलाच्या ठिकाणीं कमलाची उत्पत्ति होते असें ऐकतो, परंतु पहाण्यांत नाहीं. आणि हे बाले, तुझ्या मुखकमलावर मात्र नेत्रकमलद्वय पाहिलें. ॥ २३६ ॥

न केनापि श्रुतं दृष्टं वारिणा वारि शुष्यति ॥ अहो गोदावरीवारा भवसिंधुर्विशुष्यति ॥ २३७ ॥

अर्थ–उदकानें उदक शुष्क होतें असें कोणींही श्रुत व दृष्ट नाहीं; परंतु गोदावरीच्या जलानें भवसिंधु अतिशुष्क होतो हें आश्चर्य आहे. ॥२३७॥

वरं वनं वरं भैक्ष्यं वरं भारोपजीवनम् ॥ पुंसां विवेक-
हीनानां सेवया न धनार्जनम् ॥ २३८ ॥

अर्थ—वनवास श्रेष्ठ, भिक्षान्न श्रेष्ठ व भार वाहानानें उपजीवन श्रेष्ठ आहे. परंतु विचारहीन पुरुषांच्या सेवेनें धनसंपादन श्रेष्ठ नाहीं. ॥ २३८ ॥

सेवा श्ववृत्तिर्यैरुक्ता न तैः सम्यगुदाहृतम् ॥ स्वच्छं-
दचारी कुत्र श्वा विक्रीतासुः क्व सेवकः ॥ २३९ ॥

अर्थ—सेवा (चाकरी) करणें ही श्ववृत्ति (नीचवृत्ति) असें ज्यांनीं ह्मटलें, तें त्यांनीं यथार्थ प्रतिपादन केलें नाहीं; कारण स्वच्छंदानें संचार करणारा श्वान कोठें आणि आपले प्राण यजमानास विकणारा सेवक कोणीकडे; तस्मात् सेवक व श्वान यांत महत् अंतर आहे. ॥ २३९ ॥

तास्तु वाचः सभायोग्याः याश्चित्ताकर्षणक्षमाः ॥
स्वेषां परेषां विदुषां द्विषामविदुषामपि ॥ २४० ॥

अर्थ—स्वकीय, परकीय, विद्वज्जन, द्वेष करणारे व अज्ञानी जन या सर्वांच्या चित्ताचें आकर्षण करणाऱ्या ज्या वाणी त्याच योग्य जाणाव्या. ॥ २४० ॥

वितर वारिद वारि दवातुरे चिरपिपासितचातकपो-
तके ॥ प्रचलिते मरुति क्षणमन्यथा क्व च भवान्
क्व पयः क्व च चातकः ॥ २४१ ॥

अर्थ—हे मेघा, दवाग्नीनें पीडित होऊन पुष्कळ वेळापासून तृषाक्रांत झालेल्या चातक बालकास उदक दे; कारण वायु क्षणांत उलट वाहूं लागला असतां तूं कोठें जाशील, पाणी कोठें व चातक कोणीकडे राहील, याचा नियम नाहीं. ॥ २४१ ॥

एकस्य तस्य मन्ये धन्यामभ्युन्नतिं जलधरस्य ॥ विश्वं
सशैलकाननमाननमवलोकते यस्य ॥ २४२ ॥

अर्थ–पर्वत व अरण्य यांसहित सकल विश्व ज्याच्या मुखाकडे अवलोकन करतें. यावरून त्या एका मेघाचीच श्रेष्ठता मी धन्य मानतों. ॥ २४२ ॥

तद्वक्ता सदसि ब्रवीतु वचनं यच्छृण्वतां चेतसः प्रोल्लासं रसपूरणं श्रवणयोरक्ष्णोर्विकासश्रियम् ॥ क्षुन्निद्राश्रमदुःखकालगतिहृत् कार्यांतरप्रस्मृतिं प्रोत्कंठामनिशं श्रुतौ वितनुते शोकं विरामादपि ॥ २४३ ॥

अर्थ–वक्त्यानें सभेंत असें भाषण करावें कीं, जें भाषण श्रवण करणारांच्या अंतःकरणास अतिशयित उल्हास होऊन कर्णांस श्रवण करण्याची इच्छा अधिक वाढावी. तशीच नेत्रांस विकास शोभा प्राप्त व्हावी, आणि क्षुधा, निद्रा, श्रम, व दुःख व कालगति यांस हरण करणारें असून अन्य कार्यांची अत्यंत विस्मृति व्हावी, निरंतर त्या भाषणाच्या श्रवणाविषयीं अति उत्कंठा असून त्या भाषणसमाप्तीपासूनही श्रोत्यांस खेद व्हावा. ॥ २४३ ॥

श्रुतिसिद्धांतशूरस्य तद्विरुद्धान्निरुंधतः ॥ वल्गितं वावदूकस्य कृतिनः किं न शोभते ॥ २४४ ॥

अर्थ–श्रुतींच्या सिद्धांतांत शूर असून त्याचप्रमाणें त्या सिद्धांतास विरुद्ध जे असतील त्यांस कुंठित करण्याविषयीं कुशल अशा वक्त्याचें काय एक भाषण शोभत नाहीं तर सर्व शोभतें. ॥ २४४ ॥

अल्पाक्षररमणीयं यः कथयति निश्चितं स खलु वाग्मी ॥ बहुवचनमल्पसारं यः कथयति विप्रलापी सः ॥ २४५ ॥

अर्थ–अल्प अक्षरांनीं युक्त असून रमणीय असें जो निश्चित सांगतो तो निश्चयेंकरून वक्ता जाणावा, आणि जो अल्प सारांशयुक्त बहुत भाषण करितो तो निरर्थक भाषण करणारा समजावा. ॥ २४५ ॥

जिव्हैकैव सतामुभे फणवतां स्रष्टुश्चतस्त्रश्चतास्ताः
सप्तैव विभावसोर्नियमिताः षट् कार्तिकेयस्य च ॥
पौलस्त्यस्य दशाभवन् फणिपतेर्जिव्हासहस्त्रद्वयं, जि-
व्हालक्षशतैककोटिनियमो नो दुर्जनानां मुखे २४६

अर्थ—साधूंस जिव्हा एकच असते. सर्पास दोन, ब्रह्मदेवास चार आणि अग्नीस सात, कार्तिकस्वामीस सहा, व रावणास दहा होत्या. शेषास दोन सहस्त्र आहेत. परंतु दुर्जनांच्या मुखांत जिव्हा लक्ष, शत किंवा एक कोटी या संख्यांतून किती असतील याचा नियम कांहींच नाहीं. ॥२४६॥

असत्यमप्रत्ययमूलकारणं कुवासनासद्मसमृद्धिवारणम्
॥ विपन्निदानं परवंचनोर्जितं कृतापराधं कृतिभिर्वि-
वर्जितम् ॥ २४७ ॥

अर्थ—असत्य अविश्वासाचें मूळ कारण असून कुत्सित वासनांचें केवळ गृहच आहे. आणि तें संपत्तीचें नाशक, विपत्तीचें आदिकारण, दुसऱ्याच्या वंचनेविषयीं बलवत्तर व बहु अपराध घडविणारें असें असत्य भाषण अनेक दोषयुक्त असल्यामुळें तें सज्जनांनीं वर्ज्य केलें आहे. व वर्ज्य करावें हें योग्य. ॥ २४७ ॥

नासत्यवादिनः सख्यं न पुण्यं न यशो भुवि ॥ दृश्यते
नापि कल्याणं कालकूटमिवाश्नतः ॥ २४८ ॥

अर्थ—या पृथ्वीतलावर असत्य भाषण करणारांचें कोणाशीं सख्य होत नसून त्यास पुण्य, यश व कल्याण हीं कधींच प्राप्त होत नाहींत. यास दृष्टांत.—कालकूट विष भक्षण करणारास जसें सुख होत नाहीं तद्वत्. २४८

स्त्रीणां द्विगुण आहारो लज्जा चापि चतुर्गुणा ॥
साहसं षड्गुणं चैव कामश्चाष्टगुणः स्मृतः ॥२४९॥

अर्थ—स्त्रियांचा आहार पुरुषापेक्षां द्विगुणित, लज्जाही चौपट, साहस सहा पट व काम अष्टगुणित अधिक असतो. ॥ २४९ ॥

स्त्रियो हि मूलं निधनस्य पुंसः स्त्रियो हि मूलं व्यसनस्य पुंसः ॥ स्त्रियो हि मूलं नरकस्य पुंसः स्त्रियो हि मूलं कलहस्य पुंसः ॥ २५० ॥

अर्थ—स्त्रिया, पुरुषास मरण, दुःख, नरक व कलह, यांच्या प्राप्तीला कारणभूत आहेत. ॥ २५० ॥

रूपसंपन्नमग्राग्र्यं प्रेमप्रायं प्रियंवदम् ॥ कुलीनमनुकूलं च कलत्रं कुत्र लभ्यते ॥ २५१ ॥

अर्थ—रूपवती, व्यवहाराविषयीं चतुर, प्रेमल, मधुर भाषण करणारी, कुलीन व अनुकूल अशी स्त्री कोठें प्राप्त होणार? प्राप्त होणें फारच दुर्लभ आहे. ॥ २५१ ॥

पाणौ गृहीतापि पुरस्कृतापि स्नेहेन नित्यं परिवर्धितापि ॥ परोपकाराय भवत्यवश्यं वृद्धस्य भार्या करदीपिकेव ॥ २५२ ॥

अर्थ—वृद्धानें आपली स्त्री हातीं धरून सर्व गृहकृत्यांत प्रमुख केली, प्रीतीनें निरंतर वाढविली, तरी ती निश्चयेंकरून परोपकारार्थ होते. यास दृष्टांत.—हातांत मशाल धरणारास स्वतः दिसत नसून इतरांस मात्र तिचा प्रकाश उपयोगीं पडतो तद्वत्. ॥ २५२ ॥

राजन् दुधुक्षसि यदि क्षितिधेनुमेतां, तेनाद्य वत्समिवलोकममुं पुषाण ॥ तस्मिंश्च सम्यगनिशं परि-

यस्मिन् देशे न सन्मानो न वृत्तिर्न च बांधवाः ॥
न च विद्यागमोप्यस्ति वासं तत्र न कारयेत् ॥२६०॥

अर्थ—ज्या देशांत सन्मान, वृत्ति, (उदरपोषण मार्ग) बांधव व विद्याप्राप्ति ही नाहीं तेथें वास करूं नये. ॥ २६० ॥

गुणिनं जनमालोक्य निजबंधनशंकया ॥ राजन्
लक्ष्मीः कुरंगीव दूरं दूरं पलायते ॥ २६१ ॥

अर्थ—हे राजन् लक्ष्मी, गुणिजनास पाहून आपणास बंधन होईल या शंकेनें हरिणीसारखी अतिदूर पळते. ॥ २६१ ॥

पद्मे मूढजने ददासि द्रविणं विद्वत्सु किं मत्सरो,
नाहं मत्सरिणी न चापि चपला नैवास्ति मूर्खे
रतिः ॥ मूर्खेभ्यो द्रविणं ददामि नितरां तत्कारणं
श्रूयतां, विद्वान् सर्वजनेषु पूजिततनुर्मूर्खस्य ना न्या
गतिः ॥ २६२ ॥

अर्थ—हे लक्ष्मी, तूं मूढ जनास द्रव्य देतेस आणि विद्वज्जनास देत नाहींस, यावरून तुला विद्वानांविषयीं मत्सर आहे कीं काय? तेव्हां लक्ष्मीनें उत्तर दिलें कीं, मी त्यांविषयीं मत्सरयुक्त नाहीं, चंचलही नाहीं, मला मूर्ख जनांविषयीं प्रीति नाहींच असें असून मी मूर्खांस धन अतिशय देतें, याचें कारण श्रवण करा. तें असें कीं, विद्वान् सर्व लोकांत पूजित असल्यामुळें त्यास कांहीं न्यून असत नाहीं, आणि मूर्खाला कोणीच मानीत नसल्या कारणानें त्यास मजवांचून अन्यगतिच नाहीं, याकरितां मी त्याचा आश्रय करितें. ॥ २६२ ॥

गंगेवाघविनाशिनी जनमनःसंतोषसच्चंद्रिका, ती-
क्ष्णांशोरपि सत्प्रभेव जगदज्ञानांधकारापहा ॥ छा-

येनाखिलतापनाशनकरी स्वर्धेनुवत्कामदा, पुण्यैरे-
वहि लभ्यते सुकृतिभिः सत्संगतिर्दुर्लभा ॥ २६३ ॥

अर्थ—भागीरथीसारखी पाप नाश करणारी, लोकांच्या मनास संतोष दे-ण्याविषयीं चंद्रकलेसारखी, सूर्याच्याही कांतीसारखी जगांतील अज्ञानरूप अंधकाराचा नाश करणारी, छायेसमान सर्व तापनाशक, सकल मनोरथ पूर्ण करण्याविषयीं कामधेनूसारखी अशी दुर्लभ सत्संगति भाग्यवंत जनांस पुण्यांनींच प्राप्त होते. इतरांस कधींही प्राप्त होत नाहीं. ॥ २६३ ॥

काचः कांचनसंसर्गाद्धत्ते मारकतीर्द्युतीः ॥ तथा
सत्सन्निधानेन मूर्खो याति प्रवीणताम् ॥ २६४ ॥

अर्थ—कांचेचा मणि सुवर्णाच्या संगतीनें जशी नीलमण्याची कांति धारण करतो, तद्वत् मूर्ख साधुसंगतीनें प्रवीणतेला प्राप्त होतो. ॥ २६४ ॥

कीटोपि सुमनःसंगादारोहति सतां शिरः ॥ अ-
श्मापि याति देवत्वं महद्भिः सुप्रतिष्ठितः ॥ २६५ ॥

अर्थ—कीट (किडा) ही पुष्पाच्या संगानें सत्पुरुषांच्या मस्तकावर आ-रोहण करतो. तसाच पाषाणही महात्म्या साधूंनीं उत्तम रीतीनें प्राण-प्रतिष्ठा युक्त केला असतां देवत्वाला प्राप्त होतो. २६५ ॥

कल्पद्रुमः कल्पितमेव सूते सा कामधुक्कामितमेव
दोग्धि ॥ चिंतामणिश्चिंतितमेव दत्ते सतां हि संगः
सकलं प्रसूते ॥ २६६ ॥

अर्थ—कल्पवृक्ष कल्पित वस्तूच देतो. कामधेनु इच्छित पदार्थ मात्र देते, चिंतामणिनांवाचा पाषाण, चिंतित मनोरथच पूर्ण करतो. परंतु साधूंचा समागम तर सर्व वासना सफल करितो. ॥ २६६ ॥

न स्थातव्यं न गंतव्यं क्षणमप्यधमैः सह ॥ पयोपि
शौंडिकीहस्ते मदिरां मन्यते जनः ॥ २६७ ॥

अर्थ—अधम जनांसह क्षणमात्रही उभें राहूं नये, व गमनही करूं नये; कारण मद्यविक्रय करणाऱ्या स्त्रीच्या हस्तांत दूध असलें तरी तें मद्यच आहे असें लोक मानितात असें संगतिमाहात्म्य आहे. ॥ २६७ ॥

किंचिदाश्रयसौंदर्याद्धत्ते शोभामसाध्वपि ॥ कांतावि-
लोचने न्यस्तं मलीमसमिवांजनम् ॥ २६८ ॥

अर्थ—वाईट पदार्थही सौंदर्याच्या किंचित् आश्रयानें शोभा धारण करतो. याचें उदाहरण असें कीं, सुंदर स्त्रीच्या नेत्रांत काजळ घातलें असतां तें मलिन असूनही शोभतें, तद्वत्. ॥ २६८ ॥

गुणैः सर्वज्ञकल्पोपि सीदत्येको निराश्रयः ॥ अनर्घ्य-
मपि माणिक्यं हेमाश्रयमपेक्षते ॥ २६९ ॥

अर्थ—कोणी पुरुष गुणांनीं सर्वज्ञसदृश असूनही आश्रयरहित एकाकी असला तर तो दुःख पावतो. यास दृष्टांत असा कीं, माणिक अमोलिक जरी असलें, तरी तेंही सुवर्णाश्रयाची अपेक्षा करतें. यावरून आश्रयाविरहित कोणीच शोभत नाहीं. ॥ २६९ ॥

षट्कर्णो भिद्यते मंत्रश्चतुष्कर्णः स्थिरो भवेत् ॥ द्वि-
कर्णस्य च मंत्रस्य ब्रह्माप्यन्तं न गच्छति ॥ २७० ॥

अर्थ—षट्कर्ण ह्मणजे त्रिवर्गांनीं केलेली मसलत फुटते, आणि चतुष्कर्ण ह्मणजे दोघांनीं केलेली मसलत स्थिर होते, व द्विकर्ण ह्मणजे एकट्याच्या मसलतीचा अंत ब्रह्मदेवासही लागत नाहीं. ॥ २७० ॥

पंचमेऽहनि षष्ठे वा शाकं पचति स्वे गृहे ॥ अनृणी
चाप्रवासी च स वारिचर मोदते ॥ २७१ ॥

अर्थ—हे जलचर पक्षा, दिवसाच्या पांचव्या किंवा सहाव्या भागांत स्व-गृहीं भाजी शिजवितो, आणि ऋण व प्रवास यांनीं रहित असा जो मानव तो आनंद पावतो. ॥ २७१ ॥

अहन्यहनि भूतानि गच्छंति हि यमालयम् ॥ शेषाः स्थावरमिच्छंति किमाश्चर्यमतः परम् ॥ २७२ ॥

अर्थ—प्राणी प्रति दिवशीं मृत्यु पावून यमसदनीं जातात. आणि शेष राहिलेले आपली तीच भावी होणारी अवस्था मनांत न आणून स्थावराची इच्छा करितात, यापेक्षां आश्चर्य कोणतें ? किमपि नाहीं. ॥ २७२ ॥

रसने रचितोयमंजलिस्ते परनिंदापरुषैरलं वचोभिः ॥ नरकापहरं नमःशिवायेत्यमुमादिप्रणवं भजस्व मंत्रम् ॥ २७३ ॥

अर्थ—हे रसने (जिव्हे) मी तुला हात जोडून इतकेंच मागतों कीं, पर-निंदाकारक कठोर भाषणें पुरेत; कां त्यागशील तर नरक यातना परिहार करणारा ओंकारादिक नमःशिवाय या मंत्राचा जप सर्वदा करीत जा. ॥ २७३ ॥

आदौ सत्ययुगे बलिस्तदनु च त्रेतायुगे राघवो, रामः सत्यपराक्रमोथ भगवान् धर्मस्तथा द्वापरे ॥ दाता कोपि न चास्ति संप्रति कलौ जीवंति केनार्थिन इत्येव कृतनिश्चयेन विधिना व्यापारिणो निर्मिताः ॥२७४॥

अर्थ—आरंभीं सत्य युगांत बलि दानशूर होता, त्याच्या मागें त्रेतायुगीं रघुवंशोद्भव सत्यपराक्रम भगवान् राम दाता झाला. तसाच द्वापरांत धर्म-राजा दाता होता. परंतु सांप्रत कलियुगीं दाता कोणीही नाहीं, यास्तव क-लिकालांत याचकजन कोणत्या उपायानें वांचतील, असा त्यांच्या जीवनो-

पापाविषयीं विचारपूर्वक निश्चय करून ब्रह्मदेवानें व्यापारी लोक निर्माण केले. ॥ २७४ ॥

नीरसान्यपि रोचंते कार्पासस्य फलानि मे ॥ येषां
गुणमयं जन्म परेषां गुह्यगुप्तये ॥ २७५ ॥

अर्थ—कापुसाचीं फळें रसहीन आहेत, तथापि तीं मला अतिप्रिय आहेत; कारण त्यांच्या उत्पत्तीपासून सूत निघून तें सर्व लोकांच्या गुह्य इंद्रियांच्या रक्षणार्थ उपयोगी पडतें. ॥ २७५ ॥

अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् ॥ उदारच
रितानां तु वसुधैव कुटुंबकम् ॥ २७६ ॥

अर्थ—हा स्वकीय किंवा हा परकीय आहे अशी गणना क्षुद्रचित्त पुरुष मात्र करतात, आणि उदारचरित्रयुक्त पुरुषांस तर सकल पृथ्वी स्वकुटुंबच वाटते. ॥ २७६ ॥

एकेन तिष्ठताधस्तादन्येनोपरि तिष्ठता ॥ दातृयाच-
कयोर्भेदः कराभ्यामेव सूचितः ॥ २७७ ॥

अर्थ—अधो भागीं राहणारा एक व उर्ध्व भागीं असणारा एक अशा हस्तांनींच दाता व याचक यांचा भेद सुचविला आहे. ॥ २७७ ॥

सैव परं न विनश्यति तनुरपि या श्रीर्निवेशिता स-
त्सु ॥ अवशिष्यते हिमांशोः सैव कला या स्थिरा
शंभौ ॥ २७८ ॥

अर्थ—तनु किंवा संपत्ति ही जर साधूंना अर्पण केली, तर तीच कदापि नाश पावत नाहीं. याचा अनुभव असा कीं, चंद्राची जी कला शंभूच्या मस्तकीं स्थापन केली तीच स्थिरत्वानें अवशिष्ट राहिली आहे. आणि त्या दिसणाऱ्या कला प्रत्यहीं कमी होतात व जास्त होतात. ॥ २७८ ॥

विद्यानाधिगता कलंकरहिता वित्तं च नोपार्जितं,
शुश्रूषापि समाहितेन मनसा पित्रोर्न संपादिता ॥
आलोलायतलोचना युवतयः स्वप्नेऽपि नालिंगिताः,
कालोऽयं परपिंडलोलुपतया काकैरिव प्रेषितः २७९

अर्थ—आह्मीं निष्कलंक विद्या संपादन केली नाहीं, द्रव्योपार्जन केलें नाहीं, मातापितरांची सेवाही स्वस्थ मनानें केली नाहीं, चंचल मृगनयना स्त्रिया स्वप्नांतही आलिंगिल्या नाहींत; तर आह्मीं आपल्या आयुष्याचा सर्व हा काल परान्नाविषयीं काका (कावळ्या) सारख्या आसक्ततेनें नेला ॥ २७९ ॥

ब्रह्मज्ञानविवेकनिर्मलधियः कुर्वंत्यहो दुष्करं, यन्मुं-
चंत्युपभोगवंति च धनान्येकांततो निःस्पृहाः ॥
न प्राप्तानि पुरा न संप्रति न च प्राप्तौ दृढप्रत्ययो, वां-
छा मात्र परिग्रहाण्यपि परित्यक्तुं न शक्ता वयम् २८०

अर्थ—ब्रह्मज्ञान—विचारानें निर्मल बुद्धि झालेले लोक स्वभावतः निस्पृह असून ते सुखोपभोग-योग्य धनांचा त्याग जो करतात तें कर्म दुष्कर असल्यामुळें आश्चर्यकारक आहे. तें आश्चर्य असें कीं, पूर्वीं प्राप्त न झालेलीं सांप्रत कालींही नसणारीं व ज्यांचा मिळण्याविषयीं दृढ विश्वास नाहीं असें असून केवळ आपल्या इच्छेनें मात्र ज्यांचा अंगीकार मानलेला असतो, अशाही धनांचा त्याग करण्यास आह्मीं अज्ञानी जन समर्थ नाहीं. ॥ २८० ॥

उद्यमेन हि सिध्यंति कार्याणि न मनोरथैः ॥ न हि
सुप्तस्य सिंहस्य प्रविशंति मुखे मृगाः ॥ २८१ ॥

अर्थ—सर्व कार्ये उद्योगानेंच सिद्ध होतात. केवल मनोरथानें सिद्ध होत नाहींत. याचें उदाहरण असें कीं, निद्रित सिंहाच्या मुखांत मृग स्वतः येऊन प्रवेश जसा करीत नाहींत तद्वत्. ॥ २८१ ॥

उद्यमः साहसं धैर्यं बुद्धिः शक्तिः पराक्रमः ॥ षडेते
यत्र वर्तंते तत्र देवः सहायकृत् ॥ २८२ ॥

अर्थ—उद्योग, साहस, धैर्य, बुद्धि, शक्ति व पराक्रम हे सहा गुण जेथें असतात, तेथें देव साहाय्य करणारा आहे असें जाणावें ॥ २८२ ॥

उद्योगिनः करालंबं करोति कमलालया ॥ अनुद्यो-
गिकरालंबं करोति कमलाग्रजा ॥ २८३ ॥

अर्थ—लक्ष्मी उद्योगी पुरुषाच्या हस्ताचा आश्रय करिते, आणि अलक्ष्मी (अवदसा) निरुद्योगी पुरुषाचा हात धरते ॥ २८३ ॥

आलसो हि मनुष्याणां शरीरस्थो महान् रिपुः ॥
नास्त्युद्यमसमो बंधुः कृत्वा यं नावसीदति ॥ २८४ ॥

अर्थ—आलस्यरूप महान् शत्रु मनुष्यांच्या शरीरांत रहाणारा आहे. आणि मनुष्यांस उद्योगासारखा अन्य बंधु नाहीं; कारण उद्योग केला असतां पुरुष खेद पावत नाहीं. ॥ २८४ ॥

न दैवमिति संचिंत्य त्यजेदुद्योगमात्मनः ॥ अनुद्य-
मेन कस्तैलं तिलेभ्यः प्राप्तुमिच्छति ॥ २८५ ॥

अर्थ—दैवानें माझें कार्य होईल असें चिंतन करून पुरुषानें आपल्या कर्तव्य उद्योगाचा त्याग करूं नये; कारण उद्योग केल्यावांचून तिळांतील तैल प्राप्त होण्यासाठीं कोण इच्छा करील. व केली असतां पूर्ण कोठून होईल ॥ २८५ ॥

पूर्वजन्मजनितं पुराविदः कर्म दैवमिति संप्रचक्षते ॥

उद्यमेन तदुपार्जितं चिराद्दैवमुद्यमवशं न त-त्कथम् ॥ २८६ ॥

अर्थ—पूर्व जन्मांत केलेल्या कर्मास दैव असें पुरातन ज्ञाते ह्मणतात, यावरून दैव पूर्वी चिरकाल उद्योगानेंच संपादन केलेलें आहे; यास्तव तें तरी उद्योगाधीन नाहीं हें कसें घडेल. ॥ २८६ ॥

गुणवज्जनसंसर्गाद्याति सर्वोपि गौरवम् ॥ पुष्पमाला-प्रसंगेन सूत्रं शिरसि धार्यते ॥ २८७ ॥

अर्थ—सर्वही वस्तु गुणवंत जनांच्या संबंधानें महत्वास प्राप्त होतात. यास दृष्टांत असा कीं, पुष्प-मालेच्या प्रसंगामुळें लोक मस्तकावर सूत धारण करतात. ॥ २८७ ॥

गुणाः सर्वत्र पूज्यंते पितृवंशो निरर्थकः ॥ वसुदेवं परित्यज्य वासुदेवं नमेज्जनः ॥ २८८ ॥

अर्थ—गुण सर्वत्र पूज्य होतात, आणि पितृवंश केवल निरर्थक आहे. याचें उदाहरण असें कीं, लोक वसुदेवाचा त्याग करून श्रीकृष्णास नमस्कार करितात. ॥ २८८ ॥

यदि संति गुणाः पुंसां विकसन्त्येव ते स्वयम् ॥ न हि-कस्तूरिकामोदः शपथेन निवार्यते ॥ २८९ ॥

अर्थ—पुरुषांस गुण जर असले तर ते स्वयमेव कीर्तीनेंच प्रसिद्ध होतात. याचा अनुभव असा कीं, कस्तूरीच्या सुगंधाचें निवारण शपथेनें होत नाहीं. ॥ २८९ ॥

गुणिनि गुणज्ञो रमते नागुणशीलस्य गुणिनि परि-तोषः ॥ अलिरेति वनात् पद्मं न दर्दुरस्त्वेकवा-सोऽपि ॥ २९० ॥

अर्थ—गुणज्ञाता गुणयुक्त वस्तूच्या ठिकाणीं रमतो. परंतु गुणिपदार्थावि-षयीं स्वभावतः गुणहीनास संतोष होत नाहीं. याविषयीं दृष्टांत असा कीं, भ्रमर गंधरूप गुणाचा ज्ञाता असल्यामुळें तो त्या गंधाच्या लोभानें वनां-तून कमळाकडे येतो; परंतु बेडूक त्या कमलासमीप उदकांत एकत्र राहणारा असूनही कमलाकडे जसा जात नाहीं तद्वत्. ॥ २९० ॥

असारे खलु संसारे सारं श्वशुरमंदिरम् ॥ हरो हिमालये
शेते हरिः शेते महोदधौ ॥ २९१ ॥

अर्थ—असार स्वरूप संसारांत श्वशुर-गृह हें एक सार आहे. अत एव शंकर हिमालयावर निद्रा करितात, व विष्णु क्षीरसमुद्रांत निद्रा करतात. ॥ २९१ ॥

असारे खलु संसारे सारमेतच्चतुष्टयम् ॥ काश्यां वासः
सतां संगो गंगांभः शंभुसेवनम् ॥ २९२ ॥

अर्थ—काशीवास, सत्संग, गंगोदक, व शंभुसेवन हें चतुष्टय साररहित संसारांत सार आहे. ॥ २९२ ॥

क्वचिद्विद्वद्गोष्ठी क्वचिदपि सुरामत्तकलहः, क्वचिद्वी-
णावादः क्वचिदपि च हाहेति रुदितम् ॥ क्वचिद्रम्या
रामा क्वचिदपि जराजर्जरतनुर्न जाने संसारः
किममृतमयः किं विषमयः ॥ २९३ ॥

अर्थ—क्वचित् स्थलीं विद्वानांच्या गोष्टी, क्वचित्स्थानीं मद्यानें उन्मत्त झालेल्या लोकांचा कलह, कोठें वीणावादन, क्वचित् स्थानीं हाहाकारयुक्त रोदन, क्वचित्स्थानीं रमणीय स्त्री, क्वचित्स्थलीं जरेनें जर्जरित झालेल्या शरीरानें युक्त मनुष्य असे अनेक प्रकार संसारांत आहेत, यावरून हा संसार सुखरूप आहे किंवा दुःखरूप आहे हें मी कांहींच जाणत नाहीं ॥ २९३ ॥

शुचिसान्निध्ययोगेन हृदि रामोपगूहनात् ॥ कर्मसा-
क्षिसमालोकात् भवं हेमंतवज्जयेत् ॥ २१४ ॥

अर्थ—संसारास हेमंतऋतूसारखें जिंकावें. तें असें कीं, हेमंतऋतूंत अग्नि सान्निध्याच्या योगानें व वक्षस्थलीं स्त्रियांच्या आलिंगनानें जसें शीत निवारण होतें, तसें संसारांत गुरु आदिकरून सत्पुरुषांच्या समागमानें व ह्रदयांत रामचंद्राच्या ध्यानानें दुःख दूर होतें, आणि त्या ऋतूंत सूर्यावलोकनानें जशी थंडी दूर होते, तद्वत् भवदुःख परमात्म्याच्या अपरोक्ष ज्ञानानें दूर होतें. ॥ २१४ ॥

प्राणाघातान्निवृत्तिः परधनहरणे संयमः सत्यवाक्यं,
काले शक्त्या प्रदानं युवतिजनकथामूकभावः परेषाम्
॥ तृष्णास्रोतोविभंगो गुरुषु च विनयः सर्वभूता-
नुकंपा, सामान्यः सर्वशास्त्रेष्वनुपहतविधिः श्रेयसा-
मेष पंथाः ॥ २१५ ॥

अर्थ—प्राणहिंसेपासून निवृत्ति, परधन हरणाविषयीं प्रतिबंध, सत्यभाषण, यथोक्तकालीं शक्त्यनुसार दान करणें, तरुण परस्त्रियांच्या वार्तेविषयीं मूकत्व, विषयतृष्णेचा प्रतिबंध, मातापितरादि पूज्यजनांविषयीं नम्रता व सर्व भूतीं दया हा सर्व शास्त्रांतील अबाधित विधियुक्त सर्वसाधारण असा कल्याणाचा मार्ग आहे. ॥ २१५ ॥

आजन्मसिद्धं कौटिल्यं खलस्य च हलस्य च ॥
सोढुं तयोर्मुखाक्षेपमलमेकैव सा क्षमा ॥ २१६ ॥

अर्थ—दुर्जन व नांगर यांची वक्रता उत्पत्तीपासून स्वभावसिद्ध असून

त्यांच्या मुखांचा *आक्षेप सहन करण्याविषयीं ती एक *क्षमाच समर्थ आहे. ॥ १९६ ॥

नरस्याभरणं रूपं रूपस्याभरणं गुणः ॥ गुणस्याभरणं
ज्ञानं ज्ञानस्याभरणं क्षमा ॥ २९७ ॥

अर्थ—मनुष्यास रूप आभरण (अलंकार) असून रूपास अलंकारभूत गुण आहे आणि गुणास भूषणरूप ज्ञान असून ज्ञानास आभरण क्षमा आहे. ॥ २९७ ॥

यः सुंदरस्तद्वनिता कुरूपा या सुंदरी सा पतिरूपहीना
यत्रोभयं तत्र दरिद्रता च विधेर्विचित्राणि विचेष्टि-
तानि ॥ २९८ ॥

अर्थ—जो रूपानें सुंदर असतो त्याची स्त्री कुरूप असते. जी रूपानें सुंदरी असते तिचा पति रूपहीन असतो, आणि जेथें स्त्रीपुरुष उभयतां रूपसंपन्न असतात तेथें दारिद्य असतें. तस्मात् दैवाचीं चरित्रें विचित्र आहेत ॥ २९८ ॥

इतरकर्मफलानि यदृच्छया विलिखितानि सहे चतु-
रानन ॥ अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मा लिख
मा लिख मा लिख २९९ ॥

अर्थ—हे ब्रह्मदेवा, आपण स्वेच्छेनें इतर कर्मांचीं फळें माझ्या ललाटीं लिहिलींत, तरी तीं मी सहन करीन; परंतु अरसिक जनांमध्यें कवित्व निवेदन करणें हें माझ्या ललाटीं लेखन करूं नका अशी माझी त्रिवार प्रार्थना आहे. ॥ २९९ ॥

---

* दुर्जनाच्या मुखांतून निघणारी निंदा आणि नांगराच्या मुखानें पृथ्वीवर कर्षण.

* निंदा सहन करण्याविषयीं क्षमा म्हणजे सहनशक्ति, नांगराच्या मुखानें कर्षण रूप व्यथा सहन करण्याविषयीं क्षमा म्हणजे पृथ्वी.

तावत् कुलस्त्रीमर्यादा यावल्लज्जावगुंठनम् ॥ स्रस्ते त-
स्मिन्कुलस्त्रीभ्यो वरं वेश्यांगनाजनः ॥ ३०० ॥

अर्थ—यावत्कालपर्यंत लज्जेचें आवरण आहे, तावत्कालपर्यंतच कुलस्त्रि-
यांची मर्यादा समजावी, आणि तें लज्जेचें आवरण निघून गेलें असतां
त्या कुलस्त्रियांपेक्षां वेश्या स्त्रीजनच श्रेष्ठ जाणावा. ॥ ३०० ॥

चित्ते भ्रांतिर्जायते मद्यपानात् भ्रांते चित्ते पापचर्या-
मुपैति ॥ पापं कृत्वा दुर्गतिं यांति मूढास्तस्मान्मद्यं
नैव पेयं न पेयम् ॥ ३०१ ॥

अर्थ—मद्यपानापासून चित्तांत भ्रांति उत्पन्न होते. चित्त भ्रमयुक्त झालें
असतां मनुष्य पापाचरणास लागतो. नंतर त्यायोगानें मूढ पाप करून दुर्गतीला
जातात. यास्तव मद्यप्राशन करूं नये व नच करावें. ॥३०१॥

एकतश्चतुरो वेदा ब्रह्मचर्यं तथैकतः ॥ एकतःसर्वपा-
पानि मद्यपानं तथैकतः ॥ ३०२ ॥

अर्थ—जसे एका पारड्यांत चार वेद, तसेंच एका पारड्यांत ब्रह्मचर्य,
आणि जशीं एका पारड्यांत सर्व पापें, तसें एका पारड्यांत मद्यपान
जाणावें. ॥३०२ ॥

जन्मेदं व्यर्थतां नीतं भवभोगोपलिप्सया॥ काचमूल्येन
विक्रीतो हंत चिंतामणिर्मया ॥ ३०३ ॥

अर्थ—मीं संसरांतील भोगांच्या इच्छेनें हें जन्म व्यर्थ नेलें; यांत असें
झालें कीं, मीं काचेच्या किमतीनें चिंतामणि विकल्या सारखें हें मला खेदा-
स्पद झालें. ॥ ३०३ ॥

सानंदं सदनं सुताश्च सुधियः कांता न दुर्भाषिणी, स-
न्मित्रं सधनं स्वयोषिति रतिश्चाज्ञापराः सेवकाः ॥

॥ आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नपानं गृहे,
साधोः संगमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः३०४

अर्थ–आनंदयुक्त गृह, उत्तम बुद्धिमंत पुत्र, स्त्री दुर्भाषण न करणारी, धन संपन्न उत्तम मित्र, स्वस्त्रीच्याच ठिकाणीं प्रीति आज्ञाधारक सेवक, प्रति दिवशीं शिवपूजन, अतिथिसन्मानपूर्वक स्वगृहींच मिष्टान्नभक्षण व मिष्ट दुग्धजलादि प्राशन, तसाच सतत साधुसंग सेवितात, असें ज्या गृहीं घडेल तो गृहस्थाश्रम धन्य समजावा. ॥ ३०४ ॥

मानुष्यं वरवंशजन्म विभवो दीर्घायुरारोग्यता, स-
न्मित्रं सुसुतः सती प्रियतमा भक्तिश्च नारायणे ॥
विद्वत्वं सुजनत्वमिंद्रियजयः सत्पात्रदाने रतिस्ते
पुण्येन विना त्रयोदश गुणाः संसारिणां दुर्लभाः ३०५

अर्थ–मनुष्यत्व, त्यांत श्रेष्ठवंशांत जन्म, ऐश्वर्य, दीर्घायु, आरोग्यता, उत्तम मित्र, सुपुत्र, अतिप्रिय असून पतिव्रता अशी स्त्री, नारायणाविषयीं भक्ति, विद्वत्ता, सुजनत्व, इंद्रियजय, आणि सत्पात्रीं दान करण्या विषयीं प्रीति, हे तेरा गुण संसारिजनांस पुण्यावांचून दुर्लभ आहेत. ॥ ३०५ ॥

वयोवृद्धास्तपोवृद्धा ज्ञानवृद्धास्तथा परे ॥ ते सर्वे धन-
वृद्धस्य द्वारे तिष्ठंति किंकराः ॥ ३०६ ॥

अर्थ–वयोवृद्ध, तपोवृद्ध, व ज्ञानवृद्ध तसेच इतर गुणवृद्धादिक ते सर्व धनवृद्धाच्या द्वारांत किंकर होऊन राहतात. ॥ ३०६ ॥

यस्यार्थास्तस्य मित्राणि यस्यार्थास्तस्य बांधवाः॥ यस्या-
र्थः स पुमाँल्लोके यस्यार्थः स च पंडितः॥ ३०७ ॥

अर्थ–ज्याजवळ धन बहुत असतें, त्यासच मित्र अनुकूल असतात. ज्यापाशीं बहुत द्रव्य असतें, त्यासच बांधव अनुकूल असतात. ज्याजवळ धन असतें, तोच पुरुष लोकांत कीर्तिमान् होतो, आणि ज्यापाशीं द्रव्य असेल तोच पंडित समजावा. ॥ ३०७ ॥

तृष्णे देवि नमस्तुभ्यं धैर्यविप्लवकारिणि ॥ विष्णुस्त्रै-
लोक्यपूज्योपि यस्त्वया वामनीकृतः ॥ ३०८ ॥

अर्थ–हे धैर्यनाशक तृष्णे देवि, तुला नमस्कार असो. कारण, विष्णु त्रैलोक्यांत पूज्य असून त्यासही तूं वामन (अतिलहान) केलेंस व याचना करावयास लाविलेंस. ॥ ३०८ ॥

आशाया ये दासास्ते दासाः सर्वलोकस्य॥आशा येषां
दासी तेषां दासायते विश्वम् ॥ ३०९ ॥

अर्थ–जे आशेचे दास ते सर्व लोकांचे दास होतात; आणि आशा ज्यांची दासी त्यांस सकल विश्व दासासमान होतें. ॥ ३०९ ॥

अपि मेरूपमं प्राज्ञमपि शूरमपि स्थिरम्॥तृणीकरो-
ति तृष्णैका निमेषेण नरोत्तमम् ॥ ३१० ॥

अर्थ–मेरुपर्वतासमानही अचल, ज्ञानवान् व शूरही असून स्वभावानें स्थिर जरी आहे, तथापि अशा उत्तम पुरुषास एक तृष्णाच निमेषमात्रांत तृणासमान तुच्छ करिते. ॥ ३१० ॥

तेनाधीतं श्रुतं तेन तेन सर्वमनुष्ठितम् ॥ येनाशाः
पृष्ठतः कृत्वा नैराश्यमवलंबितम् ॥ ३११ ॥

अर्थ–ज्यानें सर्व आशा पृष्ठभागीं करून नैराश्याचा अंगिकार केला, त्यानें वेदशास्त्रांचें अध्ययन केलें, त्यानें उपनिषदादि वेदांतांचें श्रवण केलें व त्यानें तपादि सर्व धर्मांचें आचरण केलें असें जाणावें. ॥ ३११ ॥

आशा बलवती राजन् विपरीता हि शृंखला
॥ यया बद्धाः प्रधावंति मुक्तास्तिष्ठंति पंगुवत् ॥ ३१२ ॥

अर्थ.–हे राजन् आशा ही बलवत्तर विपरीत शृंखला (बेडी) आहे. ती अशी कीं, या शृंखलेनें जे बद्ध आहेत ते अतिशय धांवतात व जे इजपासून मुक्त आहेत ते पंगूसारखे एके ठिकाणीं स्वस्थ असतात.॥ ३१२॥

नास्त्यन्या तृष्णया तुल्या क्वचिदस्ति नितंबि-
नी ॥ या प्राणानपि मुष्णंती भवत्येवाधिकं प्रि-
या ॥ ३१३ ॥

अर्थ.– तृष्णेसमान अन्य स्त्री कोठेंच नाहीं. कारण, जी प्राणांसही हरण करीत असून अधिकच प्रिय होत आहे. ॥ ३१३ ॥

तृष्णे देवि नमस्तुभ्यं या त्वं सर्वस्य सर्वदा ॥ उ
त्पादयस्ययत्नेन गोष्पदे सागरभ्रमम् ॥ ३१४ ॥

अर्थ–हे तृष्णे देवि, तुला नमस्कार असो. कारण जी तूं सर्वांस सर्वकाळीं गाईच्या पावला इतक्या जाग्यांत सांचलेल्या पाण्यावर सागराचा भ्रम यत्नावांचून उत्पन्न करितेस. ॥ ३१४ ॥

गिरिर्महान् गिरेरब्धिर्महानब्धेर्नभो महत् ॥ नभसोपि
महद्ब्रह्म ततोप्याशा गरीयसी ॥ ३१५ ॥

अर्थ–पर्वत मोठा असून त्यापेक्षां समुद्र महान्, समुद्राहून आकाश महत्, आकाशापेक्षांही ब्रह्म महत् असून त्यापेक्षांही आशा मोठी आहे. ॥ ३१५ ॥

धनेषु जीवितव्येषु स्त्रीषु चाहारकर्मसु ॥ अतृ-
प्ताः प्राणिनः सर्वे याता यास्यंति यांति च ॥३१६॥

अर्थ.—धन, आयुष्य, स्त्रिया व आहार यांविषयीं सर्व प्राणी सदोदित अतृप्त असतात असे शेंकडो प्राणि मृत झाले, होतील व होताहेत.॥ ३१६॥

आशैव राक्षसी पुंसामाशैव विषमंजरी ॥ आ-
शैव जीर्णमदिरा धिगाशा सर्वदोषभूः ॥३१७॥

अर्थ.—पुरुषांस आशा हीच राक्षसी असून आशाच विषाची मंजरी, आशाच जुनें मद्य व आशाच सर्व दोष उत्पन्न होण्याची भूमि आहे. यास्तव आशेला धिक्कार असो. ॥ ३१७ ॥

ते धन्याः पुण्यभाजस्ते तैस्तीर्णः क्लेशसागरः॥
जगत्संमोहजननी यैराशाशीविषो जिता ॥३१८॥

अर्थ.—ज्यांनीं जगास अत्यंत मोह उत्पन्न करणारी आशारूप सार्पिणी जिंकली ते धन्य, तेच पुण्यवंत, व त्यांनीं क्लेशसागरभूत संसार उल्लंघिला असें समजावें. ॥ ३१८ ॥

परोपकारशून्यस्य धिङ् मनुष्यस्य जीवितम् ॥ या-
वंतः पशवस्तेषां चर्माप्युपकरिष्यति ॥ ३१९ ॥

अर्थ.—मनुष्याचें जीवित जर परोपकाररहित असलें तर त्यास धिक्कार असो. कारण, जितके पशु आहेत. त्या सर्वांचें चर्मही उपकाराविषयीं उपयोगीं पडतें. व मनुष्य देह निरर्थक. ॥ ३१९ ॥

धनानि जीवितं चैव परार्थे प्राज्ञ उत्सृजेत् ॥ त-
न्निमित्तो वरं त्यागो विनाशे नियते सति ॥ ३२० ॥

अर्थ.—ज्ञानसंपन्न पुरुषानें स्वकीय धनें व जीवित यांची परोपकारार्थ योजना करावी. कारण त्यांचा निश्चित नाश होणारा आहे, यास्तव त्यांचें दान करणें हेंच श्रेष्ठ आहे. ॥ ३२० ॥

जातिर्यातु रसातलं गुणगणस्तस्याप्यधो ग-
च्छतु, शीलं शैलतटात् पतत्वभिजनः संदत्य-

ता वन्हिना ॥ शौर्ये वैरिणि वज्रमाशु निपत-
त्वर्थोस्तु नः केवलं, येनैकेन विना गुणास्तृ-
णलवप्रायाः समस्ता इमे ॥ ३२१ ॥

अर्थ.—जाति रसातलास जावो, गुणसमुदाय त्याच्याही अधोमार्गी जावो. तसेंच शील पर्वताच्या तटावरून खालीं पडो, तसाच स्वजन अग्नीनें दग्ध होवो, त्याचप्रमाणें शौर्यरूप शत्रूवर वज्रपात शीघ्र होवो असे सर्व प्रकार घडले तरी चिंता नाहीं; परंतु आह्मास एक द्रव्य मात्र अनुकूल असो. कारण ज्या एका द्रव्यावांचून हे सर्व गुण तृणलवा सारखे होतात.॥३२१॥

धिगस्त्वेतां विद्यां धिगपि कवितां धिक् सुजन-
तां, वयो रूपं धिक् धिक् धिगपि च यशो निर्धनव-
तः ॥ असौ जीयादेकः सकलगुणहीनोपि धनवान्,
बहिर्यस्य द्वारे तृणलवनिभाः संति गुणिनः ॥३२२॥

अर्थ—निर्धन पुरुषाच्या विद्येला, कवितेला, सुजनतेला, वयाला, रूपाला आणि यशाला, या सर्वांला धिक्कार असो, कारण, पहा कीं, धनवान् सकल गुणांनीं हीन जरी असला, तथापि तो एकाकी सर्वांस जिंकतो. म्हणूनच त्याच्या बाहिर्द्वारप्रदेशीं सर्वगुणी तृणलवासारखे होऊन असतात. ॥ ३२२ ॥

धनमर्जय काकुत्स्थ धनमूलमिदं जगत् ॥ अं-
तरं नैव पश्यामि निर्धनस्य मृतस्य च ॥ ३२३ ॥

अर्थ—हे ककुत्स्थकुलोत्पन्न राजन्, धन संपादन कर. कारण, या जगाची स्थिति केवल धनमूलकच आहे, आणि याचा अनुभवही असा आहे कीं, निर्धन व मृत हे दोघे सारखेच, यांत अंतर काडी भर नाहीं. ॥३२३॥

न विद्यया नैव कुलेन गौरवं, जनानुरागो धनिके-

षु सर्वदा ॥ कपालिना मौलिधृतापि जान्हवी,
प्रयाति रत्नाकरमेव सत्वरम् ॥ ३२४ ॥

अर्थ–केवल विद्या व कुल यांनीं मनुष्यास गौरव प्राप्त होतो असें नाहीं; तर जनांची प्रीति सर्वदा धनिकांविषयींच असते. याचें उदाहरण असें कीं, शिवांनीं भागीरथी मस्तकीं धारण केली तरी ती रत्नाच्या आकर (खाण) रूप समुद्रासच मिळण्यासाठीं त्वरेनें जाते. ॥ ३२४ ॥

त्यजंति मित्राणी धनैर्विहीनं, पुत्राश्च दाराश्च सु-
हृज्जनाश्च ॥ तमर्थवंतं पुनराश्रयंति त्यर्थो हि
लोके पुरुषस्य बंधुः ॥ ३२५ ॥

अर्थ–मित्र, पुत्र, स्त्रिया व संबंधिजन हे धनविरहित पुरुषाचा त्याग करतात; आणि तोच पुरुष द्रव्यवान् झाला असतां ते मित्रादिक पुनः त्याचा आश्रय करतात. यावरून लोकांत धनच पुरुषास बंधुरूप आहे असें सिद्ध होतें. ॥ ३२५ ॥

प्रायेण धनिनामेव धनलोभो निरंतरम् ॥ पश्य को-
टिद्वयोपेतं लक्षं प्रार्थयते धनुः ॥ ३२६ ॥

अर्थ–धनिक लोकांसच प्रायः निरंतर धनलोभ असतो. यांस उदाहरण असें कीं, जें धनुष्य दोन कोटींनीं संपन्न असतें तथापि तें लक्षाविषयीं प्रार्थना करितें. ह्मणजे ज्या धनुष्याला दोन प्रत्यंचा (दोऱ्या) असतात त्याला लक्ष (नेम मारण्यास एखादी वस्तु) लागतें. ॥ ३२६ ॥

गुणैरुत्तुंगतां याति नोच्चैरासनसंस्थितः ॥ प्रासा-
दशिखरारूढः काकः किं गरुडायते ॥ ३२७ ॥

अर्थ–कोणी पुरुष गुणांनीं श्रेष्ठत्वास प्राप्त होतो परंतु गुण नसून उच्च आसनावर बसला तरी श्रेष्ठत्व पावत नाहीं, याचा अनुभव असा कीं,

काक पक्षी देवालयाच्या शिखरावर बसला तरी तो गरुडासारखा पूज्य होतो काय? नाहीं. ॥ ३२७ ॥

गुणेषु क्रियतां यत्नः किमाटोपैः प्रयोजनम् ॥ वि-
क्रीयंते न घंटाभिः गावःक्षीरविवर्जिताः ॥ ३२८ ॥

अर्थ—पुरुषांनीं गुणसंपादनाविषयीं यत्न अवश्य करावा. व्यर्थ खटाटोपाचें प्रयोजन काय? यास दृष्टांत-दुग्धरहित गायी असल्या तर त्या केवळ घंटांच्या शोभेनें विकल्या जातात कां? नाहींत. ॥ ३२८ ॥

किंशुके शुक मा तिष्ठ चिरकालफलेच्छया ॥
बाह्यरंगप्रसंगेन के के नानेन वंचिताः ॥ ३२९ ॥

अर्थ.—हे शुका, (राघु) तूं बहुकालपर्यंत फलप्राप्तीच्या इच्छेनें पलाश वृक्षावर बसूं नको. कारण, बाह्यरंगाच्या प्रसंगेंकरून या वृक्षानें कोणा कोणाची वंचना केली नाहीं? तर सर्वांलाही फसविलें. ॥ ३२९ ॥

सुमुखोपि सुवृत्तोपि सन्मार्गे पतितोपि च ॥ म-
हतां पादलग्नोपि व्यथयत्येव कंटकः ॥ ३३० ॥

अर्थ.— कंटक (कांटा) उत्तम मुखानें युक्त जरी आहे व चांगला वर्तुळाकृति असून उत्कृष्ट मार्गांत जरी पडलेला असला, आणि यद्यपि मोठ्याच्या पायास लागला, तथापि तो जसा व्यथाच देतो, तसा दुर्जन सुंदर-मुख युक्त, सदाचारी, सन्मार्गांत वर्तणारा व महात्म्याच्या पायां पडणारा असा जरी असला, तरी तो दुःखदायकच जाणावा. ॥ ३३० ॥

त्यक्त्वापि निजप्राणान् परहितविघ्नं खलः करो
त्येव ॥ कवले पतिता सद्यो वमयति मक्षिकान्नभो-
क्तारम् ॥ ३३१ ॥

अर्थ.—दुर्जन स्वप्राणांचाहि त्याग करून पराहितास विघ्न करतोच. यास

दृष्टांत असा कीं, ग्रासांत पडलेली मक्षिका जशी अन्न भक्षण करणारास तत्काळ ओकविते तद्वत्. ॥ ३३१ ॥

संत्यज्य शूर्पवद्दोषान् गुणान् गृण्हाति पंडितः ॥
दोषग्राही गुणत्यागी पल्लोल इव दुर्जनः ॥ ३३२ ॥

अर्थ.—पंडित शूर्पा (सूप) प्रमाणें दोषांचा त्याग करून गुण ग्रहण करितो; आणि दुर्जन स्वभावानें पल्लोला (चाळणी) सारखा असल्यामुळें तो गुणांचा त्याग करून दोष ग्रहण करतो. ॥ ३३२ ॥

अकस्मादेव कुप्यंति प्रसीदंत्यनिमित्ततः ॥ शील-
मेतदसाधूनामभ्रं पारिप्लवं यथा ॥ ३३३ ॥

अर्थ.—अकस्मात् क्रुद्ध होतात व विनाकारण प्रसन्न होतात, हें दुर्जनांचें शील (स्वभाव) अभ्रासारखें चंचल असतें. ॥ ३३३ ॥

अरण्यं सारंगैर्गिरिकुहरगर्भाश्च हरिभिर्दिशो दि-
ङ्मातंगैः सलिलमुषितं पंकजवनैः ॥ प्रियाचक्षु-
र्मध्यस्तनवदनसौंदर्यविजितैः, सतां माने म्लाने
मरणमथवा दूरगमनम् ॥ ३३४ ॥

अर्थ.—स्त्रियांचे नेत्र, कटी, स्तन व मुख यां संबंधि सौंदर्यानें पराजित झालेल्या हरिणादिकांनीं अरण्यादिक सेवन केलें तें असें कीं, त्यांच्या नेत्र शोभेनें हरिण, कटिशोभेनें पराजित सिंहांनीं पर्वतगुहांत गमन केलें. स्तनसौंदर्यानें पराभव पावलेल्या दिग्गजांनीं दिशांच्या अंतीं गमन केलें व मुखसौंदर्यानें पराभूत झालेल्या कमलसमुदायांनीं उदकांत प्रवेश केला. कारण मोठ्यांचा मानभंग झाला असतां त्यांस मरण अथवा दूरगमन हीं प्राप्त करून घ्यावीं लागतात, ॥ ३३४ ॥

गुरोरधीताखिलवैद्यविद्यः पीयूषपाणिः कुशलः

क्रियासु ॥ गतस्पृहो धैर्यधर : कृपालुः शुद्धोऽधि-
कारी भिषगीदृश : स्यात् ॥ ३३५ ॥

अर्थ.—गुरूपासून सकल वैद्यविद्याध्ययन केलेला असून, अमृतहस्ती, औषधादि क्रियांत कुशल, निस्पृह, धैर्य धारण करणारा, कृपालु, पवित्र व अधिकारी असा वैद्य असावा. ॥ ३३५ ॥

यथा वृष्टिः समुद्रेषु भुक्तस्योपरि भोजनम् ॥ एवं
प्रीतिः खलैः सार्धमुत्पन्नाप्यवसीदति ॥ ३३६ ॥

अर्थ.—समुद्रांत जशी पर्जन्यवृष्टि, भोजन केल्यावर जसें भोजन, तशी दुर्जनाबरोबर मैत्री उत्पन्न झाली तरी ती नाश पावते. ॥ ३३६ ॥

यशो यस्माद्भस्मीभवति वनवन्हेरिव वनं, निदानं
दुःखानां यदवनिरुहाणामिव जलम् ॥ न यत्र स्या-
च्छाया तप इव तपःसंयमकथा, कथं चित्तन्मिथ्या
वचनमभिधत्ते न मतिमान् ॥ ३३७ ॥

अर्थ.—दावाग्नीपासून दग्ध होणाऱ्या वनासारखें यश, ज्याच्या योगानें नाश पावत असून जें दुःखांचें मूळकारण आणि जें वृक्षांच्या नाशास जलासमान आहे, त्याचप्रमाणें उन्हांतील छायेसारखी ज्याच्या ठिकाणीं तप व संयम यांची वार्ताही नसते, असें जें असत्य भाषण तें बुद्धिमान् कदापि करीत नाहीं. ॥ ३३७ ॥

कामान् दुग्धे विप्रकर्षत्यलक्ष्मीं कीर्तिं सूते दुष्कृ-
तं या हिनस्ति ॥ तां चाप्येतां मातरं मंगलानां धे-
नुं धीराः सूनृतां वाचमाहुः ॥ ३३८ ॥

अर्थ—जी वाणी सर्व मनोरथ पूर्ण करणारी असून अलक्ष्मीला (अवदसा) दूर करिते, कीर्ति उत्पन्न करून दुष्कर्माचा नाश करिते, आणि ती सर्व मंगलांची माता आहे यास्तव ज्ञानसंपन्न पुरुष या सत्य वाणीला कामधेनु ह्मणतात. ॥ ३३८ ॥

गानाब्धेस्तु परं पारं नोपेयाय सरस्वती ॥ अतो
निमज्जनभयात् तुंबीं वहति वक्षसि ॥ ३३९ ॥

अर्थ—सरस्वती गायन समुद्राच्या परतीरास प्राप्त झाली नाहीं, अतएव त्या समुद्रांत बुडण्याच्या भयामुळें तिनें वक्षस्थळावर तुंबीफल धारण केलें, आणि बुडण्याच्या भीतीस्तव भोपळ्याचा आश्रय करणें लोकांतही प्रसिद्ध आहे. ॥ ३३९ ॥

यां कर्षति निजयोगादंतर्गतजीविनानि सरसानाम्
॥ वाणी सैव गुणवती घटीव यद्वा वधूटीव ॥ ३४० ॥

अर्थ—दोरी बांधलेली घागर जशी कूपादिकांतील उदक वर काढिते, किंवा प्रौढत्वादि गुणयुक्त तरुण स्त्री आपल्या योगानें जशी रसिक पुरुषांच्या हृद्गत जीवनाचें आकर्षण करिते, तशी जी वाणी आपल्या योगेंकरून रसिक जनांचीं अंतःकरणें आकर्षण करिते तीच वाणी उत्तम गुणयुक्त जाणावी ॥ ३४० ॥

इयत्यामपि सामग्र्यां सुकृतं न कृतं त्वया ॥इतीव कु-
पितो दंतानंतकः पातयत्यलम् ॥ ३४१ ॥

अर्थ—पूर्व वयांत इंद्रियादिक इतकी सर्व सामग्री अनुकूल असूनही तूं सुकृत केलें नाहींस या कारणानेंच काय अत्यंत क्रुद्ध झालेला यम दंत पाडतो. ॥ ३४१ ॥

गात्रं संकुचितं गतिर्विगलिता भ्रष्टा च दंतावलिर्दृ-
ष्टिर्नश्यति वर्धते बधिरता वक्त्रं च लालायते ॥ वा-

कथं नाद्रियते च बांधवजनैर्भार्या न शुश्रूषते, हा क-
ष्टं पुरुषस्य जीर्णवयसः पुत्रोप्यमित्रायते ॥ ३४२ ॥

अर्थ—जरा प्राप्त झाली असतां अवयव आकुंचित होऊन गति विगलित होते, दंतपंक्ति पडते, अवलोकन-शक्ति नाश पावते, बधिरत्व (बहिरेपणा) वाढतो, मुख लाळेनें व्याप्त होतें, बांधवजन पूर्ववत् वचनाचा आदर करीत नाहींत, भार्या सेवा करीत नाहीं, व पुत्रही शत्रूसारखा वर्तू लागतो; तस्मात् जराग्रस्त वयाच्या पुरुषाचें दुःख परम खेदास्पद आहे. ॥ ३४२ ॥

अशनं मे वसनं मे जाया मे बंधुवर्गो मे ॥ इति मे
मे कुर्वाणं कालवृको हंति पुरुषाजम् ॥ ३४३ ॥

अर्थ—भोजन माझें, वस्त्र माझें, स्त्री माझी व बंधुवर्ग (माझे) असें प्रत्येक विषयाविषयीं मे मे शब्दाचें उच्चारण करणाऱ्या पुरुष रूपी बोकडास कालरूपी लांडगा मारतो. ॥ ३४३ ॥

अप्सु प्लवंते पाषाणाः मानुषा घ्नंति राक्षसान् ॥ क-
पयः कर्म कुर्वंति कालस्य कुटिला गतिः ३४४ ॥

अर्थ—रामावतारीं पाषाण उदकांत तरले, राम लक्ष्मण हे मनुष्यांत जन्मले असून त्यांनीं राक्षसांस मारिलें आणि वानरांनीं युद्धकर्म केलें तस्मात् कालाची गति विचित्र आहे.॥३४४॥

क्षमा बलमशक्तानां शक्तानां भूषणं क्षमा ॥ क्ष-
मा वशीकृतिर्लोके क्षमया किं न सिध्यति ॥ ३४५ ॥

अर्थ—अशक्त पुरुषांस क्षमाच बल आहे, आणि शक्तांस क्षमा भूषणरूप आहे; क्षमा लोकांत सर्वांस वश करिते, व क्षमेनें काय सिद्ध होत नाहीं! सर्व साध्य आहे. ॥ ३४५ ॥

नास्ति क्षुधासमं दुःखं नास्ति रोगः क्षुधासमः ॥
नास्त्याहारसमं सौख्यं नास्ति क्रोधसमो रिपुः ३४६

अर्थ—क्षुधेसमान दुःख नाहीं, क्षुधेसारखा रोग नाहीं, आहारासम सौख्य नाहीं व क्रोधासारखा शत्रु नाहीं. ॥ ३४६ ॥

परोपदेशे पांडित्यं सर्वेषां सुकरं नृणाम् ॥ धर्मे स्वय-
मनुष्ठानं कस्य चित् सुमहात्मनः ॥ ३४७ ॥

अर्थ—परोपदेशाविषयीं पांडित्य करणें सर्व मनुष्यांस सुलभ आहे. परंतु स्वतः धर्मानें आचरण घडणें हें एकाद्या अतिशयित महात्म्यासच घडतें. व तें घडणें फार दुर्घट आहे. ॥ ३४७ ॥

उपचरितव्याः संतो यद्यपि कथयंति नैकमुदपेशम् ॥
यास्तेषां स्वैरकथास्ता एव भवंति शास्त्राणि ॥३४८॥

अर्थ—जरी साधूंनीं कांहीं एक उपदेश केला नाहीं, तरी त्यांची सेवा करीत असावी; कारण त्यांच्या ज्या स्वच्छंद गोष्टी चालतात त्याच इतरांस शास्त्ररूप असतात. ॥ ३४८ ॥

मनसि वचसि काये पुण्यपीयूषपूर्णास्त्रिभुवन-
मुपकारश्रेणिभिः प्रीणयंतः ॥ परगुणपरमा-
णून् पर्वतीकृत्य नित्यं, निजत्दृदि विकसंतः संति
संतः कियंतः ॥ ३४९ ॥

अर्थ—मन, वाणी व देह यांत पुण्यरूप अमृतानें पूर्ण असून त्रिभुवनांतील प्राणिमात्रांवर सहस्त्रावधि उपकार करून संतुष्ट करणारे आणि परकीय गुणांचे परमाणूंस पर्वतासारखें महत्व देऊन सर्वदा स्वकीय अंतःकरणांत आनंद पावणारे असे साधु किती आहेत? तर फारच थोडे आहेत. ३४९

किं तेन हेमगिरिणा रजताद्रिणा वा यत्र श्रिताश्च
तरवस्तरवस्त एव ॥ मन्यामहे मलयमेव यदाश्र-

येण कंकोलनिंबकुटजा अपि चंदनाः स्युः ॥३५०॥

अर्थ—सुवर्णपर्वत मेरु किंवा रजतपर्वत हिमालय यांचा काय उपयोग आहे, कारण त्यांवरील वृक्ष केवळ वृक्षत्वानेंच राहिले आहेत, आणि कंकोळ, निंब व कुटज (कुडा) इत्यादिक सर्व वृक्ष ज्याच्या आश्रयानें चंदन होतात. अशा मलयपर्वतासच आह्मी श्रेष्ठत्व देतों व तें देणें योग्यच आहे ॥ ३५० ॥

आपत्स्वेव हि महतां शक्तिरभिव्यज्यते न संपत्सु ॥
अगुरोस्तथा न गंधो घ्राणेऽस्ति यथाग्निपतितस्य ३५१

अर्थ—महात्म्यांची शक्ति विपत्तींतच जशी प्रगट होते तशी संपत्तींत प्रगट होत नाहीं. यास दृष्टांत अग्नींत पडलेल्या अगरुनामक चंदनाचें अवघ्राण (वास घेणें) केलें असतां जसा सुगंध येतो, तसा त्याचें साक्षात् अवघ्राण केलें तरी येत नाहीं ॥ ३५१ ॥

हृदयानि सतामेव कठिनानीति मे मतिः ॥ खलवाग्विशिखैस्तीक्ष्णैर्भिद्यंते न मनाग् यतः ॥३५२॥

अर्थ—साधूंचीं अंतःकरणें कठिण आहेत अशी माझी बुद्धि आहे; कारण तीं तीक्ष्ण अशा दुर्जनांच्या वाग्बाणांनीं किंचितही विदारण पावत नाहींत ॥ ३५२ ॥

अंजलिस्थानि पुष्पाणि वासयंति करद्वयम् ॥ अहो
सुमनसां प्रीतिर्वामदक्षिणयोः समा ॥ ३५३ ॥

अर्थ—ओंजळींतील पुष्पें दोन्ही हस्तांस सुगंधयुक्त करितात. यावरून असें सिद्ध होतें कीं, सुमनसांची प्रीति वाम व दक्षिण या दोनी करांवर समान असते हें महदाश्चर्य आहे ॥ ३५३ ॥

कुंभः परिमितमंभः पिबत्यसौ कुंभसंभवोंभो-

विम् ॥ अतिरिच्यते सुजन्मा कश्चिज्जनकान्निजे-
न चरितेन ॥ ३५४ ॥

अर्थ–कुंभ आपल्या अवकाशाप्रमाणें परिमित उदक ग्रहण करतो, आणि कुंभापासून जन्मलेल्या अगस्त्य मुनीनें समुद्राचें प्राशन केलें, यावरून असें सिद्ध झालें कीं, कोणी एकादा उत्तम जन्मलेला पुरुष आपल्या चरित्रानें पित्यापेक्षां अधिक होतो. ॥ ३५४ ॥

तुंगासनास्तुंगतराः समर्था मनोरथान् पूरयितुं
न नीचाः ॥ धाराधरा एव धराधराणां निदाघदाहं
शमितुं न नद्यः ॥ ३५५ ॥

अर्थ.–उंच आसनावर आरूढ असून स्वतःही अतिश्रेष्ठ असे जे पुरुष तेच मनोरथ पूर्ण करण्याविषयीं समर्थ असतात; परंतु नीच त्याविषयीं समर्थ होत नाहींत. यास दृष्टांत पर्वतावरील उष्ण कालसंबंधि दावाग्नीचा दाह शांत करण्याविषयीं मेघच समर्थ आहेत. नद्या नाहींत. ॥ ३५५ ॥

यथा धेनुसहस्रेषु वत्सो विंदति मातरम् ॥ तथा पू-
र्वकृतं कर्म कर्तारमनुगच्छति ॥ ३५६ ॥

अर्थ.–वत्स जसा अनेक सहस्र गायींत स्वमातेलाच ओळखून तिजकडे जातो तद्वत् पूर्वकृत कर्म आपल्या कर्त्याला अनुलक्षून जातें. ॥ ३५६ ॥

नैवाकृतिः फलति नैव कुलं न शीलं, विद्याऽपि नैव
न च यत्नकृताऽपि सेवा ॥ भाग्यानि पूर्वतपसा कि
ल संचितानि, काले फलंति पुरुषस्य यथैव वृक्षाः
॥ ३५७ ॥

अर्थ.–आकृति फलद्रूप होत नाहींच, कुल नाहींच, शील नाहीं, विद्याही नाहींच व त्याचप्रमाणें प्रयत्नानें केलेली सेवाही नाहीं. तर वृक्षासारखीच

पूर्वतपानें संचित झालेलीं भाग्यें पुरुषास भोगकालीं निश्चयेंकरून फलद्रूप होतात ॥ ३५७ ॥

अहो प्रकृतिसादृश्यं श्लेष्मणो दुर्जनस्य च ॥ मधुरैः
कोपमायाति कटुकेनैव शाम्यति ॥ ३५८ ॥

अर्थ.—कफ व दुर्जन यांचा स्वभाव समान हें आश्चर्य आहे. तें हें कीं, कफ मधुर पदार्थांनीं प्रकुपित होतो व दुर्जन मधुर भाषणांनीं क्रुद्ध होतो, आणि कफ कटु औषधांनींच उपशम पावतो व दुर्जन कटु भाषणांनींच उपशम पावतो. ॥ ३५८ ॥

पिशुनत्वमेव विद्या परदूषणमेव भूषणं येषां ॥
परदुःखमेव सौख्यं शिव शिव ते केन वेधसा सृ-
ष्टाः ॥ ३५९ ॥

अर्थ—दुर्जनपणाच विद्या, परांस दूषण लावणें हेंच भूषण, परदुःखच सौख्य, असें ज्यास इष्ट असतें, ते दुष्ट हे शिव शिव कोणत्या ब्रह्मदेवानें उत्पन्न केले आहेत न कळे. ॥ ३५९ ॥

रोहणं सूक्तिरत्नानां वंदे वृंदं विपश्चिताम् ॥ यन्मध्ये
पतितो नीचः काचोप्युच्चैर्महीयते ॥ ३६० ॥

अर्थ—उत्तम भाषणरूप रत्नांचें उत्पत्तिस्थानभूत अशा विद्वज्जनांच्या समुदायास मी नमस्कार करितों; कारण ज्यांमध्यें पडलेला काचेसारखाही नीच पुरुष उत्तम पूज्य होतो ॥ ३६० ॥

शास्त्रोपस्कृतशब्दसुंदरगिरः शिष्यप्रदेयागमा
विख्याताः कवयो वसंति विषये यस्य प्रभोर्नि-
र्धनाः ॥ तज्जाड्यं वसुधाधिपस्य कवयो ह्यर्थं विना-

पीश्वराः, कुत्स्याः स्युः कुपरीक्षका न मणयो यैरर्घ-
तः पातिता :॥ ३६१ ॥

अर्थ—व्याकरणशास्त्र संस्कारानें शुद्ध झालेल्या शब्दांनीं ज्यांची वाणी संस्कृत झाली आहे व ज्यांचीं शास्त्रें शिष्यांस अध्ययनद्वारा देण्याविषयीं सिद्ध आहेत असे प्रख्यात पंडित ज्या राजाच्या देशांत निर्धन स्थितींत वास करतात, तें मूर्खत्व त्या राजाचें समजावें; कारण ते कवि द्रव्यावांचूनही स्वयमेव समर्थ आहेत. परंतु ते राजे मात्र लोकनिंदेस पात्र होतात. यास दृष्टांत-जे हिरे इत्यादिक रत्नांची खरी योग्यता न जाणतां त्यांची भलतीच किंमत करितात ते परीक्षक निंदास्पद होतात. रत्नाला कोणीही नांव ठेवित नाहींत ॥ ३६१ ॥

दुर्जनं सुजनं कर्तुं नोपकारशतैरपि ॥ अपानं
मृत्सहस्रेण धौतं चास्यं कथं भवेत् ॥ ३६२ ॥

अर्थ—दुर्जनावर शेंकडो उपाय करून म्हटलें कीं, याला सौजन्य देऊं परंतु हें कोणाच्याही हातून व्हावयाचें नाहीं. यास दृष्टांत अपानद्वार (गुद-स्थान) मृत्तिकेनें हजारोंदां धुतलें तरी तें मुख कसें होईल? होणार नाहीं हें निश्चित आहे ॥ ३६२ ॥

भग्नकुंभशकलेन वैमलं बालकस्य जननी व्यपो-
हति ॥ तद्वदोष्ठवदनेन दुर्जनो मातृतः शतगुणा-
धिको भवेत् ॥ ३६३ ॥

अर्थ—जननी फुटलेल्या कुंभाच्या तुकड्यांनीं बालकाचा मल दूर टाकिते, तद्वत् दुर्जन ओंठ व मुख यांनीं उच्चारणद्वारा सज्जनांचे दोष दूर करतो, वास्तव तो मातेपेक्षां शतगुणित अधिक होतो. ॥ ३६३ ॥

अप्यात्मनो विनाशं गणयति न खलः परव्यसन-

हृष्टः ॥ प्रायो मस्तकनाशो समरमुखे नृत्यति कबं-

ध ः ॥ ३६४ ॥

अर्थ-परदुःखानें हर्ष पावणारा दुर्जन आपला विशेष नाश झाला तरी त्याची गणना करीत नाहीं. यास दृष्टांत कबंध (धड) आपल्या मस्तकाचा नाश झाला तरी युद्ध भूमीवर बहुत वीरांचा नाश झाला असतां प्रायशः नृत्य करतो. ॥ ३६४ ॥

जलनिधौ जननं धवलं वपुर्मुररिपोरपि पाणि-

तले स्थितिः ॥ इति समस्तगुणान्वित शंख भोः

कुटिलता त्त्हृदये न निवारिता ॥ ३६५ ॥

अर्थ-हे शंखा, तुझी उत्पत्ति समुद्रापासून व शरीर शुभ्र असून मुरारीच्या तळहातांत सर्वदां वासही आहे, अशा सर्व गुणांनीं युक्त आहेस. तथापि आपल्या त्त्हृदयावरील वक्रता दूर केली नाहींस. तस्मात् महदाश्चर्य आहे. ॥ ३६९ ॥

यद्यपि दैवाल्लब्धा कस्तूरी भूमिरत्र भूरितरम् ॥ नेया

किमसौ तदपि हि शौचार्थं जानता पुंसा ॥३६६॥

अर्थ-जरी या लोकीं मोठी कस्तुरीची जमीन सांपडली तरी जाणत्या पुरुषानें ती कस्तुरी शौचार्थ न्यावी काय? न न्यावी हेंच योग्य.॥३६६ ॥

स्वयं महेशः श्वशुरो नगेशः सखा धनेशस्तनयो ग-

णेशः ॥ तथापि भिक्षाटनमेव शंभोर्बलीयसी के-

वलमीश्वरेच्छा ॥ ३६७ ॥

अर्थ-स्वतः महान्, ईश्वर, श्वशुर हिमालय, मित्र कुबेर, पुत्र गणपती, असें असूनही शंभूला भिक्षाटनच प्राप्त झालें आहे, तस्मात् केवल ईश्वरेच्छाच अतिबलिष्ठ हेंच खरें. ॥ ३६७ ॥

किं त्वं न वेत्सि जगति प्रख्यातं लाभकारणे मूलं ॥
विधिलिखिताक्षरमालं फलति कपालं न
भूपालः ॥ ३६८ ॥

अर्थ—जगांत प्रख्यात व मुख्य कारण लाभ होण्यास कोणतें हें तूं जाणत नाहींस काय ? अरे ब्रह्मदेवानें लिहिलेल्या अक्षरपंक्तीनेंयुक्त कपाळच फलद्रूप होतें, राजा फलद्रूप होत नाहीं. कारण, त्याच्या हातीं आमच्या लाभाविषयीं कांहींच नसतें. ॥ ३६८ ॥

मज्जत्वंभसि यातु मेरुशिखरं शत्रून् जयत्वाहवे, वाणिज्यं कृषिसेवनादिसकला विद्याः कलाः शिक्षतु॥
आकाशं सकलं प्रयातु खगवत् कृत्वा प्रयत्नं परं नोऽभाव्यं भवतीह कर्मवशतो भाव्यस्य नाशः
कुतः ॥ ३६९ ॥

अर्थ—उदकांत बुड्या मारो; मेरु शिखरास जावो; रणांत शत्रूस जिंको; व्यापार, कृषिकर्म (शेतकी), सेवनादिक, सकल विद्या व कला हीं शिको; महा प्रयत्न करून पक्ष्याप्रमाणें सकल आकाश फिरो तथापि या लोकीं पूर्वकर्मबलानें जें न होणारें तें कदापि होत नाहीं. मग जें अवश्य होणारें आहे त्याचा नाश तरी कोठून होणार. ॥ ३६९ ॥

दैवमुल्लंघ्य यत् कार्यं क्रियते फलवन्न तत् ॥ सरोंभश्चातकेनात्तं गलरंध्रेण गच्छति ॥ ३७० ॥

अर्थ—दैवाची ज्या कार्यास अनुकूळता नसते तें कार्य केलें तरी तें फलयुक्त होत नाहीं. यास उदाहरण. पहा कीं, चातकानें सरोवरांतील उदक प्राशन केलें, तरी तें त्याच्या कंठछिद्रांतून बाहेर पडतें. ॥ ३७० ॥

भाग्यवंतं प्रसूयेथा मा शूरं मा च पंडितं ॥ शूराश्च कृतविद्याश्च वने सीदंति पांडवाः ॥ ३७१ ॥

अर्थ–भाग्यवान् अशा पुत्रास उत्पन्न कर, शूर किंवा पंडित अशी संतति नको. कारण शूर व विद्या केलेले असे असतांही पांडव वनांत दुःख पावतात. ॥ ३७१ ॥

न केवलं मनुष्येषु दैवं देवेष्वपि प्रभुः ॥ सति मित्रे धनाध्यक्षे चर्मप्रावरणो हरः ॥ ३७२ ॥

अर्थ–केवल मनुष्यांतच दैव आहे असें नाहीं, तर देवांतही तें नियामक आहे. याचा अनुभव. कुबेर मित्र असून शंकर चर्माचीं प्रावरणें धारण करितो. ॥ ३७२ ॥

क्रोशंतः शिशवः सवारि सदनं पंकावृतं चांगणं,
शय्या दंशवती च रूक्षमशनं धूमेन पूर्णं गृहं ॥
भार्या निष्ठुरभाषिणी प्रभुरपि क्रोधेन पूर्णः सदा, स्नानं शीतलवारिणा हि सततं धिग् धिग् गृहस्थाश्रमम् ॥ ३७३ ॥

अर्थ–रोदन करणारीं मुलें, ओलीनें भरलेलें घर, कर्दमयुक्त अंगण, मत्कुणादि दंश करणाऱ्या प्राण्यांनीं व्याप्त शय्या, रूक्ष भोजन, धुरानें पूर्ण घर, निष्ठुर भाषण करणारी स्त्री, यजमानही सर्वदा क्रोधानें पूर्ण, निरंतर शीतोदकानें स्नान, अशा प्रकारचा ज्याचा गृहस्थाश्रम असेल त्या गृहस्थाश्रमास सर्वथैव धिक्कार असो. ॥ ३७३ ॥

न्यायार्जितधनस्तत्वज्ञाननिष्ठोऽतिथिप्रियः ॥ शास्त्रवित् सत्यवादी च गृहस्थोऽपि विमुच्यते॥ ३७४॥

अर्थ—न्यायानें संपादन केलेल्या धनानें युक्त, तत्वज्ञाननिष्ठ, अतिथिप्रिय, शास्त्रवेत्ता व सत्यवादी असा गृहस्थाश्रमीही मुक्त होतो. ॥ ३७४ ॥

न विप्रपादोदकपंकिलानि न वेदशास्त्रध्वनिगर्जिता-
नि ॥ स्वाहास्वधाकारविवर्जितानि श्मशानतुल्या-
नि गृहाणि तानि ॥ ३७५ ॥

अर्थ—जीं घरें ब्राह्मणांच्या पादोदकसंबंधीं चिखलानें युक्त नाहींत, वेदशास्त्रांच्या ध्वनीनें गर्जनायुक्त नाहींत, आणि स्वाहाकार व स्वधाकार यांनीं रहित आहेत, अशीं घरें तीं स्मशानतुल्य जाणावीं. ॥ ३७५ ॥

आत्मनो मुखदोषेण बध्यंते शुकसारिकाः ॥ बका-
स्तत्र न बध्यंते मौनं सर्वार्थसाधनं ॥ ३७६ ॥

अर्थ—राघु व साळुंक्या ह्या आपल्या मुखदोषानें बद्ध होतात. आणि पक्षिवर्गांतील बकपक्षी भाषण करीत नसल्यामुळें बद्ध होत नाहींत. यावरून असें सिद्ध होतें कीं, मौन हें सर्व अर्थसिद्धीचें साधन आहे. ॥ ३७६ ॥

वने जने शत्रुजलाग्निमध्ये महार्णवे पर्वतमस्तके
वा ॥ सुप्तं प्रमत्तं विषमस्थितं वा रक्षंति पुण्या-
नि पुराकृतानि ॥ ३७७ ॥

अर्थ—वनांत, जनांत, शत्रु, जल व अग्नि यांच्या मध्य भागीं, महासमुद्रांत किंवा पर्वतशिखरावर अशा स्थलीं, अथवा निद्रित, असावध विषमस्थितीनें राहिलेला, अशा प्राण्यास पूर्वीं केलेलीं पुण्यें रक्षण करितात ॥ ३७७ ॥

अचोद्यमानानि यथा पुष्पाणि च फलानि च ॥ स्वं
कालं नातिवर्तंते तथा कर्म पुराकृतम् ॥ ३७८ ॥

अर्थ—पुष्पें व फळें हीं कोणी प्रेरणा केल्यावांचून जशीं आपल्या वेळा-

ल्या कालाचें उल्लंघन करीत नाहींत, तसें पूर्वी केलेलें कर्म जीवास आपल्या भोगकालीं प्राप्त होतें ॥ ३७८ ॥

विपत्तौ किं विषादेन संपत्तौ हर्षणेन किं ॥ भवितव्यं
भवत्येव कर्मणामीदृशी गतिः ॥ ३७९ ॥

अर्थ–विपत्ति प्राप्त झाली असतां त्यांत खेद कां व संपत्तींत हर्ष मानून तरी काय उपयोग ? कारण जें भवितव्य असतें तें निश्चयानें होतें अशीच कर्माची गति आहे ॥ ३७९ ॥

रोगशोकपरीतापबंधनव्यसनानि च ॥ आत्मापराध-
वृक्षाणां फलान्येतानि देहिनाम् ॥ ३८० ॥

अर्थ–रोग, शोक, अतिताप, बंधन व दुःख हीं देहधारी जीवांस आपल्या अपराधरूप वृक्षांचीं फलें भोगकालीं प्राप्त होतात ॥ ३८० ॥

यो नात्मजे न च गुरौ न च बंधुवर्गे दीने दयां न कुरुते
न च भृत्यवर्गे ॥ किं तस्य जिवितफलं हि मनुष्यलो-
के काकोऽपि जीवति चिराय वलिं च भुंक्ते ॥ ३८१ ॥

अर्थ–जो पुत्र, गुरु, बंधुवर्ग, दीन, सेवकवर्ग, यांवर दया करीत नाहीं, त्याचें जीवित व कावळ्याचें जीवित सारखेंच होय. कारण, काकपक्षी पुष्कळ वर्षें वांचतो व बलीचें अन्नही भक्षण करतो, तद्वत् तो मनुष्य जाणावा ॥ ३८१ ॥

बालस्यापि रवेः पादाः पतंत्युपरि भूभृतां ॥ तेजसा
सह जातानां वयः कुत्रोपयुज्यते ॥ ३८२ ॥

अर्थ–प्रातःकाळीं उदय पावतांच बालसूर्याचे किरण पर्वतावर पडतात. तस्मात् स्वाभाविक तेजासहवर्तमान जे उत्पन्न झाले, त्यांस वयाची अपेक्षा काय करावयाची आहे. ॥ ३८२ ॥

सिंहः शिशुरपि निपतति मदमलिनकपोलभित्तिषु गजेषु ॥ प्रकृतिरियं सत्ववतां न खलु वयस्तेजसो हेतुः ॥ ३८३ ॥

अर्थ–सिंह जरी लहान बाळक असला तरी तो मदस्रावानें मलिन झालेल्या भिंतीसारख्या गंडयुक्त गजांवर उड्डाण करतो. कारण जे बलवान असतात त्यांचा असा स्वभावच असतो. त्यांच्या तेजास वय कारण नाहींच ॥ ३८३ ॥

सखि पतिविरहहुताशः किमिति प्रशमं न याति नयनोदैः ॥ शृणु कारणं नितंबिनि मुंचसि नयनोदकं तु सस्नेहं ॥ ३८४ ॥

अर्थ–सखी पतिवियोग हाच कोणी एक अग्नि, नेत्रांतील उदकानें शांत कां होत नाहीं ? हे सुंदरी, याचें कारण श्रवण कर. कीं, तूं जें नेत्रांतून उदक सोडितेस तें स्नेह (तैल, घृत किंवा प्रीति) युक्त असतें यामुळें तो अग्नि शांत होत नाहीं ॥ ३८४ ॥

अहमेव गुरुः सुदारुणानामिति हालाहलमास्म तात दृप्यः ॥ ननु संति भवादृशानि भूयो भुवनेऽस्मिन् वचनानि दुर्जनानाम् ॥ ३८५ ॥

अर्थ.–मीच अतिभयंकरांमध्यें श्रेष्ठ आहें अशा गर्वानें हे बाप्पा हालाहलविषा, तूं उन्मत्त होऊं नको. कारण या लोकीं तुझ्या सारखीं दुर्जनाचीं भाषणें बहुतच आहेत. ॥ ३८५ ॥

पोतो दुस्तरवारिराशितरणे दीपोंधकारागमे, निर्वाते व्यजनं मदांधकरिणां दर्पोपशांतौ सृणिः ॥ इत्येत-

भुवि नास्ति यस्य विधिना नोपायचिंताकृता, मन्ये
दुर्जनचित्तवृत्तिहरणे धाताऽपि भग्नोद्यमः ॥३८६॥

अर्थ.—दुःखानेंही तरण्यास अशक्य अशा समुद्रांत तरण्याविषयीं साधन नौका, अंधकार प्राप्त झाला असतां त्याच्या निवारणार्थ दीप, वायुरहित स्थलीं वायु लाभार्थ पंखा; मदोन्मत्त हत्तीच्या मद निवारणाविषयीं अंकुश, असे प्रत्येक वस्तूचे निवारणार्थ कांहीं ना कांहीं उपाय योजना केली आहे. भूलोकीं ज्यावर ब्रह्मदेवानें उपाय योजला नाहीं अशी वस्तूच नाहीं; परंतु दुर्जनांच्या दुष्ट चित्तवृत्ति नाशाविषयीं ब्रह्मदेवाचाही उद्योग कुंठित झाला असें वाटतें. ॥ ३८६ ॥

यदि रामा यदि च रमा यदि तनयो विनयसद्गुणोपेतः।तनये तनयोत्पत्तिः सुरवरनगरे किमाधिक्यम् ३८७

अर्थ—जर स्त्री सुंदर असून जर लक्ष्मी, आणि नम्रता गुणयुक्त पुत्र व त्या पुत्राला पुत्र असें जर प्राप्त झालें तर याहून इंद्रनगरांत काय अधिक आहे ? ॥ ३८७ ॥

तावद्विद्या ऽनवद्या गुणगणमहिमा रूपसंपत्तिशौर्य, स्वस्थाने सर्वशोभा परगुणकथने वाक्पटुस्तावदेव ॥ यावत्पाकाकुलाभिः स्वगृहयुवतिभिः प्रेषितापत्यवक्त्राद्धेताता नास्ति तैलं न च लवणमपीत्यादिवाचां प्रचारः ॥ ३८८ ॥

अर्थ—निर्दोष विद्या, गुणसमुदायाचें माहात्म्य, रूप, संपत्ति, शौर्य, स्वस्थानीं सर्व शोभा, परगुणवर्णनाविषयीं वाक्चातुर्य, हे सर्व प्रकार तोंपर्यंतच चालतात. कोठपर्यंत म्हटलें तर स्वयंपाक करण्याविषयीं व्याकुळ झालेल्या स्वगृहांतील तरुण स्त्रियांनीं पाठविलेल्या मुलांच्या तोंडांतु-

म हे बाबा, तेल नाहीं व मीठही नाहीं इत्यादि वाणीचा निरोप जा काळ-पर्यंत चालत नाहीं. ॥ ३८८ ॥

शशिनीव हिमार्तानां घर्मार्तानां यथा रवौ ॥ मनो
न रमते स्त्रीणां जरापीतेंद्रिये धवे ॥ ३८९ ॥

अर्थ—शीतानें पीडित झालेल्यांची प्रीति चंद्रावर जशी नसते आणि उष्ण-कालानें पीडित झालेल्यांची प्रीति जशी सूर्यावर नसते, तशी जराग्रस्त इंद्रिय-युक्त पतीविषयीं स्त्रियांचे मनांत प्रीति बिलकुल नसते. ॥ ३८९ ॥

च्युता दंताः सिताः केशा दृङ्निरोधः पदे पदे ॥ पा-
तसज्जमिमं देहं तृष्णा साध्वी न मुंचति ॥३९०॥

अर्थ—दांत पडले, केश पांढरे झाले, पदोपदीं न दिसल्यामुळें ठेंचा लागून पडूं लागला आणि देह तर पतन पावण्याविषयीं सिद्ध झाला तरी याला पतिव्रतारूप तृष्णा सोडीत नाहीं. ॥ ३९० ॥

अतिसाहसमतिदुष्करमत्याश्चर्यं च दानमर्थानां ॥
योपि ददाति शरीरं न ददाति स वित्तले-
शमपि ॥ ३९१ ॥

अर्थ—द्रव्याचें दान करणें, अति साहस, अति दुष्कर व अत्याश्चर्यकारक आहे; कारण एखादा मनुष्य आपलें शरीरही देतो, परंतु लेशमात्रही धन देत नाहीं. ॥ ३९१ ॥

केचित् स्वभावलुब्धास्तीव्रतरां यातनामपि सहंते ॥
न तु संत्यजंति वित्तं मात्सर्यमिवाधमाः सततं ॥ ३९२

अर्थ—कोणी स्वभावसिद्ध लोभी अत्यंत प्रखर अशा पीडाही सहन कर-

सात. परंतु ते द्रव्याला सोडीत नाहींत. यास दृष्टांत दुर्जन जसे निरंतर मत्सराचा त्याग करीत नाहींत तद्वत्. ॥ ३९२ ॥

नात्यर्थमर्थार्थितया लुब्धमुद्वेजयेज्जनं ॥ अब्धिर्दत्वा
ऽश्वरत्नस्त्रीर्मथ्यमानोऽसृजद्विषं ॥ ३९३ ॥

अर्थ—लोभीजनास याचकपणानें अतित्राम देऊं नये. कारण समुद्रानें अश्व, रत्न व रंभादिक देवस्त्रिया इतक्या वस्तू दिल्या असून त्याचें मंथन चालविलें असतां त्यापासून विष निघालें. ॥ ३९३ ॥

भूयिष्ठं द्रविणात्मजं जनयितुं लिप्सावता चेतसा, ना-
र्यः पंच मया क्रमेण कुलजाः काले समुद्वाहिताः ॥
साद्विद्या कविता विदेशवसतिः सेवा तथाऽभ्यर्थना,
दैवेन प्रतिबंधकेन युगपद्वंध्याः समस्ताः कृताः ३९४

अर्थ—बहुद्रव्यरूप पुत्र उत्पन्न करण्यासाठीं मीं मनःपूर्वक क्रमेंकरून उक्तकालीं कुलीन पांच स्त्रियांशीं विवाह केला. त्या पांच स्त्रिया अशा कीं, उत्तम विद्या, कविता, देशांतर प्रवास, सेवा, तशीच प्रार्थना, परंतु सर्वस्त्रिया प्रतिबंधक दैवानें एकदाच वंध्या केल्या. ॥ ३९४ ॥

सच्छिद्रो मध्यकुटिलः कर्णः स्वर्णस्य भाजनं ॥
धिग्दैवनिहतं नेत्रं पात्रं कज्जलभस्मनः ॥ ३९५ ॥

अर्थ—कान, प्रशस्त छिद्र व मध्यभाग वक्र यांनीं युक्त आहे तरी तो सुवर्णालंकार धारणास पात्र झाला आहे, आणि नेत्र, सौंदर्य युक्त असून ही दुर्दैवी असल्यामुळें त्याला काजळ रूप भस्म धारण करण्याची पाळी आली आहे तस्मात् दैव प्रतिकूल वस्तूला धिक्कार असो. ॥ ३९५ ॥

क्वचित् पाणिप्राप्तं घटितमपि कार्यं विघटयत्यशक्यं केनापि क्वचिदघटमानं घटयति ॥ तदेवं सर्वेषा-मुपरि परितो जाग्रतिविधावुपालंभः कोऽयं जनतनु-धनोपार्जनविधौ ॥ ३१६ ॥

अर्थ–क्वचित्स्थलीं हस्तांत प्राप्त झाल्या सारखें घडून आलेलेंही कार्य बिघडून टाकितें आणि कोणाच्यानेंही होण्यास अशक्य असें अघटित कार्य क्वचित् घडवितें. तस्मात् असें दैव सर्वांवर सर्वत्र जागरूक असून मग जनहो, शरीर व धन यांच्या संपादन प्रकाराविषयीं हा राग काय ? ॥ ३१६ ॥

यद्धात्रा निजभालपट्टलिखितं स्तोकं महद्वा धनं, तत्प्राप्नोति मरुस्थलेऽपि नितरां मेरौ ततो नाधिकं ॥
तद्धीरो भव चित्त वत्स कृपणां वृत्तिं वृथा मा कृथाः
कूपे पश्य पयोनिधावपि घटो गृह्णाति तुल्यं जलं ॥३१७॥

अर्थ–ब्रम्हदेवानें जें आपल्या भालपटलावर लिहिलेलें अल्प किंवा महत् धन असेल तें मारवाड देशांतही निश्चयेंकरून प्राप्त होतें, आणि मेरूवर गेलें तरी त्यापेक्षां अधिक मिळत नाहीं. यास्तव हे वत्सा चित्ता, तूं धैर्य धारण कर व ही दीनवृत्ति व्यर्थ करूं नको. कारण पहा कीं, घट, कूप व समुद्र या दोन्हींतूनही आपल्या अवकाशा सारखें उदक ग्रहण करतो. अधिक घेईन म्हटलें तर घेतां येत नाहीं ॥ ३१७ ॥

किं करोति नरः प्राज्ञः शूरो वाप्यथ पंडितः ॥ दैवं यस्य छलान्वेषि करोति विफलाः क्रियाः ॥३१८॥

अर्थ–दैव ज्याचा छल करण्याविषयीं सिद्ध झालें आहे तो पुरुष बुद्धि-

मान्, शूर अथवा पंडित असला तरी तो काय करतो ? कारण तें दैव त्याच्या सकल क्रिया व्यर्थ करतें ॥ ३९८ ॥

कामं प्रियानपि प्राणान् विमुंचंति मनस्विनः ॥ इ-
च्छंति नत्वमित्रेभ्यो महतीमपि सत्क्रियां ॥ ३९९ ॥

अर्थ—धैर्ययुक्त मनाचे पुरुष, प्रिय प्राणांचाही मनःपूर्वक त्याग करतात परंतु शत्रूंपासून मोठ्या सत्काराची इच्छा करीत नाहींत. ॥ ३९९ ॥

दायादाः स्पृहयंति तस्करगणा मुष्णंति भूमीभुजो,
दूरेण छलमाकलय्य हुतभुक् भस्मीकरोति क्षणात् ॥
अंभः प्लावयते क्षितौ विनिहितं यक्षा हरंति ध्रुवं,
दुर्वृत्तास्तनया नयंति निधनं धिग् धिग् धनं त-
द्बहु ॥ ४०० ॥

अर्थ—वाटेकरी बंधुवर्ग धनाची स्पृहा करितात, चोरांचे समूह चोरतात, राजे दुरून कपट उत्पन्न करून हरण करतात, अग्नि क्षणांत भस्म करतो, उदक बुडवितें, भूमींत ठेवलेलें यक्ष निश्चयेंकरून हरण करतात. व दुराचारी पुत्र सर्व धन लयास नेतात. तस्मात् बहुत धनास सर्वथैव धिक्कार असो. ॥ ४०० ॥

वाणी दरिद्रस्य शुभा हिता ऽपि ह्यर्थेन शब्देन च
संप्रयुक्ता ॥ न शोभते वित्तवतः समीपे भेरीनिना-
दोपहतेव वीणा ॥ ४०१ ॥

अर्थ—दरिद्री पुरुषाची वाणी शुभ व हितावहही असून अर्थ व उत्तम शब्दांनीं जरी रचलेली असली तरी ती द्रव्यवानासमीप शोभत नाहीं. यांस दृष्टांत. वीणा मंजुळ स्वरांनीं युक्त असला तरी त्याचा ध्वनि नौबदीच्या नादापुढें अगदीं निरुपयोगी होतो तद्वत्. ॥ ४०१ ॥

हेतुप्रमाणयुक्तं वाक्यं न श्रूयते दरिद्रस्य ॥ अप्य-
तिपरुषमसत्यं पूज्यं वाक्यं समृद्धस्य ॥ ४०२ ॥

अर्थ—दरिद्री पुरुषाचें भाषण हेतु व प्रमाण यांनीं युक्त असलें तरी तें कोणी ऐकत नाहीं, आणि धनिकाचें वाक्य अति कठोर व असत्य असें असलें तरी तें सर्व मान्य होतें. ॥४०२॥

न वित्तं दर्शयेत्प्राज्ञः कस्यचित् स्वल्पमप्यहो ॥ मु-
नेरपि वनस्थस्य मनश्चलति दर्शनात् ॥ ४०३ ॥

अर्थ—चतुरानें अल्पही द्रव्य कोणाला दाखवूं नये. कारण, वनस्थ मुनीचेंही मन धन-दर्शनानें चंचल होतें. मग इतराचें होईल यांत संशय नकोच. ॥ ४०३ ॥

लक्ष्म्या परिपूर्णोऽहं न भयं मेऽस्तीति मोहनिद्रै-
षा ॥ परिपूर्णस्यैवेंदोर्भवति भयं सिंहिकासूनोः ॥४०४॥

अर्थ—मी संपत्तीनें परिपूर्ण असल्यामुळें मला भय नाहीं अशी जी बुद्धि-ही मोहनिद्राच जाणावी. कारण पूर्णचंद्रासच जसें राहूपासून भय होतें, तद्वत् धनवानासही समजावें. ॥ ४०४ ॥

दैववशादुत्पन्ने सति विभवे यस्य नास्ति भोगेच्छा ॥
न च परलोकसमीहा स भवति धनपालको मू-
र्खः ॥ ४०५ ॥

अर्थ—दैवयोगानें वैभव प्राप्त झालें असून ज्यास उपभोगाची इच्छा नाहीं व परलोक साधनाविषयींही इच्छा नाहीं तो केवळ धन-रक्षण करणारा मूर्ख समजावा. ॥ ४०५ ॥

आपद्गतं हससि किं द्रविणांधमूढ लक्ष्मीः स्थिरा न

भवतीति किमत्र चित्रं ॥ एतान् प्रपश्यासि घटान्
जलयंत्रचक्रे रिक्ता भवंति भरिता भरिताश्च रि-
क्ताः ॥ ४०६ ॥

अर्थ—हे धनमदांधमूर्खा, विपत्तींत प्राप्त झालेल्यास हंसतोस काय? कारण लक्ष्मी कोठेंच स्थिर असत नाहीं यांत आश्चर्य काय आहे? याविषयीं निदर्शन असें कीं, रहाट-गाडग्याच्या घटमालिकेंतील ह्या घटांकडे पहात जा ह्मणजे तुला कळून येईल. यांतील रिकामे घट आहेत ते भरतात आणि जे भरतात ते पुनः रिकामे होतात ॥ ४०६ ॥

यद्ददासि विशिष्टेभ्यो यच्चाश्नासि दिने दिने ॥ तत्ते वि-
त्तमहं मन्ये शेषं कस्यापि रक्षसि ॥ ४०७ ॥

अर्थ—प्रतिदिवशीं श्रेष्ठांस जें देतोस व जें भोगितोस तें धन तुझें आहे असें मी मानतों, आणि जें अवशिष्ट रहातें तें कोणाचें तरी तूं रक्षण करितोस. ॥ ४०७ ॥

सीदंति चाग्निहोत्राणि गुरुपूजा प्रणश्यति ॥ कुमा-
र्यश्च प्रसूयंते प्राप्ते कलियुगे सदा ॥ ४०८ ॥

अर्थ—कलियुग लागलें असतां सर्वकाल अग्निहोत्रें विच्छिन्न होतात; मातापितरादि गुरूंची पूजा नाश पावते आणि कुमारी प्रसूत होतात. ॥ ४०८ ॥

परान्नेन मुखं दग्धं हस्तौ दग्धौ प्रतिग्रहात् ॥ पर-
स्त्रीभिर्मनो दग्धं * कुतः शापः कलौ युगे ॥ ४०९ ॥

---

* ह्या चतुर्थ चरणस्थलीं "मंत्रसिद्धिः कथं भवेत्—असाही पाठ आहे त्याचा अर्थ असा कीं, मंत्रसिद्धि कशी होईल, "

अर्थ—मुख परान्नानें दग्ध झालें; हात प्रतिग्रहानें दग्ध झालें व मन परस्त्रीचिंतनानें दग्ध झालें, यास्तव कलियुगांत शाप कोठून सफल होईल. ४०९

न देवे देवत्वं कपटपटवस्तापसजना, जनो मिथ्या-
वादी विरलतनुवृष्टिर्जलधरः ॥ प्रसंगो नीचानामव-
निपतयो दुष्टमनसो, जना भ्रष्टा नष्टा अहह कलि-
कालः प्रभवति ॥ ४०१ ॥

अर्थ—देवांत देवत्व नाहीं; तपस्वी जन कपटाविषयीं कुशल, लोक असत्य भाषण करणारे, मेघ क्वचित् व तीही अल्पच अशी वृष्टि करणारे, नीचांशीं प्रसंग, राजे दुष्ट मनाचे, याप्रकारें लोक सन्मार्गापासून भ्रष्ट असत्यामुळें नीचत्व पावले, असा हा कलिकाल अद्भुत उत्कर्षानें वर्तत आहे. ॥४१०॥

निर्वीर्या पृथिवी निरोषधिरसा नीचा महत्वं गता,
भूपाला निजकर्मधर्मरहिता विप्राः कुमार्गे रताः ॥
भार्या भर्तृविरोधिनी पररता पुत्राः पितुर्द्वेषिणो, हा
कष्टं खलु वर्तते कलियुगे धन्या नराः सज्जनाः ॥४११॥

अर्थ—पृथ्वी वीर्यहीन, ओषधी व रस यांनीं रहित; नीच महत्वास गेलेले; राजे स्वकर्मधर्मांनीं रहित; ब्राह्मण कुमार्गाच्याठायीं तत्पर; स्त्री पतीशीं विरोध करणारी असून परपुरुषाशीं रत व पुत्र पित्याचा द्वेष करणारे असें कलियुगांत निश्चयेंकरून खेदकारक दुःख आहे. तथापि त्यांत जे मानव सज्जन असतील ते धन्य जाणावे. ॥४११॥

सीदंति संतो विलसंत्यसंतः पुत्रा म्रियंते जनकश्चि-
रायुः ॥ परेषु मैत्री स्वजनेषु वैरं पश्यंतु लोकाः क-
लिकौतुकानि ॥ ४१२ ॥

अर्थ—साधु दुःख पावतात; असत्पुरुष सुखांत असतात; पुत्र मृत्यु पावतात; पिता चिरायु होतो; परकीयांशीं मैत्री असते व स्वजनाविषयीं वैर असतें, हीं कलियुगांतील आश्चर्यें लोक अवलोकन करोत. ॥ ४१२ ॥

तृष्णा हि चेत्परित्यक्ता को दरिद्रः क ईश्वरः ॥ त-
स्याश्चेत् प्रसरो दत्तो दास्यं च शिरसि स्थितं ॥४१३॥

अर्थ—जर तृष्णेचा त्याग केला तर दरिद्री कोण व समर्थ कोण ? आणि तिला जर अंतःकरणांत स्थल दिलें तर सेवकत्व मस्तकावर बसलेंच असें समजावें. ॥ ४१३ ॥

यौवनं जरया ग्रस्तमारोग्यं व्याधिभिर्हतं ॥ जीवितं
मृत्युरभ्येति तृष्णैका निरुपद्रवा ॥ ४१४ ॥

अर्थ—जरेनें तारुण्य ग्रासलें आहे, रोगांनीं आरोग्य नाशास पावविलें आहे, मृत्यु जीवितावर येतो आणि एक तृष्णा मात्र निरुपद्रव आहे. ४१४

गजभुजंगमयोरपि बंधनं शशिदिवाकरयोर्ग्रहपीड-
नं ॥ मतिमतां च विलोक्य दरिद्रतां विधिरहो ब-
लवानिति मे मतिः ॥ ४१५ ॥

अर्थ—हत्ती व सर्प यांस बंधन, चंद्रसूर्यांस राहु व केतु या ग्रहांची पीडा आणि बुद्धिमंतांस दारिद्र्य हीं पाहून आश्चर्यकारक दैव बलिष्ट आहे अशी माझी बुद्धि झाली. ॥ ४१५ ॥

द्वीपादन्यस्मादपि मध्यादपि जलनिधेर्दिशोप्यंता-
त् ॥ आनीय झटिति घटयति विधिरभिमतमभि-
मुखीभूतः ॥ ४१६ ॥

अर्थ—सन्मुख झालेलें दैव अन्य द्वीपापासूनही, समुद्राच्या मध्यभागांतून-

ही व दिशांच्या अंत प्रदेशांतून त्वरेनें आणून इच्छित कार्य घडवितें. ॥ ४१६ ॥

अंभोधिः स्थलतां स्थलं जलधितां धूलीलवः शैलतां, मेरुर्मृत्कणतां तृणं कुलिशतां वज्रं तृणप्रायतां ॥ वन्हिः शीतलतां हिमं दहनतामायाति यस्येच्छया, लीलादुर्ललिताद्भुतव्यसनिने दैवाय तस्मै नमः ॥ ४१७ ॥

अर्थ—समुद्र स्थलासारखा, स्थल समुद्राप्रमाणें, धूलीचा कण पर्वतवत्, मेरु मृत्तिकेच्या कणासमान, तृण वज्रतुल्य, वज्र तृणप्राय, अग्नि शीतल, हिम अग्नीसारखें, असे हे प्रकार ज्याच्या इच्छेनें होतात आणि लीलेनें अघटित घटनारूप अद्भुत कृत्य करण्याच्या व्यसनानें युक्त अशा त्या दैवास नमस्कार असो. ॥ ४१७ ॥

अरक्षितं तिष्ठति दैवरक्षितं सुरक्षितं दैवहतं विनश्यति ॥ जीवत्यनाथोऽपि वनेपि रक्षितः कृतप्रयत्नोपि गृहे विनश्यति ॥ ४१८ ॥

अर्थ—दैवानें रक्षण केलेलें कोणी न रक्षिलें तरी रहातें आणि दैवानें जें अरक्षित तें इतरांनीं सुरक्षित असलें तरी नाश पावतें. तसाच कोणी अनाथ असूनही वनांत जरी असला तरी तो दैवानें रक्षित असला तर वांचतो व घरांत प्रयत्न केलेला दैवहत असला तर नाश पावतो. ॥ ४१८ ॥

दाता बलिः प्रार्थयिता च विष्णुर्दानं भुवो वाजिमखस्य कालः ॥ नमोऽस्तु तस्यै भवितव्यतायै यस्याः फलं बंधनमेव जातं ॥ ४१९ ॥

अर्थ—दाता बलि, याचक विष्णु, पृथ्वीचें दान, अश्वमेधाचा काल असें असून ज्या भवितव्यतेचें फल बलीला बंधन झालें. तस्मात् भवितव्यतेला नमस्कार असो. ॥ ४१९ ॥

यन्मनोरथशतैरगोचरं न स्पृशंति कवयोऽपि गिरा
यत् ॥ स्वप्नवृत्तिरपि यत्र दुर्लभा लीलयैव विदधा-
ति तद्विधिः ॥ ४२० ॥

अर्थ—जें अनेक मनोरथ केले असतांही अगोचर, कविजनांच्या वाणीनें ज्यास स्पर्श करवत नाहीं व स्वप्नावस्थेचाही संचार ज्याविषयीं दुर्लभ असें कृत्य दैव सहज घडवितें. ॥ ४२० ॥

नाधीते ऽत्र जनो यदि कश्चिदधीते शते सहस्रे वा॥
दुस्तर्केषु श्राम्यति दूरीकुरुते श्रुतिस्मृतिसुतर्का-
न् ॥ ४२१ ॥

अर्थ—कलियुगांत जन अध्ययन करीत नाहींत आणि जर शंभरांत किंवा सहस्रांत कोणी अध्ययन केलें, तर तो कुतर्कांत श्रम करितो व श्रुतिस्मृत्युक्त उत्तम तर्कांचा त्याग करतो. ॥ ४२१ ॥

दूये कांताकरं वीक्ष्य मणिकंकणवर्जितं ॥ अतः परं
परं दूये माणिकं कणवर्जितं ॥ ४२२ ॥

अर्थ—रत्नखचित कंकणवर्जित स्त्रीचा हस्त पाहून मी दुःखित होतों. आणि धान्यरहित रांजण पाहून त्यापेक्षांही अत्यंत दुःख पावतों. ॥ ४२२ ॥

जननी जन्मभूमिश्च जान्हवी च जनार्दनः ॥ जन-
कः पंचमश्चैव जकाराः पंच दुर्लभाः ॥ ४२३ ॥

अर्थ—जननी, (माता) जन्मभूमि, जान्हवी, (काशीची गंगा,) जनार्दन व पांचवा जनक (पिता) हे पांच जकार दुर्लभ आहेत. ॥ ४२३ ॥

तावत् सर्वगुणालयः पटुमतिः साधुः सतां वल्लभः ।
शूरः सच्चरितः कलंकरहितो मानी कृतज्ञः कविः ॥
दक्षो धर्मरतः सुशीलगुणवांस्तावत्प्रतिष्ठान्वितो ।
यावान्निष्ठुरवज्रपातसदृशं देहीति नो भाषते ॥ ४२४ ॥

अर्थ—मनुष्य जोंपर्यंत कठोर वज्रपातासमान देहि (मला दे) असें भाषण करीत नाहीं तोंपर्यंतच तो सर्वगुणांचें स्थान, उत्तम बुद्धिमान्, साधु, साधूंमध्यें प्रिय, शूर, सदाचारसंपन्न, कलंक-रहित, मानी, केलेलें कर्म जाणणारा, ज्ञानी, कार्याविषयीं दक्ष, धर्मतत्पर, सुशील, गुणवान् व सकल प्रतिष्ठायुक्त असा असतो. ॥ ४२४ ॥

काक आव्हयते काकान् याचको नतु याचकान् ॥
काकयाचकयोर्मध्ये वरं काको न याचकः ॥ ४२५ ॥

अर्थ—काक स्वजातीय पक्ष्यांस बोलावितो, परंतु याचक याचकांस हाक मारीत नाहीं. तस्मात् काक व याचक यांमध्यें काक श्रेष्ठ, याचक श्रेष्ठ नाहीं ४२५

सेवेव मानमखिलं ज्योत्स्नेव तमो जरेव लावण्यं ॥
हरिहरकथेव दुरितं गुणशतमप्यर्थिता हरति ॥ ४२६ ॥

अर्थ—सेवा जशी सर्व प्रतिष्ठा, चंद्रकांति जशी अंधकार, जरा जशी लावण्य व हरिहरकथा जशी पाप नाश करिते, तशी याचकता शेंकडो गुणांचा नाश करिते. ॥ ४२६ ॥

साधुरेवार्थिभिर्याच्यः क्षीणवित्तोऽपि सर्वदा ॥ शुष्कापि
हि नदी मार्गे खन्यते सलिलार्थिभिः ॥ ४२७ ॥

अर्थ—मार्गांतील नदी शुष्क जरी झाली असली तरी उदकेच्छु लोक तिच्या प्रवाहांत झरे खणतात; यावरून असें सिद्ध होतें कीं, साधु क्षी-

णद्रव्य जरी झाले तरी त्यांजवळच याचकांनीं सर्वदा याचना करावी. ॥ ४२७ ॥ .

देहीति वचनादेव हृदिस्थाः पंच देवताः ॥ मुखा-
न्निर्गत्य गच्छंति श्रीर्ह्रीधीधृतिकीर्तयः ॥ ४२८ ॥

अर्थ—देहि (दे) असें भाषण बोलतांच श्री (लक्ष्मी), ऱ्ही (लज्जा), धी (बुद्धि), धृति (धैर्य) व कीर्ति ह्या हृदयस्थ पंच देवता मुखांतून निघून बाहेर जातात. ॥ ४२८ ॥

वदनाच्च वहिर्याति प्राणायाऽचाक्षरैःसह ॥ ददामी-
त्यक्षरैर्दातुः पुनः कर्णाद्विशंति हि ॥ ४२९ ॥

अर्थ—याचनेसंबंधीं अक्षरांसह प्राण मुखांतून बाहेर येतात. नंतर देतों अशा दात्याच्या अक्षरांसह पुनः कर्णद्वारा प्रवेश करतात. ॥ ४२९ ॥

यत्करोत्यरतिं क्लेशं तृष्णां मोहं प्रजागरं ॥ न त-
द्धनं कदर्याणां हृदये व्याधिरेव सः ॥ ४३० ॥

अर्थ—मनाला अस्वास्थ्य, क्लेश, तृष्णा, मोह व अतिजागर असें क्लेश देणारें जें कृपणांचें तें धन नव्हे तर तो त्यांच्या हृदयांत रोगच झाला असें जाणावें. ॥ ४३० ॥

यो न ददाति न भुंक्ते सति विभवे नैव तस्य तत्
द्रव्यं ॥ तृणमयकृत्रिमपुरुषो रक्षति सस्यं पर-
स्यार्थे ॥ ४३१ ॥

अर्थ—संपत्ति असून जो पुरुष तिचें दान करीत नाहीं व तिचा उपभोग घेत नाहीं, तर तें द्रव्य त्याचें नाहीं असें समजलें पाहिजे. यास दृष्टांत. शेतांत केलेला गवताचा पुरुष जसें दुसऱ्यासाठीं धान्य रक्षितो, तसा तो दुसऱ्याकरितां रक्षक होऊन बसतो. ॥ ४३१ ॥

एते क्षुद्रतमा इति मामा क्षुद्रेषु यात विश्वासं ॥ सि-
द्धार्थानामेषां स्नेहोप्यश्रूणि पातयति ॥ ४३२ ॥

अर्थ—हे अत्यंत मायाळू आहेत अशा बुद्धीनें तुह्मी दुर्जनांविषयीं विश्वास नकाच बाळगूं. कारण, त्या सिद्धार्थांचा (मोहऱ्या व कृतकार्य दुर्जन यांचा) स्नेह (तेल व मित्रत्व) ही अश्रु पाडतो. ॥ ४३२ ॥

गुणिनां गुणेषु सत्स्वपि पिशुनजनो दोषमात्रमाद-
त्ते ॥ पुष्पे फले विरागी क्रमेलकः कंटकौघमि-
व ॥ ४३३ ॥

अर्थ—गुणिजनांचे गुण असूनही जो दुर्जन तो त्यांचे गुण टाकून दोषच घेतो. यास दृष्टांत. उंट पुष्पें व फळें यांविषयीं प्रीतिरहित होऊन कांट्यांच्या समुदायास जसा भक्षितो तद्वत्. ॥ ४३३ ॥

सुजनानामपि हृदयं पिशुनपरिष्वंगलिप्तमिह भ-
वति ॥ पवनः परागवाही रथ्यासु वहन् रजस्वलो
भवति ॥ ४३४ ॥

अर्थ—सुजनांचें अंतःकरणही जगांत दुर्जनसंगतीनें दोषयुक्त होतें यास दृष्टांतः—वायु पुष्पसंबंधि सूक्ष्म रजास वाहणारा असून तो गल्यांत वाहूं लागला असतां धुळीनें युक्त होतो. ॥ ४३४ ॥

विद्यया विमलयाप्यलंकृती दुर्जनः सदसि मास्तु
कश्चन ॥ साक्षरा हि विपरीततां गताः केवलं ज-
गति तेऽपि राक्षसाः ॥४३५॥

अर्थ—दुर्जन निर्मळ विद्या युक्त जरी असला तरी तो सभेंत नसावा. कारण दुर्जन साक्षर असून ते विपरीत भावनेनें युक्त असतात; यास्तव तेही जगांत केवळ राक्षस आहेत असें समजावें. ॥ ४३५ ॥

कवयः परितुष्यंति नेतरे कविसूक्तिभिः ॥ नह्यकू-
पारवत् कूपा वर्धंते विधुकांतिभिः ॥ ४३६ ॥

अर्थ—ज्ञानी पुरुष कवींच्या उत्तम उक्तींनीं संतुष्ट होतात. परंतु इतर संतोष पावत नाहींत. यास दृष्टांत, कूप (आड) हीं पाथोधि व समुद्रही पाथोधि परंतु चंद्रकांतीनें समुद्रासारिखे आड वृद्धिंगत होत नाहींत. ॥४३६॥

किं कवेस्तस्य काव्येन किं कांडेन धनुष्मतः ॥
परस्य हृदये लग्नं न घूर्णयति यच्छिरः ॥ ४३७ ॥

अर्थ—जें दुसऱ्याच्या हृदयीं सलग्न झालें असतां त्याचें मस्तक हालवीत नाहीं अशा त्या कवीच्या काव्यानें काय उपयोग व धनुर्धाऱ्याच्या त्या बाणानें तरी काय उपयोग आहे? कांहीं नाहीं. ॥ ४३७ ॥

क्लेशत्यागकृतेऽर्पितेन करणव्यूहेन देहेन च । स्वा-
नर्थं बत जंतुरर्जयति चेन्मंतुर्नियंतुः कुतः ॥ शस्त्रे
शत्रुजयाय नैजगुरुणा दत्तेऽथ तेनैव चेत्, पुरो हंति
निजं वपुः कथय रे तत्रापराधी तु कः ॥ ४३८ ॥

अर्थ—प्राणी आपल्या क्लेशनाशार्थ ईश्वरानें दिलेल्या इंद्रिय-समुदाय-रूप देहेंकरून आपलें अनिष्ट जर संपादन करील तर तें कृत्य खेदास्पद असून त्यांत नियंत्या परमेश्वराकडे अपराध कोठून येणार? यास दृष्टांत स्वपित्यानें पुत्रास शत्रुपराजयार्थ शस्त्र दिलें असून त्यानेंच तो पुत्र आपल्या देहाचा नाश जर करील तर तेथें अपराधी कोण हें सांग. ॥४३८॥

ददति तावदमी विषयाः सुखं स्पृशति तावदियं
हृदि मूढता॥ मनसि तत्त्वविदां च विवेचके क्व वि-
षयाः क्व सुखं क्व परिग्रहः॥ ४३९ ॥

अर्थ–हे विषय तावत्कालपर्यंतच सुख देतात; ही मूढता तोंपर्यंतच अ-तःकरणांत असते कीं, जावत्कालपर्यंत तत्त्ववेत्त्यांचें विवेचन मनांत आलें नाहीं. आलें असतां मग विषय कोठें, सुख कोठें व परिग्रह कोठें ! ॥४३९॥

तृष्णां छिंदि भज क्षमां जहि मदं पापे रतिं माकृ-
थाः॥ सत्यं ब्रूह्यनुपाहि साधुपदवीं सेवस्व विद्वज्ज-
नान् ॥ मान्यान् मानय विद्विषोऽप्यनुनय ह्याच्छा-
दय स्वान् गुणान्, कीर्तिं पालय दुःखिते कुरु दया-
मेतत्सतां लक्षणम् ॥ ४४० ॥

अर्थ–तृष्णेचा त्याग कर, क्षमा धर, गर्वाला जिंक, पापकर्मांविषयीं प्रीति करूं नको, सत्य भाषण कर, साधुमार्गाला रक्षण कर, विद्वजनांची सेवा कर, मान्यांचा सन्मान कर, अतिदुष्टचांस शिक्षा कर, स्वगुणांचें आ-च्छादन कर, कीर्तीचें पालन कर, दुःखितांविषयीं दया कर. कारण हें साधूंचें लक्षण आहे. ॥ ४४० ॥

मित्रद्रोही कृतघ्नश्च तथा विश्वासघातकः ॥
त्रयस्ते नरकं यान्ति यावच्चंद्रदिवाकरौ ॥ ४४१ ॥

अर्थ–मित्रद्रोह करणारा, कृतोपकार न मानणारा, तसाच विश्वासघातकी हे त्रिवर्ग यावत्काल चंद्र व सूर्य आहेत तोंपर्यंत नरकांत वास करितात. ॥ ४४१ ॥

अर्थमनर्थं भावय नित्यं नास्ति ततः सुखलेशः स-
त्यं ॥ पुत्रादपि धनभाजां भीतिः सर्वत्रैषा विहिता
रीतिः ॥ ४४२ ॥

अर्थ–द्रव्य निरंतर दुःखकारक आहे असें मान. कारण, त्यापासून सुख लेश नाहीं हें सत्य आहे. याचा अनुभव असा कीं, धनसंपन्नांस पुत्रापा-सूनही भीति असते हीच रीति सर्वत्र आहे. ॥ ४४२ ॥

का तव कांता कस्ते पुत्रः संसारोऽयमतीव विचित्रः॥
कस्य त्वं वा कुत आयातस्तत्त्वं चिंतय तदिदं भ्रा-
तः॥ ४४३ ॥

अर्थ—कोण तुझी स्त्री, कोण तुझा पुत्र, हा संसार अत्यंत विचित्र आहे. तूं कोणाचा किंवा कोठून आलास हें हे बंधो. तूं यथार्थ स्वरूप चिंतन कर. ॥ ४४३ ॥

मा कुरु धनजनयौवनगर्वं हरति निमेषात् कालः
सर्वं ॥ मायामयमिदमखिलं हित्वा ब्रह्मपदं प्रवि-
शाशु विदित्वा ॥ ४४४ ॥

अर्थ—धन, जन, तारुण्य यांचा गर्व करूं नको. कारण, काल एका निमेषांत हें सर्व हरण करतो. तस्मात् हें सर्व मायामय मिथ्या आहे असें जाणून आनंदस्वरूप ब्रह्मपदीं लीन हो. ॥ ४४४ ॥

नलिनीदलगतजलवत्तरलं तद्वज्जीवनमतिशय-
चपलं ॥ क्षणमपि सज्जनसंगतिरेका भवति भवा-
र्णवतरणे नौका ॥ ४४५ ॥

अर्थ—कमलिनीच्या पानांतील उदक जसें चंचल असतें तसें आयुष्य अतिशय चपल आहे. यास्तव संसारसमुद्रांत तरण्याविषयीं क्षणमात्रही केलेली सत्संगति एक नौका आहे तिचें अवलंबन करून भवसमुद्राच्या पार जा. ॥ ४४५ ॥

सद्भिस्तु लीलया प्रोक्तं शिलालिखितमक्षरं ॥ अस-
द्भिः शपथेनापि जले लिखितमक्षरं ॥ ४४६ ॥

अर्थ—साधूंनी सहज भाषण केलें तर तें शिलेवर लिहिलेल्या अक्षराप्र-

मार्गे समजावें आणि दुर्जनांनीं शपथपूर्वक भाषण केलें तरी तें जलावर लिहिलेल्या अक्षरांसारखें जाणावें. ॥ ४४६ ॥

हरेः पदाहतिः श्लाघ्या न श्लाघ्यं खररोहणं ॥ स्पर्धापि विदुषा युक्ता न युक्ता मूर्खमित्रता ॥ ४४७ ॥

अर्थ—अश्वाच्या पायानें ताडन झालें तरी तें श्रेष्ठ आहे, परंतु गर्दभावर आरोहण करणें योग्य नाहीं. तशी विद्वानाशीं स्पर्धा घडली तरी ती योग्य, परंतु मूर्खाशीं मैत्री युक्त नाहीं. ॥ ४४७ ॥

यत्र विद्वज्जनो नास्ति श्लाघ्यस्तत्राल्पधीरपि ॥ निरस्तपादपे देशे एरंडोऽपि द्रुमायते ॥ ४४८ ॥

अर्थ—जेथें विद्वज्जन नाहीं तेथें अल्पबुद्धिमानही स्तुतिसपात्र होतो. यास दृष्टांत, वृक्षरहित प्रदेशांत एरंडही वृक्षत्वानें मान्य होतो तसा. ॥ ४४८ ॥

साधोः प्रकोपितस्यापि मनो नायाति विक्रियां ॥ न हि तापयितुं शक्यं सागरांभस्तृणोल्कया ॥ ४४९ ॥

अर्थ—अत्यंत क्रुद्ध झालेल्या अशाही साधूचें मन विकार पावत नाहीं. यास दृष्टांत, समुद्रोदक गवताच्या कोलतीनें जसें तापविण्यास शक्य नाहीं तसें. ॥ ४४९ ॥

गोत्रस्थितिं न मुंचंति सदा सन्नतिमाश्रिताः ॥ उदन्वंतश्च संतश्च महासत्वतया तथा ॥ ४५० ॥

अर्थ—जसे समुद्र आपल्यांत मोठे प्राणी आहेत तरी आपल्यांतील पर्वतांच्या स्थितीला सोडीत नाहीं, आणि सर्वदा साधूंच्या नमनास आश्रयभूत असतात, तसे साधु आपल्या धैर्यामुळें स्वकुलमर्यादेचा त्याग करीत नाहींत, व सर्वकाल उत्तम नम्रतेचा आश्रय करून असतात. ॥ ४५० ॥

दारिद्र्यान्मरणाद्वा मरणं संरोचते न दारिद्र्यं ॥ अल्पक्लेशं मरणं दारिद्र्यमनंतकं दुःखं ॥ ४५१ ॥

अर्थ—दरिद्र किंवा मरण यांतून मला मरण उत्तम वाटतें. दरिद्र बिलकुल आवडत नाहीं. कारण मरणांत क्लेश थोडे आहेत आणि दारिद्र्यांत अपार दुःख आहे. ॥ ४५१ ॥

परोक्षे कार्यहंतारं प्रत्यक्षे प्रियवादिनं ॥ वर्जयेत्तादृशं मित्रं विषकुंभं पयोमुखं ॥ ४५२ ॥

अर्थ—मागें कार्यनाश करणारा आणि तोंडावर प्रिय भाषण करणारा असा जर मित्र असला तर त्याची मैत्री तत्काल मोडावी. यास दृष्टांत, आंत विषानें भरलेला कुंभ असून तोंडाशीं दुधानें भरला तरी तो जसा घातक होतो तद्वत्. ॥ ४५२ ॥

शुचित्वं त्यागिता शौर्यं सामान्यं सुखदुःखयोः ॥ दाक्षिण्यं चानुरक्तिश्च सत्यता च सुहृद्गुणाः ॥ ४५३ ॥

अर्थ—चित्तशुद्धि, दानशीलपणा, शूरत्व, सुखदुःखकाळीं समानस्थिति, सरळभाव, प्रीति व सत्यत्व हे मैत्रीचे गुण आहेत. ॥ ४५३ ॥

रहस्यभेदो याञ्चा च नैष्ठुर्यं चलचित्तता ॥ क्रोधो निःसत्यता द्यूतमेतन्मित्रस्य दूषणं ॥ ४५४ ॥

अर्थ—गुह्योद्घाटन, याचना, निष्ठुरत्व, चंचल चित्त असणें, क्रोध, असत्यता व द्यूत हीं मित्रत्वास दूषणें आहेत. ॥ ४५४ ॥

रविरपि न दहति तादृक् यादृक् दहति वालुकानिकरः ॥ अन्यस्माल्लब्धपदो नीचः प्रायेण दुःसहो भवति ॥ ४५५ ॥

अर्थ—जशी वाळू आपले पाय पोळवून दाह देते, तसा सूर्यही ताप देत नाहीं. यावरून असें सिद्ध होतें कीं, इतरांपासून पदप्राप्ति झालेला दुर्जन प्रायः लोकांस दुःखदायक होतो. ॥ ४५५ ॥

दुर्जनेन समं सख्यं प्रीतिं चापि न कारयेत् ॥ ॥ उष्णो दहति चांगारः शीतः कृष्णायते करं ॥४५६॥

अर्थ—दुर्जनासह सख्य व प्रीति हीं कधींही करूं नयेत. यास दृष्टांत, अंगार (कोळसा) उष्ण असतां पोळवितो आणि तो थंड झाल्यावर हातास कृष्णवर्णत्व आणतो. ॥ ४५६ ॥

विदैवज्ञं ग्रामं विबुधविधुरां भूपतिसभां, मुखं श्रुत्या हीनं मनुजपतिशून्यं च विषयं ॥ अनाचारान्दारानपहरिकथं काव्यमपि च, प्रवक्तृत्वापेतं गुरुमपि सुबुद्धिः परिहरेत् ॥ ४५७ ॥

अर्थ—ज्योतिःशास्त्रज्ञरहित गांव, विद्वज्जनवर्जित राजसभा, वेदहीन मुख, राजहीन देश, अनाचारी स्त्रिया, हरिकथारहित कविता आणि मोक्षसाधनोपदेश न करणारा गुरु या सर्वांचाही बुद्धिमान् पुरुषानें त्याग करावा. ॥ ४५७ ॥

गणिकागणकौ समानधर्मौ निजपंचांगनिदर्शकावुभौ ॥ जनमानसमोहकारिणौ तौ विधिना वित्तहरौ विनिर्मितौ ॥ ४५८ ॥

अर्थ—वेश्या व कुत्सित ज्योतिषी यांचें आचरण समान आहे. तें असें कीं, ज्योतिषी आपलें पंचांग दाखवितो आणि वेश्या आपलीं पांचही अंगें दाखविते. तसेच दोन्हीही लोकांच्या मनास मोह करणार आहेत. याकरून ह्या दोघाजणांस ब्रह्मदेवानें लोकांचें द्रव्य हरण करण्याविषयीं निर्माण केलें आहे असें वाटतें. ॥ ४५८ ॥

कर्पूरधूलीरचितालवालः, कस्तूरिकाकुंकुमलिप्तदेहः॥

सुवर्णकुंभैः परिषिच्यमानो, निजं गुणं मुंचति किं प-
लांडुः ॥ ४५९ ॥

अर्थ—कापुराच्या धुळीचें आळें करून कस्तूरी व केशरांचा त्यास लेप लावला आणि सुवर्ण कलशांनीं जरी पाणी घातलें तरी पलांडु (कांदा) आपला स्वाभाविक जो गुण त्याचा त्याग करील काय ? नाहीं. तसा दुर्जनही आपल्या दुष्ट बुद्धीचा त्याग करणार नाहीं. ॥ ४५९ ॥

विषधरतोप्यतिविषमः खल इति न मृषा वदंति विद्वां-
सः ॥ यदयं न कुलद्वेषी स कुलद्वेषी पुनः पिशुनः ॥ ४६० ॥

अर्थ—दुर्जन सर्पापेक्षांही अतिदुष्ट असें जें विद्वज्जन ह्मणतात तें खोटें नाहीं. कारण, सर्प कुलाचा द्वेष करीत नाहीं, नकुलाचा (मुंगुसाचा) द्वेष करतो आणि दुर्जन कुलाचाही द्वेष करतो. ॥ ४६० ॥

स्थिरा शैली गुणवतां खलबुद्ध्या न बाधते ॥ रत्न-
दीपस्य हि शिखा वात्ययापि न नाश्यते ॥ ४६१ ॥

अर्थ—गुणसंपन्नांची स्थिर रीति दुर्जन बुद्धीनें बाधित होत नाहीं. यास दृष्टांत, रत्नदीपाची शिखा वावटळीनेंही नाश पावत नाहीं. ॥ ४६१ ॥

मंदोप्यमंदतामेति संसर्गेण विपश्चितः ॥ पंकच्छिदः
फलस्येव निकर्षेणाविलं पयः ॥ ४६२ ॥

अर्थ—मूढही ज्ञानिजनांच्या संगतीनें ज्ञानी होतो. यास दृष्टांत, निवळीच्या बीच्या संयोगानें गढूळ पाणी जसें स्वच्छ होतें तद्वत्. ॥ ४६२ ॥

इभतुरगशतैः प्रयांति मूर्खा धनरहिताश्च बुधाः प्रयां-
ति पद्भ्यां ॥ गिरिशिखरगतापि काकपंक्तिः पुलिनग-
तैर्न समत्वमेति हंसैः ॥ ४६३ ॥

अर्थ—जरी मूर्ख शेंकडो गज व अश्व यांसहवर्तमान (त्यांवर बसून) गमन

असलात तरी ते, पायांनीं गमन करणाऱ्या धनरहित पंडिताच्या योग्यतेशीं साम्य पावत नाहींत. यास दृष्टांत, काकपक्ष्यांची पंक्ति पर्वतशिखरावर जरी बसलेली असली तरी ती नदीच्या वाळवंटांतील हंसांशीं समान होत नाहीं. ॥ ४६३ ॥

उदीरितोर्थः पशुनापि गृह्यते हयाश्च नागाश्च वहंति नोदिताः ॥ अनुक्तमप्यूहति पंडितो जनः परेंगितज्ञानफला हि बुद्धयः ॥ ४६४ ॥

अर्थ—पशूनेंही उच्चारण केलेला अर्थ जाणला जातो. अश्व व गज हे नेमिले असतां भार वाहतात आणि पंडितजन न बोललेलें कार्यही तर्कानें जाणतो. यावरून असें सिद्ध होतें कीं, दुसऱ्याच्या अभिप्रायाचें ज्ञान होणें हेंच बुद्धीचें फल आहे. ॥ ४६४ ॥

अर्थाहरणकौशल्यं किं स्तुमः शास्त्रवादिनां ॥ अव्ययेभ्योपि ये चार्थान् निष्कर्षंति सहस्रशः ॥४६५॥

अर्थ—शास्त्रविचार करणाऱ्या पंडितांचें अर्थाकर्षणाविषयींचें कुशलत्व आम्हीं काय स्तवन करावें? कारण, जे पंडित अव्ययांपासूनही सहस्रशः अर्थांचें आकर्षण करतात. ॥ ४६५ ॥

अंतःसारविहीनस्य सहायः किं करिष्यति ॥ मलयेऽपि स्थितो वेणुर्वेणुरेव न चंदनः ॥ ४६६ ॥

अर्थ—अभ्यंतरीं सार (मगज किंवा बल व स्थिरता) रहित वस्तूस सहाय्य करणारा काय करील? यास दृष्टांत, वेळू मलयपर्वतावर जरी असला तरी तो आपल्या वेळुरूपानेंच असतो, चंदनत्व पावत नाहीं. ॥ ४६६ ॥

मृद्घटवत् सुखभेद्यो दुःसंधानश्च दुर्जनो भवति ॥ सुजनस्तु कनकघटवत् दुर्भेद्यश्चाशु संधेयः ॥ ४६७ ॥

अर्थ—दुर्जन मृत्तिकेच्या घटासारखा अनायासानें बुद्धिभेद करण्याविषयीं शक्य असून पुनः दुःखानेंही संधि करण्याविषयीं अशक्य आहे, आणि सज्जन सुवर्ण-कलशासमान दुःखानेंही बुद्धिभेद करण्यास अशक्य असून पुनः शीघ्र संधि करण्यास शक्य होतो. ॥ ४६७ ॥

मृगमीनसज्जनानां तृणजलसंतोषविहितवृत्तीनां ॥
लुब्धकधीवरपिशुना निष्कारणवैरिणो जगति ४६८॥

अर्थ—तृणानें उपजीविका करणारे हरिण, जलानें निर्वाह करणारे मत्स्य व यदृच्छालाभांत संतोषवृत्तीनें वर्तणारे सज्जन यांस जगांत फांसेपारधी, धीवर (कोळी) व दुर्जन हे क्रमेंकरून निष्कारण वैरी होतात. ॥ ४६८ ॥

परिशुद्धामपि वृत्तिं समाश्रितो दुर्जनः परान् व्यथते ॥
पवनाशिनोऽपि भुजगाः परपरितापं न मुंचंति ४६९॥

अर्थ—दुर्जन अतिशुद्ध वृत्तीचें अवलंबन करून राहिला तरी तो इतरांस दुःख देतो. यास दृष्टांत, सर्प वायुभक्षक आहेत तरी ते दुसऱ्यांस पीडा देण्याचा प्रकार सोडीत नाहींत. ॥ ४६९ ॥

किमत्र चित्रं यत् संतः परानुग्रहतत्पराः ॥ नहि स्व-
देहशैत्याय जायंते चंदनद्रुमाः ॥ ४७० ॥

अर्थ—साधु परोपकार करण्याविषयीं तत्पर असतात असें जें आहे यांत आश्चर्य काय? यास दृष्टांत, चंदनवृक्ष स्वदेह शीतल करण्यासाठीं उत्पन्न जाहले नाहींत. तर परदेह शीतळ करण्याकरितां झाले आहेत. ॥ ४७० ॥

प्राज्ञो हि जल्पतां पुंसां श्रुत्वा वाचः शुभाऽशुभाः ॥
गुणवद्वाक्यमादत्ते हंसः क्षीरमिवांभसः ॥ ४७१ ॥

अर्थ—ज्ञानी, भाषणें करणाऱ्या अन्य पुरुषांच्या शुभाशुभ वाणी श्रवण

करून, उदकांतून दुग्धमात्र ग्रहण करणाऱ्या हंसासारिखें त्यांतील गु-णयुक्त भाषण ग्रहण करतो व गुणरहिताचा त्याग करितो. ॥ ४७१ ॥

गुरुतामुपयाति यन्मृतः पुरुषस्तद्धिदितं मयाऽधुना ॥
ननु लाघवहेतुरर्थिता न मृते तिष्ठति सा मनागपि ॥४७२॥

अर्थ—मनुष्य मेल्यावर जड कां होतो याचें कारण मीं आज जाणलें तें असें कीं, याचकत्व ह्मणून जो हलकेपणा येण्यास कारणभूत गुण आहे तो लेशमात्रही मृत झालेल्या पुरुषाच्या ठिकाणीं नसतो ह्मणून तो जड होतो. ॥ ४७२ ॥

पुरतः प्रेरयत्याशा लज्जा पृष्ठावलंबिनी ॥ ततो लज्जा-
शयोर्मध्ये दोलायत्यर्थिनां मनः ॥ ४७३ ॥

अर्थ—आशा याचकांस पुढें जाण्याविषयीं प्रेरणा करते आणि लज्जा त्यांस मागें आकर्षण करते. तेणेंकरून याचकांचें मन आशा व लज्जा यांच्या मध्यभागीं आंदोलित होतें. ॥ ४७३

देहीति वक्तुकामस्य यद्दुःखमुपजायते ॥ दाता चेत्तद्वि-
जानीयाद्द्यात् स्वपिशितान्यपि ॥ ४७४ ॥

अर्थ—दे अशी याचना करणारास जें दुःख होतें तें दुःख दाता जर जाणील तर तो स्वमांसही याचकास देईल. ॥ ४७४ ॥

धर्मः प्रव्रजितस्तपः प्रचलितं सत्यं च दूरे गतं, पृथ्वी मं-
दफला नृपाश्च कुटिला लौल्यं गता ब्राह्मणाः ॥ लो-
काः स्त्रीषु रताः स्त्रियश्च चपलाः पुत्राः पितुर्द्वेषिणो,
साधुः सीदति दुर्जनः प्रभवति प्राप्ते कलौ दुर्युगे ॥४७५॥

अर्थ—कलिरूप दुष्ट युग प्राप्त झालें असतां धर्म अगदीं बुडेल, तप नाहींसें होईल, सत्य दूर जाईल, पृथ्वी अल्पफलयुक्त होईल, राजे कुटिल, ब्रा-

धनलोभी, लोक स्त्रियांविषयीं आसक्त, स्त्रिया चंचल, पुत्र पित्याचा द्वेष करणारे असे होतील व साधुजन दुःख पावूं लागतील आणि दुर्जन उत्कर्ष पावतील. ॥ ४७५ ॥

संतः क्वापि न संति संति यदि वा दुःखेन जीवंति ते,
विद्वांसोपि न संति संति यदि वा मात्सर्ययुक्ताश्च ते, ॥
राजानोपि न संति संति यदि वा तृष्णाधनग्राहिणो,दा-
तारोपि न संति संति यदि वा सेवानुकूलाः कलौ ॥४७६॥

अर्थ—कलियुगांत कोठेंही प्रायः संत नाहींत असें नाहीं, कदाचित् असले तर ते दुःखानें वांचतात; तसेंच विद्वान कोणी नाहींत असें नाहीं, जर कांहीं असले तर मत्सरयुक्त असतात? त्याचप्रमाणें राजेही नाहींत असें नाहीं, जर असले तर ते तृष्णेनें प्रजेपासून धन हरण करणारे असतात आणि दातेही नाहींत असें नाहीं कचित् असले तर ते सेवादानाविषयींच अनुकूल असे असतात. ॥ ४७६ ॥

गुणवंतः क्लिश्यंते प्रायेण भवंति निर्गुणाः सुखिनः ॥
बंधनमायांति शुका यथेष्टसंचारिणः काकाः॥४७७॥

अर्थ—गुणिजन क्लेश पावतात आणि गुणहीन प्रायः सुखी असतात. यास दृष्टांत, राघु बंधन पावतात आणि काकपक्षी यथेष्ट संचार करतात. ॥४७७॥

अखिलेषु विहंगेषु हंत स्वच्छंदचारिषु ॥ शुक पंज-
रबंधस्ते मधुराणां गिरां फलम् ॥ ४७८ ॥

अर्थ—हे शुका (राघु) स्वेच्छेनें संचार करणाऱ्या सर्व पक्ष्यांत तुलाच पिंजऱ्यांतील वासरूप बंधन प्राप्त झालें हें तुझ्या मधुर वाणीचें फल खेदास्पद आहे. बाकीचे सर्व पक्षी सुखेंकरून स्वच्छंदाचरण करितात. ४७८

शुक तव पठनं व्यसनं न गुणः किंतु स गुणाभासः॥
समजनि येनामरणं शरणं ते पंजरे वासः ॥४७९॥

अर्थ—हे शुका, तुझें भाषण हें गुणरूप नाहीं; तर तो गुणाचा अभाव असल्यामुळें दोषरूपच आहे. कारण ज्या भाषणाच्या योगानें तुला आमरणांत पिंजऱ्यांतील वास रक्षणरूपानें प्राप्त होतो. ॥ ४७९ ॥

सत्यं सत्यं मुनेर्वाक्यं नादत्तमुपतिष्ठति ॥ अंबुभिः
पूरिता पृथ्वी चातकस्य मरुस्थली ॥ ४८० ॥

अर्थ.—दान केल्यावांचून प्राप्त होत नाहीं असें जें मुनीचें वाक्य आहे तें खरोखर आहे. याविषयीं उदाहरण कीं, पृथ्वी उदकांनीं पूर्ण असूनही ती चातकाला मरुदेशांतील (निर्जल देशांतील) भूमीसमान आहे. ॥ ४८० ॥

शोकं मा कुरु कुक्कुर सत्वेष्वहमधम इति मुधा साधो॥
कष्टादपि कष्टतरं दृष्ट्वा श्वानं कृतघ्ननामानं॥ ४८१ ॥

अर्थ.—हे कुक्करा, तूं उत्तम असून दुःखापेक्षांही अतिदुःखरूप अशा कृतघ्न नामक श्वानास पाहून मी प्राण्यांत अधम आहें असा व्यर्थ शोक करूं नको. ॥ ४८१ ॥

अविनीतः सुतो जातः कथं न दहनात्मकः ॥ विनी-
तस्तु सुतो जातः कथं न पुरुषोत्तमः ॥ ४८२ ॥

अर्थ.—पुत्र अविनयी झाला असतां तो अग्नितुल्य दाहक कसा न होईल आणि पुत्र विनयसंपन्न झाला तर तो पुरुषांत उत्तम होऊन सुख देणारा कसा होणार नाहीं. ॥ ४८२ ॥

सप्रतिबंधं कार्यं प्रभुरधिगंतुं सहायवानेव ॥ दृश्यं त-
मसि न पश्यति दीपेन विना सचक्षुरपि ॥ ४८३ ॥

अर्थ.—सहायवानच राजा प्रतिबंधयुक्त कार्यप्राप्तिविषयीं समर्थ होतो. यास दृष्टांत. डोळस मनुष्यही अंधकारांतील वस्तूला दीपावांचून पाहण्यास समर्थ होत नाहीं तसें. ॥ ४८३ ॥

उत्खातान् प्रतिरोपयन् कुसुमितांश्चिन्वन् लघून् वर्धयन्, अत्युच्चान् नमयन् नतान् समुदयन् विश्लेषयन् संहतान् ॥ क्रूरान् कंटकिनो बहिर्निरसयन् म्लानान् पुनः सेचयन्, मालाकार इव प्रपंचचतुरो राजा चिरं नंदति ॥ ४८४ ॥

अर्थ.—उपटलेल्या वृक्षांस पुनः लावणारा, पुष्पितांचीं फुलें काढून लहानास वाढविणारा, अति उंच झालेल्यास नम्र करणारा तसेंच वांकलेल्यास उंच करणारा एकत्र मिळालेल्यांस निरनिराळे करणारा आणि क्रूर व कांटयांच्या वृक्षांस बाहेर काढून म्लान झालेल्या वृक्षांस पुनः जलसिंचन करणारा, असा माळ्यासारखा प्रपंचचतुर राजा चिरकाल आनंद पावतो. ॥ ४८४ ॥

अकस्माद्द्वेष्टि यो भक्तमाजन्मपरिसेवितं ॥ न व्यंजने रुचिर्यस्य त्याज्यो नृप इवातुरः ॥ ४८५ ॥

अर्थ.—जो जन्मापासून सेवा केलेल्या भक्ताचा (सेवक व ओदन) अकस्मात् द्वेष करतो आणि व्यंजना (स्वकीय राजमुद्रा व शाकादिक) वर ज्यास रुचि नाहीं असा राजा त्याचा मरणोन्मुख झालेल्या प्राण्याप्रमाणें प्रजांनीं त्याग करावा. ॥ ४८५ ॥

दुष्टतां दुष्टसंसर्गाददुष्टमपि गच्छति ॥ सुराबिंदुनिपातेन पंचगव्यघटी यथा ॥ ४८६ ॥

अर्थ.—निर्दोष पदार्थही दुष्ट पदार्थाच्या संसर्गानें दूषित होतो. यास दृष्टांत. पंचगव्याची घागर जशी सुराबिंदुपतनानें सदोष होते तद्वत्.४८६

एकं वस्तु द्विधा कर्तुं बहवः संति धन्विनः॥धन्वी स मार एवैको द्वयोरैक्यं करोति यः ॥ ४८७ ॥

न कठोरं न वा तीक्ष्णमायुधं पुष्पधन्विनः ॥ तथाऽपि जितमेवासीदमुना भुवनत्रयं ॥ ४८८ ॥

अर्थ—मदनाचें आयुध कठोर किंवा तीक्ष्णही नाहीं; तथापि त्यानें भुवनत्रय जिंकिलें आहे. ॥४८८॥

हेमंते हिमकरबिंबचारुमुख्या रामाया मृदुभुजपंजरे शयानाः ॥ ये कालं परमसुखं नयंति तेषां शीतं किं लगति जगत्प्रकंपकारि ॥ ४८९ ॥

अर्थ—चंद्रासमान आल्हादकारक मुख आहे जिचें अशा सुंदरीच्या कोमल भुजरूप पिंजऱ्याच्या मध्यभागीं शयन करून परमसुखानें जे हेमंत ऋतूंत कालक्रमण करतात त्यांस, जगाला अत्यंत कंपित करणारी थंडी काय करणार. ॥ ४८९ ॥

येनाकारि पराभूतिर्दिननायकसूनवे ॥ यद्गोत्रात्मभवाकांतं तन्महः श्रेयसेऽस्तु वः ॥ ४९० ॥

अर्थ—ज्यानें सूर्यपुत्र यमाचा पराभव केला असें जें पार्वतीपतिरूप शंकराख्य तेज, तसाच ज्यानें सूर्यपुत्र सुग्रीवासाठीं वालीचा पराभव केला असें जें सीताकांत रामाख्य तेज आणि ज्यानें सूर्यपुत्र कर्णाचा पराजय केला असें जें रुक्मिणी नामक भीष्मकराज कन्यापतिरूप श्रीकृष्णाख्य तेज तें त्रय तुमच्या श्रेयास कल्याणास कारण होवो. ॥ ४९० ॥

किमिच्छति नरः काश्यां भूपानां को रणे हितः ॥ कोवंद्यः सर्वदेवानां दीयतामेकमुत्तरं ॥ ४९१ ॥

अर्थ.—मानव काशींत काय इच्छितो ? मृत्यु. राजांस रणांत हितकारक कोण? जय. व सर्व देवांस वंद्य कोण ? मृत्युंजय. असें तिन्ही प्रश्नांचें उत्तर देण्यास हें योग्यपद आहे. ॥ ४९१ ॥

मारस्य मित्रमसि किं च सुधामयूख शंभावपि प्रण-
यितां प्रकटीकरोषि ॥ विश्वासपात्रमसि यद्विषतो-
स्तयोरप्येतत्तव प्रकृतिशुद्धतनोश्चरित्रं ॥ ४९२ ॥

अर्थ.—हे अमृतकिरण चंद्रा, तूं मदनाचा मित्र आहेस आणि शंकराविषयींही मैत्री प्रगट करतोस असा तूं त्या परस्पर द्वेष करणारांसही जो विश्वासपात्र आहेस हें, तूं प्रकृतीनें शुद्धतनु असल्यामुळें तुझें चरित्र तुला योग्यच आहे. ॥ ४९२ ॥

प्रावृषेण्यस्य मालिन्यं दोषः कोऽभीष्टवर्षिणः ॥ शा
रदाभ्रस्य शुभ्रत्वं वद कुत्रोपयुज्यते ॥ ४९३ ॥

अर्थ.—पर्जन्य काळांतील इष्ट उदकवृष्टि करणाऱ्या मेघास कृष्णवर्ण दोषावह काय ? आणि शरदृतूंतील ह्याच अभ्राचा शुभ्रत्व गुण कोठें उपयोगीं पडतो तें सांग. ॥ ४९३ ॥

नोपेक्षा न च दाक्षिण्यं न प्रीतिर्न च संगतिः ॥
तथापि हरते तापं लोकानामुद्यतो घनः ॥ ४९४ ॥

अर्थ.—कोणाची उपेक्षा नाहीं. कोणाचें दाक्षिण्य नाहीं. कोणावर प्रीति नाहीं व कोणाशीं संगति नाहीं; तथापि उदयास आलेला मेघ लोकांच्या तापास हरण करतो. ॥ ४९४

जलदः समुद्रसेवामाचरति समग्रभुवनभरणाय ॥
कुरुते तामपि हतमतिरात्मंभरिरनिशमौर्वाग्निः ॥४९५॥

अर्थ.—मेघ समग्र भुवनपोषणार्थ समुद्रोदक प्राशन करतो आणि मंदमति वडवानल स्वोदर भरणार्थ अहोरात्र समुद्रजल प्राशन करितो. ॥ ४९५ ॥

एको ऽहमसहायो ऽहं कृशोहमपरिच्छदः ॥ स्वप्ने-
प्येवंविधा चिंता मृगेंद्रस्य न जायते ॥ ४९६ ॥

अर्थ.—मी एकटा, मला कोणी सहाय नाहीं, मी कृश व परिवारहीन अशी चिंता सिंहास स्वप्नांतही येत नाहीं. ॥ ४९६ ॥

एकेनापि सुपुत्रेण सिंही स्वपिति निर्भयं ॥ सहैव दशभिः पुत्रैर्भारं वहति रासभी ॥ ४९७ ॥

अर्थ.—सिंहमाता एकाच सुपुत्राच्या योगानें निर्भयपणें निद्रा करिते, आणि गर्दभी दहा मुलें असूनही चिंताभारच वाहाते. ॥ ४९७ ॥

नाभिषेको न संस्कारः सिंहस्य क्रियते वने ॥ विक्रमार्जितसत्वस्य स्वयमेव मृगेंद्रता ॥ ४९८ ॥

अर्थ.—सिंहास वनांत कोणी अभिषेक व संस्कारही करीत नाहींत तथापि पराक्रमसंपादित धैर्यसंपन्न सिंहास स्वयमेव सर्व पशूंचें आधिपत्य प्राप्त होतें. ॥ ४९८ ॥

दानार्थिनो मधुकरा यदि कर्णतालैर्दूरीकृताः करिवरेण मदांधबुद्ध्या ॥ तस्यैव गंडयुगमंडनहानिरेषा भृंगाः पुनर्विकचपद्मवने वसंति ॥ ४९९ ॥

अर्थ.—गजश्रेष्ठानें मदांधबुद्धिमुळें आपल्या कर्णतालांनीं कानाच्या फडफडण्यानें दानोदकार्थ भ्रमर उडवून लावले तरही त्याच्याच गंडस्थलद्वयाच्या शोभेची हानि होते. परंतु त्यांचे कांहीं कमी होत नाहीं. कारण ते भ्रमर यानें त्यांचें निवारण केलें असतां पुनः प्रफुल्लित कमलवनांत वास करितात. ॥ ४९९ ॥

दूर्वांकुरतृणाहारा धन्यास्तात वने मृगाः ॥ विभवोन्मत्तचित्तानां न पश्यंति मुखानि यत् ॥ ५०० ॥

अर्थ.—हे तात, दूर्वांकुर व तृण यांचा आहार करणारे वनांतील हरिण धन्य आहेत; कारण ते वैभवानें उन्मत्तचित्त झालेल्या लोकांचीं मुखें पहात नाहींत. ॥ ५०० ॥

सद्विद्या यदि का चिंता वराकोदरपूरणे ॥ शुकोप्य-
शनमाप्नोति हरे राम इति ब्रुवन् ॥ ५०१ ॥

अर्थ.—जर उत्तम विद्या असली तर क्षुद्र उदर भरण्याची चिंता कशास पाहिजे ? कारण, हरे राम असें बोलणाऱ्या राघूसही भोजन मिळतें. मग विद्वानास मिळेल यांत संशय ! ॥ ५०१ ॥

कुत आगत्य घटते विघटय्य क नु याति च ॥ न ल-
क्ष्यते गतिः सम्यक् घनस्य च धनस्य च ॥५०२॥

अर्थ.—मेघ व धन कोठून येऊन जमतात आणि बिघडून कोठें जातात यांची कृति उत्तम रीतीनें लक्ष्यांत येत नाहीं. ॥ ५०२ ॥

पतंति खड्गधारासु विशंति मकरालयं ॥ किं न कु-
र्वंति सुभगे कष्टमर्थार्थिनो जनाः ॥ ५०३ ॥

अर्थ.—हे कल्याणि द्रव्यार्थि जन खड्गधारेंत पडतात, समुद्रांत प्रवेश करतात. तस्मात् ते कोणतें दुःखकारक कर्म करीत नाहींत सर्व कांहीं करितात. ॥ ५०३ ॥

दुंदुभिस्तु सुतरामचेतनस्तन्मुखादपि धनं धनं
धनं ॥ इत्थमेव निनदः प्रवर्तते किं पुनर्यदि जनः
सचेतनः ॥ ५०४ ॥

अर्थ.—दुंदुभि(नगारा) जड असून त्याच्या मुखांतूनही धन धन धन असाच ध्वनि निघतो. मग सचेतन मनुष्य जर असेल तर त्याच्या मुखांतून वारंवार धन असा शब्द आला असतां त्यांत आश्चर्य काय आहे कांहीं नाहीं हें पुनः काय सांगावें .॥ ५०४ ॥

नारिकेलसमाकारा दृश्यन्त्यपि हि सज्जनाः ॥ अन्ये

बदरिकाकारा बहिरेव मनोहराः ॥ ५०५ ॥

अर्थ.—सज्जन नारळाच्या फळासारखे दिसतात आणि इतर दुर्जन बाहेरून बोराच्या आकृति सारखे असतात. ॥ ५०५ ॥

अति कुपिता अपि सुजना योगेन मृदूभवंति न तु नीचाः ॥ हेम्नः कठिनस्यापि द्रवणोपायोस्ति न तृणानां ॥ ५०६ ॥

अर्थ.—सज्जन अतिक्रुद्ध झाले तरी ते युक्तीनें मृदु होतात; परंतु नीच मृदु होत नाहीं; यास दृष्टांत, सुवर्ण कठिण आहे तरी त्यास पातळ करण्याविषयीं उपाय आहे. परंतु गवत कोमल करण्यास उपाय नाहीं. ॥५०६॥

इयमुन्नतसत्वशालिनी महतां कापि कठोरचित्तता ॥ उपकृत्य भवंति दूरतः परतः प्रत्युपकारशंकया ॥ ५०७ ॥

अर्थ.—महात्म्यांची उत्तम धैर्यानें शोभणारी कठोर चित्तता ही कांहीं अद्भुतच आहे. ती अशी कीं, ते लोकांवर उपकार करून त्यांपासून आपणावर प्रत्युपकार होईल या शंकेपासून दूर होतात ह्मणजे दुसरा मजवर प्रत्युपकार करील अशी त्यास शंकाच येत नाहीं. ॥ ५०७ ॥

अहो किमपि चित्राणि चरित्राणि महात्मनां ॥ लक्ष्मीं तृणाय मन्यंते तद्भारेण नमंत्यपि ॥ ५०८ ॥

अर्थ.—अहो महात्म्यांचीं चरित्रें किती विचित्र असतात पहा, ते संपत्तीला तृणासमान मानितात आणि ती प्राप्त झाली असतां तिच्या अतिशयानें नम्रही होतात. ॥ ५०८ ॥

वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ॥ लोको-

नराणां चेतांसि को हि विज्ञातुमर्हति ॥ ५०९ ॥

अर्थ.—लोकोत्तर साधूंचीं चित्तें समयविशेषीं वज्रापेक्षांही कठोर होतात आणि प्रसंगानुसार पुष्पापेक्षांही कोमल होतात तस्मात् तीं चित्तें जाणण्यास कोण समर्थ होईल? ॥ ५०९ ॥

तरुमूलादिषु निहितं जलमाविर्भवति पल्लवाग्रेषु ॥
निभृतं यदुपक्रियते तदपि महांतो वहंत्युच्चैः ॥ ५१० ॥

अर्थ.— वृक्षमूलादिकांच्या ठिकाणीं घातलेलें जल पानाच्या अग्रांवर प्रगट होतें तसा एकांतीं केलेला जो उपकार तोही महात्मे उत्तम प्रकारें अंतःकरणांत धारण करून उघडकीस आणतात. ॥ ५१० ॥

नूनं दुग्धाब्धिमंथोत्थाविमौ सुजनदुर्जनौ ॥ किं त्विंदोः सोदरः पूर्वः कालकूटस्य चेतरः ॥ ५११ ॥

अर्थ.— सज्जन व दुर्जन हे निश्चयें करून क्षीरसागराच्या मंथनापासून उत्पन्न झाले; परंतु त्यांतील प्रथम सुजन चंद्राचा बंधु असून इतर जो दुर्जन तो कालकूट विषाचा बंधु आहे. ॥ ५११ ॥

उदयति यदि भानुः पश्चिमे दिग्विभागे प्रचलति यदि मेरुः शीततां याति वन्हिः ॥ विकसति यदि पद्मं पर्वताग्रे शिलायां न भवति विपरीतं भाषितं सज्जनानां ॥ ५१२ ॥

अर्थ.—कदाचित् सूर्य पश्चिमदिशेस उदयास पावेल, मेरु चलन पावेल, अग्नि शीतल होईल आणि कमल पर्वताशिखरावरील शिळेवर प्रफुल्लित होईल, तरी सज्जनांचें भाषण विपरीत (खोटें) व्हावयाचें नाहीं. ॥ ५१२ ॥

रथस्यैकं चक्रं भुजगयमिताः सप्त तुरगा निरालंबो

मार्गश्वरणरहितः सारथिरपि ॥ रवियात्येवांतं प्र-
तिदिनमपारस्य नभसः क्रियासिद्धिः सत्वे भवति
महतां नोपकरणे ॥ ५१३ ॥

अर्थ.—सूर्याच्या रथास एक चक्र असून त्यास लावलेले सात घोडे सर्पांनीं बद्ध केले आहेत, आणि त्या रथाचा मार्ग निराधार असून सारथिही चरणरहित आहे; तरी सूर्य प्रतिदिवशीं अपार आकाशाच्या अंतप्रदेशास जातोच. तस्मात् महात्म्यांची क्रियासिद्धि त्यांच्या केवळ साधुत्वाच्याच ठिकाणीं सिद्ध असते व त्यांस अन्य साहाय्याची अपेक्षा नसते. ॥ ५१३ ॥

अपेक्षंते न च स्नेहं न पात्रं न दशांतरं ॥ सदा लो-
कहितासक्ता रत्नदीपा इवोत्तमाः ॥ ५१४ ॥

अर्थ.—उत्तम रत्नरूप दीप सर्वदा लोकांच्या प्रकाशरूप हिताविषयीं तत्पर असून ते जसे घृतादिक पदार्थ, समई आदिकरून पात्र व वाती यांची अपेक्षा करीत नाहींत, तसे निरंतर लोकहिताविषयीं आसक्त सत्पुरुष स्नेह, योग्यता व अवस्थांतर यांची अपेक्षा करीत नाहींत. ॥ ५१४ ॥

किं मधुना किं विधुना किं सुधया किं च वसुधया
ऽखिलया ॥ यदि हृदयहारिचरितः पुरुषः पुनरेति न-
यनयोरयनं ॥ ५१५ ॥

अर्थ.—जर अंतःकरणांतील ताप हरण करणाऱ्या आचरणाचा सत्पुरुष पुनः पुनः दृष्टिगोचर होत असेल तर मधानें काय कर्तव्य आहे, चंद्राचें प्रयोजन काय, अमृत व सर्व पृथ्वी कशाला पाहिजे ? ॥ ५१५ ॥

काकैः सह प्रवृद्धस्य कोकिलस्य कला गिरः ॥ खल-
संगे ऽपि नैष्ठुर्यं कल्याणप्रकृतेः कुतः ॥ ५१६ ॥

अर्थ.– काकपक्ष्यांसह वृद्धिंगत झालेल्या कोकिलपक्ष्याचे शब्द मधुरच

असतात. यावरून असें सिद्ध होतें कीं, दुर्जन संगति मनुष्यास निष्ठुरत्व कोठून प्राप्त होईल ? ॥ ५१६ ॥

अंबरमनूरुलंघ्यं वसुंधरा सापि वामनैकपदा ॥ अब्धि-
रपि पोतलंघ्यः सतां मनः केन तुल्यं स्यात् ॥ ५१७

अर्थ.– आकाशाचें उल्लंघन मांड्या नसून अरुण करतो, अपार पृथ्वी ही वामनाच्या एक पायानें व्यापिली, समुद्राचेंही उल्लंघन नौकेनें होतें, परंतु साधूचें मन कोणाशीं समान होईल तें अपार आहे! ॥ ५१७ ॥

आपद्गतः खलु महाशयचक्रवर्ती विस्तारयत्यकृतपूर्व-
मुदारभावं ॥ कालागरुर्दहनमध्यगतः समंताल्लोकोत्तरं
परिमलं प्रकटीकरोति ॥ ५१८ ॥

अर्थ.–विपत्तिग्रस्त झालेला महात्मा हाच कोणीएक सार्वभौम, पूर्वी प्रकट न केलेला स्वकीय उदारभाव निश्चयेंकरून प्रकट करतो. यास दृष्टांत, कृष्णागरु चंदन अग्नींत पडला असतां तो आसमंताद्भागीं लोकोत्तर सुगंध प्रकट करतो तद्वत्. ॥ ५१८ ॥